Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

2017 to 2022

# 2.4.6

# DOCUMENTS UPLOAD

लोकमत

# व्यक्तिमत्त्व विकास गरजेचा

## जयकुमार शितोळे: बार्शी येथे कौशल्यविकास कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**बार्शी :** प्रशिक्षणार्थ्यांनी ज्ञान आत्मसात करण्याबरोबरच कौशल्य व दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. समाजाचा एक जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकाचा व्यक्तिमत्त्व विकास होणे गरजेचे असते. आपल्या अंगभूत गुणांचा विकास केला पाहिजे, असे मत श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयकुमार शितोळे यांनी व्यक्त केले. बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील कौशल्य विकसन कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. ए. गोरे होते. प्रभावी व परिणामकारक आंतरक्रिया साधण्यासाठी कौशल्य विकसन कार्यक्रम आवश्यक आहे, असे शितोळे यांनी सांगितले. प्राचार्य एस. ए. गोरे म्हणाले, दैनंदिन जीवनामध्ये वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जाताना कौशल्ये उपयुक्त ठरतात. आजची शिक्षण पध्दती ही कौशल्याधारित आहे. त्यामुळे कौशल्य विकसन कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. प्रास्ताविक डॉ. एम. व्ही. मते यांनी केले. स्वरुप व प्रशिक्षणाची माहिती समन्वयक प्रा.डॉ.रविराज फुरडे यांनी दिली. पॉवर पॉइंट सादरीकरणाद्वारे प्रा. डॉ. एम. एस. डिसले व प्रा. डॉ. पी. ए. पाटील यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन गझल शेख यांनी केले तर आभार प्रा. पी. पी. नरळे यांनी मानले.




बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मार्गदर्शन करताना जयकुमार शितोळे. यावेळी प्राचार्य डॉ. एस. ए. गोरे, डॉ. एम. व्ही.मते व मान्यवर.

Hello Solapur Gramin
Page No. 2 Aug 14, 2017
Powered by: erelego.com

College of Education Dist. Solapur Barshi.

# Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's
# College of Education, Barshi
## Publicity 2017 - 2018

लोकमत

## असा आहे विविध कलाप्रकारांचा निकाल



**गोल्डन बॉय**
◆ संगमेश्वर बिराजदार (संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर)

**गोल्डन गर्ल**
◆ वैष्णवी जानराव (शिवाजी महाविद्यालय, बार्शी)

- **रांगोळी :** प्रथम - संगमेश्वर बिराजदार (संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर), द्वितीय - रोहन कांबळे (शिवाजी महाविद्यालय, बार्शी), तृतीय - आसिफ शिकलगार (देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ)
- **कातरकाम :** प्रथम - श्रीकांत भिसे (औदुंबरअण्णा पाटील विधी महाविद्यालय, पंढरपूर), द्वितीय - संगमेश्वर बिराजदार (संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर), तृतीय - सुलक्षणा कापसे (शिवाजी महाविद्यालय, बार्शी)
- **मातीकाम :** प्रथम - रोहन कांबळे (शिवाजी महाविद्यालय, बार्शी), द्वितीय - रवी सूतकर (शिवाजी महाविद्यालय, बार्शी), तृतीय - शीतलकुमार शेटे (वालचंद अभियांत्रिकी, सोलापूर)
- **व्यंगचित्र :** प्रथम - संगमेश्वर बिराजदार (संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर), द्वितीय - शिवाजी महाविद्यालय, बार्शी, तृतीय - सोहम इंगळे (एन. बी. नवले कॉलेज, केगाव)
- **भित्तीचित्रण :** प्रथम - संगमेश्वर बिराजदार (संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर), द्वितीय - आसिफ शिकलगार (देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ), तृतीय - विक्रांतसिंह चौहान (शिवाजी महाविद्यालय, बार्शी)
- **स्थळचित्रण :** प्रथम - संगमेश्वर बिराजदार (संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर), द्वितीय - चंद्रशेखर बनसोडे (विज्ञान महाविद्यालय, सांगोला), तृतीय - विक्रांतसिंह चव्हाण (शिवाजी महाविद्यालय, बार्शी).
- **निर्मितीचित्र :** प्रथम - वालचंद कॉलेज, सोलापूर, द्वितीय संतोष भीमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप, तृतीय - विज्ञान महाविद्यालय, सांगोला
- **स्पॉटफोटोग्राफी :** प्रथम - दयानंद विधी महाविद्यालय, सोलापूर, द्वितीय - विक्रमसिंह चव्हाण (शिवाजी महाविद्यालय, बार्शी), तृतीय - श्रेयांक सराफ (डब्ल्यूआयटी, सोलापूर).
- **प्रश्नमंजुषा :** प्रथम - शिवाजी महाविद्यालय, बार्शी, द्वितीय - देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ, तृतीय - विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय, टेंभुर्णी
- **वक्तृत्व (मराठी) :** प्रथम - स्वप्निल इंगोले (शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज), द्वितीय - अक्षर टोमके (सांगोला महाविद्यालय, सांगोला), तृतीय विभागून - वासंती नागटिळक (दयानंद महाविद्यालय, सोलापूर), प्राजक्ता शिर्के (कर्मवीर औदुंबरअण्णा पाटील विधी महाविद्यालय, पंढरपूर)
- **वक्तृत्व (हिंदी) :** प्रथम - आदित्य कुलकर्णी (शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज), द्वितीय - रजिया मुलाणी (शिवाजी महाविद्यालय, बार्शी), तृतीय - वालचंद महाविद्यालय, सोलापूर.
- **वक्तृत्व (इंग्रजी) :** प्रथम - यशवंत खाडे (शिवाजी महाविद्यालय, बार्शी), द्वितीय - पूजा खपाले (केबीपी कॉलेज, पंढरपूर), तृतीय विभागून - ऋतुजा साठे (संगमेश्वर कॉलेज, सोलापूर) व वालचंद महाविद्यालय.
- **वादविवाद :** प्रथम - शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज, द्वितीय - शिवाजी महाविद्यालय बार्शी, तृतीय विभागून - अभियांत्रिकी महाविद्यालय गोपाळपूर व वालचंद महाविद्यालय, सोलापूर.
- **शास्त्रीय नृत्य :** प्रथम - वैष्णवी राजगुरु (कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर), द्वितीय - वंदिता देशपांडे (संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर), तृतीय विभागून - कोमल कांबळे (वि.गु.शिवदारे महाविद्यालय, सोलापूर) व अक्षता भंडारी (दयानंद कॉलेज, सोलापूर).
- **शास्त्रीय तालवाद्य :** प्रथम - ओंकार पवार (स.म.शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते), द्वितीय विभागून - सन्मित रणदिवे (डब्ल्यू आयटी कॉलेज) व रितेश तडवळकर (संगमेश्वर कॉलेज, सोलापूर), तृतीय विभागून - अजैना शेख (शिवाजी महाविद्यालय, बार्शी) व किरण देठे (के.बी.पी. कॉलेज, पंढरपूर).
- **शास्त्रीय सूरवाद्य :** प्रथम - राम मदने (छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर), द्वितीय - आदिती बोराळकर (संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर), तृतीय विभागून - विनायक खरात (शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज) व मयूर स्वामी (सी.बी. खेडगीज कॉलेज, अक्कलकोट).
- **शास्त्रीय गायन :** प्रथम - रबाना सिद्दगी (शिवाजी महाविद्यालय, बार्शी), द्वितीय विभागून - आदिती बोराळकर (संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर) व राम मदने (छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर), तृतीय - स्नेहल कुलकर्णी (वालचंद महाविद्यालय, सोलापूर).
- **सुगम गायन :** प्रथम - आदिती बोराळकर (संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर), द्वितीय - शार्दुल भंडारकवठेकर (शिवाजी महाविद्यालय, बार्शी), तृतीय विभागून - रोहिनी भोसले (शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज) व हिराचंद नेमचंद महाविद्यालय, सोलापूर.
- **समूहगीत :** प्रथम - छत्रपती शिवाजी महाविद्यालय (बार्शी), द्वितीय विभागून - के.बी.पी. कॉलेज (पंढरपूर) व संगमेश्वर महाविद्यालय (सोलापूर), तृतीय विभागून - दयानंद विधी महाविद्यालय (सोलापूर) व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (गोपाळपूर).
- **फोक ऑर्केस्ट्रा :** प्रथम - शिवाजी महाविद्यालय, बार्शी, द्वितीय - शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज, तृतीय - स. म. शंकरराव मोहिते महाविद्यालय, नातेपुते
- **पथनाट्य :** प्रथम - शिवाजी महाविद्यालय, (बार्शी), द्वितीय विभागून - सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय (नातेपुते) व वालचंद महाविद्यालय (सोलापूर), तृतीय विभागून - शंकरराव मोहिते महाविद्यालय (अकलूज) व वि. गु. शिवदारे महाविद्यालय (सोलापूर)
- **मूकनाट्य :** प्रथम - शिवाजी महाविद्यालय (बार्शी), द्वितीय - संगमेश्वर महाविद्यालय (सोलापूर), तृतीय विभागून - के.बी.पी. कॉलेज (पंढरपूर) व विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय (टेंभुर्णी).
- **लघुनाटिका :** प्रथम - वालचंद महाविद्यालय (सोलापूर), द्वितीय - शिवाजी महाविद्यालय (बार्शी), तृतीय विभागून - शंकरराव मोहिते महाविद्यालय (अकलूज) व भारत महाविद्यालय, जेऊर.
- **नकला :** प्रथम - शिक्षणशास्त्र महाविद्यालय (बार्शी), द्वितीय - भारत महाविद्यालय (जेऊर), तृतीय विभागून - श्रीसंत दामाजी महाविद्यालय (मंगळवेढा) व ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालय (सोलापूर).
- **एकांकिका :** प्रथम - विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय (टेंभुर्णी), द्वितीय विभागून - शंकरराव मोहिते महाविद्यालय (अकलूज) व शिवाजी महाविद्यालय (बार्शी), तृतीय विभागून - संगमेश्वर महाविद्यालय (सोलापूर) व दयानंद विधी महाविद्यालय (सोलापूर).
- **मंच संयोजन :** प्रथम - शिवाजी महाविद्यालय (बार्शी), द्वितीय - शंकरराव मोहिते महाविद्यालय (अकलूज), तृतीय - विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय (टेंभुर्णी).
- **उत्कृष्ट पुरुष अभिनय :** प्रथम - शुभम जगताप (विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय, टेंभुर्णी), द्वितीय - आकाश बनसोडे (शिवाजी महाविद्यालय, बार्शी), तृतीय विभागून - आदित्य कुलकर्णी (शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज) व ओंकार साठे (वालचंद महाविद्यालय, सोलापूर)
- **उत्कृष्ट स्त्री अभिनय :** प्रथम - उज्ज्वला कोंगे (संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर), द्वितीय विभागून - वैष्णवी जानराव (शिवाजी महाविद्यालय, बार्शी), पूजा काटकर (वालचंद महाविद्यालय, सोलापूर), तृतीय - तुलशी जाधव (ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर).
- **उत्कृष्ट दिग्दर्शन :** प्रथम - शुभम जगताप (विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय, टेंभुर्णी), द्वितीय - विक्रांतसिंह चव्हाण (शिवाजी महाविद्यालय, बार्शी), तृतीय - संगमेश्वर बिराजदार (संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर).
- **लोकनृत्य :** प्रथम - वालचंद महाविद्यालय (सोलापूर), द्वितीय विभागून - शिवाजी महाविद्यालय (बार्शी) व संगमेश्वर महाविद्यालय (सोलापूर), तृतीय विभागून - शंकरराव मोहिते महाविद्यालय (अकलूज) व श्रीसंत दामाजी महाविद्यालय (मंगळवेढा).

**विभागानुसार सर्वसाधारण विजेतेपद**

- ललित विभाग - संगमेश्वर कॉलेज, सोलापूर
- वाङ्मय विभाग - शिवाजी महाविद्यालय, बार्शी
- संगीत विभाग - शिवाजी महाविद्यालय, बार्शी
- नृत्य विभाग - संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर
- नाट्य विभाग - शिवाजी महाविद्यालय, बार्शी.

Hello Solapur
Page No. 4 Oct 12, 2017
Powered by: erelego.com

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2017 - 2018**

पुढारी

# बार्शी तालुक्यात पटेल जयंतीनिमित्त अभिवादन

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

बार्शी तहसील कार्यालय, बार्शी नगरपालिका, शिक्षणशास्त्र महाविद्यालय आदीसह बार्शी शहर व तालुक्यात सरदार वल्लभभाई पटेल जयंती व माजी पंतप्रधान कै. इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी राष्ट्रीय एकता दिवस व राष्ट्रीय संकल्प दिवस म्हणून साजरी करण्यात आली.

बार्शी तहसील कार्यालयाच्या वतीने राष्ट्रीय एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. तसेच यावेळी उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ देण्यात आली. यावेळी प्रांत अधिकारी शिवाजी जगताप, तहसीलदार ऋषीकेश शेळके, नायब तहसीलदार एम.एम.भोई, नगराध्यक्ष ॲड. असिफ तांबोळी, एस.एस. गोरे, प्राचार्य प्रकाश थोरात, गटशिक्षण अधिकारी विष्णू कांबळे, प्रशासन अधिकारी संजय पाटील, राजेंद्र मंगरूळे, नगरसेवक विजय चव्हाण आदी उपस्थित होते.



**बार्शी : सरदार वल्लभभाई पटेल व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमा पूजनावेळी उपस्थित मान्यवर.**

**मळेगावात अभिवादन**

मळेगाव, ता. बार्शी येथील कर्मवीर ना. गडसिंग (गुरुजी) मित्र विद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल जयंती व महिला पंतप्रधान कै. इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एस.ए. जाधव होते. सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन जाधव व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पी.पी. गव्हाणे यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांची देशाविषयीची असलेली समर्पण वृत्ती आणि कार्याची तसेच आयर्न लेडी म्हणून संपूर्ण जगभरात एक महिला पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधी केलेल्या कार्याबद्दल मार्गदर्शन केले.विलास मिरगणे, पी.पी. गव्हाणे, साबळे, शेख, एम.एस. कुदळे, मिरगणे, घोरपडे, कुटे यांच्यासह कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन जी.बी. शेख यांनी केले.

My Solapur
Page No. 02 Nov 02, 2017
Powered by: erelego.com

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2017 - 2018**

**पुढारी**




बार्शी : रॅलीत सहभागी मान्यवर.

## मतदार दिनानिमित्त बार्शीत मतदार जनजागृती रॅली

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

बार्शी तहसील कार्यालयाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. मतदार दिनानिमित्त शहरातील प्रमुख मार्गावरून मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीचा शुभारंभ तहसीलदार ऋषिकेत शेळके यांच्या हस्ते करण्यात आला. या रॅलीमध्ये शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व सांगितले. या रॅलीचा समारोप बार्शी नगरपालिकेत करण्यात आला. याप्रसंगी अकरा सहस्त्रक मतदारांना प्रमाणपत्र व मतदान ओळखपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी तहसीलदार ऋषिकेत शेळके, नायब तहसीलदार मुरलीधर भोई, निवडणूक विभागाचे ए.व्ही.मोरे, आकाश गुळवे, न.पा. चे प्रशासन अधिकारी रणजित कांबळे, शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, पर्यवेक्षक संजय पाटील, माहिती अधिकार कार्यकर्ते दीनानाथ काटकर, पोलिस उपनिरीक्षक पंढरीनाथ बोधनापोड आदी मान्यवर उपस्थित होते.

College of Education Dist. Solapur Barshi.

## Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

### Publicity 2017 - 2018

# क्रिकेट, व्हॉलीबॉलनंतर बार्शीत टेबल टेनिसलाही 'लाइक'

## बार्शीतील स्पर्धेला उत्स्फूर्त दाद

u **बार्शी, दि. १३** - बार्शीत गेली अनेक वर्षे क्रिकेट व व्हॉलीबॉल या क्रीडा प्रकारांनी सर्वांना वेड लावले होते. शिवाय उत्कृष्ट प्रशिक्षकांमुळे खेळाडूही घडत राहिले. यापुढे आणखी एक पाऊल टाकत आता टेबल टेनिससारख्या खेळालाही येथील तरुणांनी 'लाइक' केले आहे. बार्शीत आयोजित या स्पर्धांना म्हणूनच अनेकांनी दाद दिली. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.

बार्शीच्या क्रीडा क्षेत्रात नामवंत खेळाडूंचा उल्लेख करीत असताना त्यांना घडविणाऱ्या प्रशिक्षकांचा उल्लेख आधी करावा लागेल. शिस्त आणि आदरयुक्त भीती असलेले प्रा. सुरेश लांडगे हे खरे तर या खेळाडूंचे सर्वात लाडके व जवळचे नाव राहिले. यानंतर प्रा. व्ही. तिरुपती तसेच स्व. आप्पासाहेब झाडबुके आणि सध्याचे प्रा. रमेश आजरी, प्रा. फडतारे यासह अनेक नावे ही खेळाडूंसाठी जशी महत्त्वाची राहिली तद्वत:च शहरासाठीही राहिली. म्हणूनच उत्तमोत्तम खेळाडू सातत्याने बार्शीच्या मातीत तयार होत राहिले. या क्रीडा प्रकारांची पार्श्वभूमी असलेल्या बार्शीने आता टेबल टेनिसचीही सवय लावून घेतली आहे. सोलापूर विद्यापीठ



u **बार्शी : टेबल टेनिस स्पर्धेचा शुभारंभ करताना माजी प्राचार्य डॉ. व्ही.यू. पवार. शेजारी संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे, प्रशिक्षक प्रा. सुरेश लांडगे, प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे आदी.**

आंतरमहाविद्यालय टेबल टेनिस स्पर्धा येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. यात मुले, मुली सहभागी झाल्या होत्या. आणि क्रीडा रसिकांचीही याला उत्तम दाद मिळाली.

या स्पर्धेचा शुभारंभ माजी प्राचार्य डॉ.व्ही. यू. पवार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे, प्रशिक्षक तथा स्पर्धा सचिव प्रा. सुरेश लांडगे, विद्यापीठ निवड समितीचे डॉ.जे.पी. झाडबुके, प्रा. हारकारे, सोलापूर विद्यापीठ क्रीडा परिषदेचे सचिव प्रा. प्रशांत तांबिले, पंच कृष्णा थोरात, प्रा. दिलीप मोहिते, प्रा. एम.ए. भुजबळ आदी उपस्थित होते. या स्पर्धेत मुलांच्या संघात बार्शीच्या श्री शिवाजी महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले तर सोलापूरचा डब्ल्यू.आय.टी. चा संघ उपविजेता ठरला. मुलींच्या संघात सोलापूरच्या एच.एन. महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावले तर सोलापूरचा डब्ल्यू. आय.टी.चा संघ उपविजेता ठरला.या स्पर्धेनंतर झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ए.जी. कांबळे यांनी केले तर प्रा. एस.एस. सुरवसे यांनी आभार मानले. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रा.बी.टी. गुंड व सर्व प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2017 - 2018**

बार्शी । शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने आयोजन, तालुक्यातून प्रतिसाद

# विद्यापीठांतर्गत कुस्ती स्पर्धांत चुरस

प्रतिनिधी । बार्शी

येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये सोलापूर विद्यापीठांतर्गत आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १२० मुलांनी व ३५ मुलींनी सहभाग नोंदवला. फ्री-स्टाइलमध्ये ५७ ते ७४ किलो अशा ५ वजनी गटात तर ग्रीको रोमन प्रकारात ५९ ते १२५ अशा विविध ८ वजनी गटात या स्पर्धा झाल्या. यामध्ये फ्री-स्टाइल प्रकारात युवराज मोटे, नाथा शेंबडे, संजय वाघमोडे, अभिजित कामटे, ओंकार हुलगे हे तर ग्रीको रोमन प्रकारात दत्तात्रय काळे, कुबेर चव्हाण, अजिंक्य पवार, तुषार झांजे, हर्षल जगदाळे, राहुल सुई, अनिल जाधव, ऋषीकेश आरकिले हे चॅम्पियन ठरले.

स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती पुरस्कार विजेते नागनाथ देशमुख यांच्या हस्ते झाले. या वेळी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार विष्णू पाटील व सहसचिव पी. टी. पाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, प्रा. डी. एम. मोहिते, प्रा. जी. एस. फरताडे, सोलापूर विद्यापीठ निवड समितीचे प्रा. मोरे, प्रा. डॉ. बापू मोहिते, प्रा. डॉ. अशोक कांबळे, पंच अंकुश अरकीले, उध्दव माने हे उपस्थित होते. प्रास्ताविक सचिव डॉ. सुरेश लांडगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ए. जी. कांबळे यांनी केले तर आभार डॉ. सुभाष मारकड यांनी मानले. स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रा. डॉ. हरिदास बारसकर तसेच बी. पी. एड. व एम. पी. एड.चे सर्व प्राध्यापक व प्रशिक्षणार्थी यांनी परिश्रम घेतले.



**निकाल - अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ : फ्री स्टाइल :** पुरुष : ५७ किलो : युवराज मोटे , उस्मान शेख, रविराज घुले, रणजित आगलावे. ६१ किलो : नाथा शेंबडे, अतुल झांजे, बिरप्पा व्होनमाने, आकाश बुरंगे. ६५ किलो : संजय वाघमोडे, प्रताप हराळे, उमेश मिरचे, अजय मोळणी. ७० किलो : अभिजित कामटे, युवराज नितवे, अक्षय मगर, इमरान शेख. ७४ किलो : ओंकार हुलगे, लक्ष्मण सोनटक्के, महादेव कचरे, गणेश कालगाते. ग्रीको रोमन पुरुष : ५९ किलो : दत्तात्रय काळे, नेहल शिवशिंगवाले, धनाजी काळे, विजय रूपनर. ६६ किलो : कुबेर चव्हाण, मनोज गाडेकर, आबा शिंगाडे, सागर चौगुले. ७१ किलो : अजिंक्य पवार, रमेश हांडे, सुधाकर व्होनमाने, प्रदीप पोळ. ७५ किलो : तुषार झांजे, धनाजी मगर, किरण तांबवे. ८० किलो : हर्षल जगदाळे, गणेश मगर, अभिजित ठावरे. ८६ किलो : राहुल सुई, विक्रम गावडे, मोईन मुलाणी, अंगद बुलबुले. ९७ किलो : अनिल जाधव, शुभम चव्हाण, विजय तुपसुंदर. १२५ किलो : ऋषीकेश आरकिले.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

# Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2017 - 2018

लोकमत

# केबीपी महाविद्यालयाला अजिंक्यपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**बार्शी:** येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सोलापूर विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत पंढरपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाने सांघिक विजेतेपद पटकावत कै. पांडुरंग मस्कर फिरता चषक पटकावले तर मुलांमध्ये केबीपीच्याच महेश फाटे याने तर मुलींमध्येही कोमल जगदाळेने विजेतेपदासह नैपुण्य मिळविले.



**सोलापूर विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत विजेतेपद पटकावलेल्या पंढरपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या संघाला चषक प्रदान करताना प्राचार्य डॉ. एस.एस.गोरे, दिलीप मोहिते, सुरेश लांडगे, सतीश रायबान, डी.एस.फरताडे, स्मिता सुरवसे, नितीन सोहनी आदी.**

स्पर्धेत जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील ३५० मुले-मुली सहभागी झाल्या आहेत. दोन दिवसांत धावणे, उंच उडी, जम्पिंग, थ्रोईंग, रोडरेस आदी विविध क्रीडा प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेचे बक्षीस वितरण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांच्या हस्ते, संस्थेचे संचालक दिलीप मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

स्पर्धेसाठी पंच म्हणून प्रा. नितीन सोहनी, समर्थ मनुकर, मुस्ताक शेख, किरण चोकाककर, किरण चौगुले, मकरंद भुजबळ,प्रशांत तांबिले, आबा नवले, गणेश बागल, अशोक पाटील, सतीश रायबान तसेच बीपीएड व एमपीएडच्या प्रा. व प्रशिक्षणार्थींनी काम पाहिले. प्रास्ताविक व आभा स्पर्धा सचिव प्रा. डॉ. सुरेश लांडगे यांनी मानले. स्पर्धा यशस्वीपणे पा पाडण्यासाठी प्रा. डी.एस. फरताडे, स्मिता सुरवसे यांनी परिश्रम घेतले.

www.lokmat.co

Solapur Main
Page No. 9 Nov 05, 2017
Powered by: erelego.com

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2017 - 2018**

# स्टुडंट ऑलिंपिकसाठी बार्शीतील आठ विद्यार्थी

**बार्शी, ता. ३० :** येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या कर्मवीर जलतरण तलाव येथे सराव करणाऱ्या आठ विद्यार्थ्यांची स्टुडंट ऑलिंपिक राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कर्मवीर जलतरण तलाव उभारणीनंतर प्रथमच बार्शी तालुक्यातून एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या वेळी वायुपुत्र नारायण जगदाळे, संस्थेचे उपाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, सचिव जयकुमार शितोळे, सहसचिव पी. टी. पाटील, संचालक सुरेश पाटील, प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे, प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात, प्रा. राहुल जगदाळे आदी उपस्थित होते. जिल्हास्तरीय स्टुडंट ऑलिंपिक स्पर्धेत ५० मीटर, १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर अंतराच्या फ्री स्टाइल, ब्रेस्ट स्ट्रोक, बटरफ्लाय अशा प्रकारात १२ ते २१ वर्षे वयोगटात स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी क्षताक्षी आवटे, सिद्धी कुलकर्णी, सेजल कुलकर्णी, महेश शिंदे, रोहन मुंढे, बाळराजे पिंगळे, आनंद गुंड, दीक्षा पलसे यांची निवड झाली. प्रा. राहुल जगदाळे यांनी प्रास्ताविक केले. खंडू डोईफोडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. शैलेश पाटील यांनी आभार मानले.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2017 - 2018**

पुढारी

(गणेश गोडसे,बार्शी)



बार्शी : तणावमुक्ती मार्गदर्शन समुपदेशन शिशिरात उपस्थित श्रोते.

## हरवत चाललेल्या संवादामुळेच ताणतणाव : डॉ. पी. बी. ठाकरे

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

माणसामाणसांमधील हरवत चाललेला संवाद हेच खरे ताणतणावाचे कारण ठरत असून संवाद वाढल्यास ताणतणाव कमी होण्यास नक्कीच हातभार लागेल, असे प्रतिपादन प्रा. डॉ. पी.बी. ठाकरे यांनी केले.

ते बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सोलापूर विद्यापीठ व शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या तणावमुक्ती मार्गदर्शन समुपदेशन शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य एस.एस. गोरे होते.

डॉ. पी.बी. ठाकरे यांनी यावेळी तणावमुक्ती मार्गदर्शन व समुपदेशन याबाबत सविस्तर माहिती दिलीतसेच काव्य गायन करत तणावमुक्ती मार्गदर्शन व समुपदेशनसंदर्भात ताणतणाव संकल्पना, ताणतणावाचे प्रकार व कारणे, ताणतणाव दूर करण्याचे सहज व सोपे दैनंदिन मार्ग याविषयी मार्गदर्शन केले. विविध उपक्रमांमधून ताणतणाव दूर करता येतो असे सांगून दैनंदिन जीवनात प्रत्येकाने सुखी व आनंदी राहिले पाहिजे, असे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य एस.एस. गोरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात ताणतणाव व तो घालवण्याचे उपाय याविषयी मार्गदर्शन केले. दररोजच्या घटनाक्रमात ताणतणाव कसा निर्माण होतो हे उदाहरणासह स्पष्ट करत त्यासाठी काय करता येईल याची माहिती दिली. उपस्थित पाहुण्यांचा परिचय तुषार कुंभारे यांनी करून दिला. सूत्रसंचालन गणेश कोळी यांनी, तर आभार अविनाश देशमुख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशांत ठाकरे, एम.व्ही. मते यांच्यासह सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

My Solapur Edition

College of Education
Dist. Solapur
Barshi.

## Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's
# College of Education, Barshi
### Publicity 2017 - 2018

# ‘सिनेट’वर चिट्टे, गोरे, कोटी, परिचारक, पाटील विजयी

## विद्या परिषदेवर ननवरे, कोळेकर, शिखरे यांची वर्णी; ‘सुटा’चे वर्चस्व


डॉ.जी.एन. चिट्टे | डॉ.सुग्रीव गोरे | डॉ. रावसाहेब पाटील | डॉ. दत्तात्रय परिचारक | डॉ. संतोष कोटी | डॉ. अर्जुन ननवरे | डॉ. तानाजी कोळेकर


डॉ. विष्णू शिखरे | डॉ.शकिल शेख | डॉ. सुवर्णा गुंड | डॉ. आर.ए. शिंदे | डॉ. सुरय्या शेख | डॉ.मारुती शिंदे

**सोलापूर / प्रतिनिधी**

सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट अर्थात अधिसभेवर प्राचार्य मतदार संघातून डॉ. जी.एन. चिट्टे, डॉ.सुग्रीव गोरे, डॉ. दत्तात्रय परिचारक, डॉ. रावसाहेब पाटील आणि डॉ. संतोष कोटी हे विजयी झाले आहेत. तर, विद्या परिषदेवर डॉ. अर्जुन ननवरे, डॉ. तानाजी कोळेकर आणि डॉ. विष्णू शिखरे हे निवडूण आले आहेत.

विद्यापीठाच्या अधिकार मंडळासाठी सोमवारी मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर, मंगळवारी (दि. २६) सकाळपासून मतमोजणीला प्रारंभ झाला आहे. मंगळवारी रात्री उशिरापर्यंत सिनेट (अधिसभा), विद्या परिषद आणि अभ्यास मंडळे यांचे निकाल हाती आले आहेत. प्राचार्य मतदार संघाच्या खुल्या प्रवर्गाच्या पाच जागांसाठी एकूण ५३ मतदान झाले होते. हे सर्व मते वैध ठरली. यातून सोलापूर विद्यापीठ प्राचार्य संघटनेचे उमेदवार डॉ. रावसाहेब पाटील (के.एन.भिसे कॉलेज कुर्डुवाडी) यांनी ११, डॉ. जी.एन. चिट्टे (माऊली महाविद्यालय वडाळा)- १०, डॉ. सुग्रीव गोरे (शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी)- ९ आणि डॉ. दत्तात्रय परिचारक (उमा महाविद्यालय,पंढरपूर) यांनी ९ मते मिळवून विजयश्री मिळविला. तर वालचंद शिक्षण समुहाच्या डॉ. संतोष काटी हे १२ मते मिळवून विजयी झाले. शिवाजी नाईट कॉलेजचे प्राचार्य डॉ.एस.के. पवार यांना ७ मते मिळाली. पण त्यांना पराभवास सामोरे जावे लागले.

विद्या परिषदेसाठी झालेल्या मतदानाचा निकालही मंगळवारी जाहीर झाला. यात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेमध्ये ‘सुटा’चे उमेदवार शिवाजी महाविद्यालय बार्शीचे डॉ. अर्जुन ननवरे हे ७२६ मते मिळवून निवडून आले. त्यांच्या विरोधात डॉ. मीरा चव्हाण (वालचंद कॉलेज) यांना ३४८ मते मिळाल, परंतु पराभव पत्करावा लागला. या विद्या शाखे साठी एकूण ११४५ मतदान झाले होते. पैकी १ हजार ७४ मते वैध ठरली. तर ७१ मते अवैध झाली. निवडूण येण्यासाठी ५३८ इतक्या मतांची गरज होती. मानव विज्ञान विद्याशाखेमध्ये ‘सुटा’चे उमेदवार डॉ. तानाजी कोळेकर (दयानंद कॉलेज) हे ७५९ मते मिळवून विजयी झाले. त्यांच्या विरोधातील डॉ. एम.डी. शिंदे (वालचंद) यांना ३१० मतांवर समाधान मानत पराभवास सामोरे जावे लागले. या विद्याशाखेसाठी एकूण ११४५ मतदान झाले होते. पैकी १ हजार ६० मते वैध ठरली. ७६ मते अवैध झाली. निवडूण येण्यासाठी ५३५ मतांची गरज होती.

आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेमध्येही ‘सुटा’चे उमेदवार डॉ. विष्णू शिखरे (शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी) यांनी ७१५ मते घेत विजयश्री खेचला. त्यांच्या विरोधात डॉ. आयेशा रंगरेज (कस्तुरबाई शिक्षणशास्त्र कॉलेज) यांना ३१० मिळाली, परंतु पराभव पत्कारावा लागला. सदर विद्याशाखेसाठी एकूण ११४५ मतदान झाले होते. पैकी १ हजार २५ वैध ठरले. १२० मते अवैध ठरली. विजयी होण्यासाठी ५१३ मतांची आवश्यकता होती. दरम्यान, विद्यापीठ शिक्षक मतदार संघाचा निकाल राखीव ठेवण्यात आला असून तो बुधवारी जाहीर होणार आहे.

### अभ्यास मंडळावर यांची बाजी

मराठी अभ्यास मंडळासाठी एकूण २९ मतदान झाले होते. पैकी २८ मते वैध तर, एक मत अवैध ठरले. यातून ‘सुटा’चे उमेदवार डॉ. आर.ए. शिंदे (माढा महाविद्यालय)- १०, डॉ. सुवर्णा गुंड (माऊली महाविद्यालय, वडाळा)- ९, डॉ. शकील शेख (स्वर्णलता गांधी, वैराग)- ७ मते हे तिघे विजयी झाले. तर डॉ. के.एस. माने (सांगोला महाविद्यालय)- ५ मते यांना पराभव पत्कारावा लागला. हिंदी अभ्यास मंडळासाठी एकूण २३ मतदान झाले. सर्व मते वैध ठरली. यातून ‘सुटा’चे उमेदवार डॉ. गिरीश काशीद (झाडबुके कॉलेज, बार्शी)- ६, डॉ. सुरय्या शेख (महाडिक कॉलेज मोडनिंब)- ९ मते घेऊन निवडून आल्या. तर, वालचंदचे डॉ. मारूती शिंदे हेही ७ मते मिळून ते विजयी झाले. डॉ. अपर्णा कुचेकर (एस.एम.पी. कॉलेज, अकलुज)- ४ मते यांना पराभवास सामोरे जावे लागले.








हिन्दुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड,
भारत सरकारचा उपक्रम (संरक्षण मंत्रालय)
वायुयान प्रभाग, नासिक
ओझर टाऊनशिप डाकघर, नासिक महाराष्ट्र - 422207
फोन : 02550-275886,271024 फैक्स :02550 - 273101
इमेल : imm.nsk@hal-india.com, vasantha.kumar@hal-india.com

**खुली निविदा सूचना**

फक्त एच.ए.एल. ई-खरीद पोर्टल वर खालील वस्तुंच्या स्वदेशी विकास करणेसाठी दोन बोली प्रणाली मध्ये ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्र. | विवरण | ईएमडी |
|---|---|---|
| 2505_8828_E_20442 | [illegible] | ₹ 20,000/ |

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय**
**ई-निविदा सूचना सन २०१७-१८**
**निविदा सूचना**

आयुक्त सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांचे वतीने सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयाकडून खालील कामाकरिता बी-१ स्वरूपात दोन लिफाफा पध्दतीने (ई-निविदा) सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांचेकडील योग्य त्या वर्गातील अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे योग्य त्या वर्गातील कंत्राटदाराकडून परसेंटेज दराने ई-निविदा मागविणेत येत आहेत. वरील कामाच्या निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाचे आहेत. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २६/०९/२०१७ पासून पाहणेस उपलब्ध आहे. कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे. मा. शासनाचे निर्णय क्र. बीडीजी २०१६/प्र.क्र.-२/ इमा.२ दि. १२/०२/२०१६ च्या निर्णयानुसार Performance Security Deposit चा DDची छायांकित प्रत


College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2018 - 2019**

लोकमत

# बार्शीत 'बोल अनुभवां'तून धडे




बार्शी येथे अहवालाचे प्रकाशन करताना प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, डॉ. पी. ए. पाटील, डॉ. व्ही. पी. शिखरे, एस. डी. भिलेगावकर आदी.

लोकमत न्यूज नेटवर्क

**बार्शी :** शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सराव पाठ विभागाच्या वतीने बी. एड. सराव अध्यापन व छात्रसेवाकाल अहवाल प्रकाशन व प्रत्याभरण समारंभ पार पडला. त्यानिमित्त 'बोल अनुभवां'चे या माध्यमातून भावी शिक्षकांना धडे देण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते. प्रास्ताविक डॉ. पी. ए. पाटील यांनी केले. छात्रसेवाकाल उपक्रमात आलेले अनुभव प्रशिक्षणार्थी प्रतिक्षा जगदाळे, पूजा जोशी, हेमलता पाटील व अश्विनी देशमुख यांनी मनोगतातून व्यक्त केले. सहा आठवड्यांच्या कालावधीत साधना कन्या प्रशाला, जिजामाता विद्यामंदिर व ॲड. दिलीपराव सोपल विद्यालय या तिन्ही शाळेत राबविलेल्या सराव अध्यापन व छात्रसेवाकाल उपक्रमाच्या लिखित अहवालाचे याप्रसंगी प्राचार्य डॉ. गोरे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. अभिरुप मुख्याध्यापक बी. एड. प्रशिक्षणार्थी मंडलिक भूषण, श्रद्धा जोशी व विनम्रता गाढवे यांनी अहवालाचे सादरीकरण केले. डॉ. व्ही. पी. शिखरे, एस. डी. भिलेगावकर यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. एम. व्ही. मते, डॉ. पी. ए. पाटील, डॉ. एम. एस. डिसले उपस्थित होते. प्रतिभा चव्हाण हिने सूत्रसंचालन केले.


Hello Solapur Gramin
Page No. 4 Oct 09, 2018
Powered by: erelego.com


College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s

# College of Education, Barshi

**Publicity 2018 - 2019**

पुढारी



बार्शी : अहवालाचे प्रकाशन करताना मान्यवर.

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ‘बोल अनुभवांचे’ कार्यक्रम उत्साहात

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे सराव पाठ विभागाच्यावतीने बी.एड्. सराव अध्यापन व छात्रसेवाकाल अहवाल प्रकाशन व प्रत्याभरण समारंभ झाला. त्यानिमित्त ‘बोल अनुभवांचे’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे हे होते.

प्रास्ताविक डॉ. पी.ए. पाटील यांनी केले. छात्रसेवाकाल उपक्रमात आलेले अनेक अनुभव प्रशिक्षणार्थी प्रतीक्षा जगदाळे, पूजा जोशी, हेमलता पाटील व अश्विनी देशमुख यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

सहा आठवड्याच्या कालावधीत साधना कन्या प्रशाला, बार्शी, जिजामाता विद्यामंदिर, बार्शी व ॲड. दिलीपराव सोपल विद्यालय, बार्शी या तीनही शाळेत राबविलेल्या सराव अध्यापन व छात्रसेवाकाल उपक्रमाच्या लिखित अहवालाचे याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले तसेच तीनह शाळेतील अभिरूप मुख्याध्यापव बी.एड्. प्रशिक्षणार्थी मंडलिक भूषण श्रद्धा जोशी व विनम्रता गाढवे यांर्न अहवालाचे सादरीकरण केले. डॉ व्ही पी. शिखरे, एस. डी. भिलेगावक यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी सराव पाठ विभागप्रमुख डॉ. एम.व्ही. मते डॉ. पी. ए. पाटील व डॉ. एम.एस डिसले, सर्व बी.एड्. प्रशिक्षणार्थींनी परिश्रम घेतले.

Solapur Edition
7 Oct, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ‘वाचन प्रेरणा दिन’

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात बी.एड्. अग्निकुलाच्या वतीने माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस ‘वाचन प्रेरणा दिन’ म्हणून साजरा करण्यात आला. तसेच जागतिक हस्तस्वच्छतादिन म्हणून साजरा करण्यात आला.

त्यानिमित्त महाविद्यालयात विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते. यावेळी व्यासपीठावर बी.एड्. विभागप्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर, कुल मार्गदर्शक डॉ. व्ही.पी. शिखरे व सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. एम.व्ही मते आदी उपस्थित होते.



**बार्शी : उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात.**

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणा दिनानिमित्त बी.एड्. प्रशिक्षणार्थींनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्घाटनही यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागताच्या छोटेखानी कार्यक्रमात बुके नाही, तर बुक भेट म्हणून प्रमुख पाहुण्यांना आतापर्यंत भारतरत्न सन्मानाने गौरविण्यात आलेल्या ४५ थोर व्यक्तींविषयींची माहिती असलेले ‘आपले भारतरत्न’ हे पुस्तक भेट देण्यात आले.

ग्रंथपाल सुनील जाधव यांनी ग्रंथालयातील विविध वर्तमानपत्र, विविध संदर्भ पुस्तके व मासिके इ.ची माहिती दिली.

शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा परामर्श घेतला. महापुरूषांच्या प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचा उद्देश व दिवसभरातील विविध उपक्रमांची रुपरेषा ज्योती ढेरे हिने प्रास्ताविकात मांडली. आभार नीलम पवार यांनी, तर सूत्रसंचालन पूजा जोशी यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विभागप्रमुख सर्व प्राध्यापक, प्रशिक्षणार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Solapur Edition
21 Oct, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education
Dist. Solapur
Barshi.

www.dainiksurajya.com

DISTRICT



## शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतली शालेय कामकाजाची माहिती

**मोडनिंब** : शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ३६ प्रशिक्षणार्थींनी अरण येथील संत सावतामाळी विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व तुळशी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विविध उपक्रमांची माहिती घेतली. बी.एड. प्रशिक्षणार्थीसाठी प्रशिक्षणाचा भाग तसेच या भावी शिक्षकांना भविष्यात शाळा चालविताना व शाळेत गेल्यावर कराव्या लागणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती होण्यासाठी म्हणून या अभ्यासभेटीचे नियोजन केल्याची माहिती बी.एड. डिपार्टमेंटचे हेड डॉ.सदानंद भिलेगावकर यांनी संत सावतामाळी विद्यालयात बोलताना दिली. उत्कृष्ट विद्यालय व आदर्श प्राथमिक शाळामधे चालणारे नवोपक्रम, शालेय कामकाजातील बारकावे, विद्यार्थी शिक्षक सुसंवाद, शालेय रुटीन कामकाज, भौतिक सुविधा, ई-लर्निंग,डिजिटल क्लासरूम, शाळेतील प्रयोगशाळा याची माहिती प्रत्यक्षात देण्यात आली. यावेळी डॉ. रविराज फुरडे, डॉ. महादेव डिसले, केंद्रप्रमुख विलास काळे, मुख्याध्यापक औदुंबर भांगे, प्राचार्य हरिदास रणदिवे, पर्यवेक्षक सुरेश मोरे, मुख्याध्यापिका शांता वाघमोडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख उत्तमराव सावंत, तुळशी शाळेचे मुख्याध्यापक राजन सावंत, गोरख राऊत यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षिका उपस्थित होते. यावेळी उत्तमराव सावंत, संजय शिंदे, तानाजी इंगळे, आबासाहेब सरडे यांनी प्रशिक्षणार्थींना विविध प्रकारच्या उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. आभार डॉ. फुरडे यांनी मानले.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2018 - 2019**

**पुढारी**

# बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेत १११ शोधनिबंध सादर

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी व सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. उच्च शिक्षणातील नवीन उपागम हा या परिषदेचा मुख्य विषय होता. या परिषदेत शिक्षक शिक्षण आणि शारीरिक शिक्षण कार्यक्रमातील नवीन उपागम, अध्ययन, अध्यापन, अभ्यासक्रम, संशोधनेमूल्यमापन प्रक्रिया आदी घटकातील नवीन उपागम या उपविषयावर आधारित एकूण १११ शोधनिबंधाचे पुस्तक रुपात प्रकाशन करण्यात आले.

या परिषदेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालय, गोपाळपूर येथील प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे उपस्थित होते.अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसचिव पी.टी. पाटील होते. व्यासपीठावर सोलापूर विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. एस.के.पवार, संस्थेचे खजिनदार प्रा.डी.एस. रेवडकर, सी.एस.मोरे, जयकुमार शितोळे, सुरेश पाटील, डॉ. एच.एन.जगताप, प्राचार्य डॉ. एस.के. पाटील, प्राचार्य एम. कृष्णमूर्ती, आंतरविद्याशाखीय अभ्यासचे अधिष्ठाता व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस.गोरे उपस्थित होते.



**बार्शी : शोधनिबंधांच्या ग्रंथाचे प्रकाशन करताना उपस्थित मान्यवर.**

प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत प्राचार्य डॉ.एस.एस.गोरे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. व्ही.पी. शिखरे यांनी करुन दिला. राष्ट्रीय परिषदेचा हेतू समन्वयक डॉ.एम.व्ही.मते यांनी विशद केला.

डॉ.बी.पी.रोंगे यावेळी बोलताना म्हणाले की, संशोधन हा दैनंदिन जीवनाचा विषय आहे. उच्च शिक्षणातील नाविन्यपूर्ण बाबी उपयोजनात आणण्यासाठी संशोधन महत्त्वाचे असून संशोधनातूनच उद्योजकतासंबंधित कौशल्य आत्मसात होतात. विद्यार्थ्यांनी भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संशोधन करणे गरजेचे आहे. अध्यक्षीय समारोपात पी.टी.पाटील यांनी विद्यार्थी केंद्रित शिक्षण प्रणालीवर भर द्यावा, असे सांगितले. आभार एस.डी. भिलेगावकर यांनी मानले, तर सूत्रसंचालन प्रा.डॉ.पी.पाटील यांनी केले.

द्वितीय सत्रात साधन व्यक्ती डॉ.एच.एन. जगताप यांनी उच्च शिक्षणातील नवीन उपागमावर उद्बोधन केले. या परिषदेस शिक्षण क्षेत्रातील विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिषदेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस.गोरे, समन्वयक प्रा.डॉ.एम.व्ही.मते, सहसमन्वयक डॉ.ए.जी.कांबळे व एम.एस. डिसले, विविध विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्रशिक्षणार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

My Solapur Edition
21 Dec, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2018 - 2019**

लोकमत

## राष्ट्रीय परिषदेत १११ शोधनिबंध सादर

बार्शी : येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय व सोलापूर विद्यापीठातर्फे घेतलेल्या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत १११ शोधनिबंध सादर करण्यात आले. 'उच्च शिक्षणातील नवीन उपागम' हा या परिषदेचा मुख्य विषय होता. अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसचिव पी. टी. पाटील होते. प्रमुख पाहुणे विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रेगे, सोलापूर विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. एस. के. पवार, प्रा. डी. एस. रेवडकर, प्राचार्य डॉ. सी. एस. मोरे, कार्यकारिणी सदस्य जयकुमार शितोळे, सुरेश (बप्पा) पाटील, डॉ. एच. एन. जगताप सिनेट सदस्या डॉ. भारती रेवडकर, प्राचार्य डॉ. एस के. पाटील, प्राचार्य एम. कृष्णमूर्ती, आंतर विद्याशाखीय अभ्यासचे अधिष्ठाता व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते. दुसऱ्या सत्रात डॉ. एच. एन. जगताप यांनी उद्बोधन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, परिचय डॉ. व्ही. पी. शिखरे, परिषदेचा हेतू डॉ. एम. व्ही. मते यांनी विशद केला. संचालन प्रा. डॉ. पी. ए. पाटील, आभार प्रा. डॉ. एस. डी. भिलेगावकर यांनी मानले.यासाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, समन्वयक प्रा. डॉ. एम. व्ही. मते, सहसमन्वयक डॉ. ए. जी. कांबळे व डॉ. एम. एस. डिसले यांनी

Hello Solapur Gramin
Page No. 4 Dec 24, 2018
Powered by: erelego.com

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2018 - 2019**

पुढारी

News By
गणेश गोडसे,बार्शी

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय युवादिन उत्साहात

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय युवादिन, राजमाता जिजाऊ जयंती, स्वामी विवेकानंद जयंती या त्रिवेणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक प्रा. राहुल पालके हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे नॅक समन्वयक प्रा. डॉ. व्ही.पी. शिखरे होते. यावेळी बी.पी.एड्. विभागप्रमुख डॉ. एस.एम. लांडगे, बी.एड्. विभागप्रमुख डॉ. एस.डी. भिलेगावकर, कार्यक्रम समन्वयक डॉ. एम.एस. डिसले, प्रा. बी.टी. गुंड, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. एम.व्ही. मते, डॉ. आर.ए. फुरडे, डॉ. पी.ए. पाटील आदी उपस्थित होते.



**बार्शी : येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय युवादिन, राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली.**

प्रारंभी डॉ. शिखरे यांनी जिजाऊ वंदना सादर केली. प्रास्ताविक मोहिनी गायकवाड हिने केले. पाहुण्यांचा परिचय सोमनाथ वेदपाठक यांनी करुन दिला.

यावेळी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या ११६ व्या जयंतीनिमित्त संस्थेने आयोजित वेगवेगळ्या सांस्कृतिक स्पर्धामध्ये यश संपादन केलेल्या प्रियंका जगदाळे, हेमलता पाटील, पूजा जोशी यांचा सत्कार करण्यात आला. मोनिका देशपांडे व विशाल माने यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्यावर आधारित समयोचित विचार व्यक्त केले.

प्रा. पालके म्हणाले की, विद्यार्थ्यांनी जीवनात ध्येय व सकारात्मक दृष्टिकोन जोपासावा, असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. व्ही.पी. शिखरे यांनी ध्येयाविना जीवन अशक्य असल्याचे प्रतिपादन केले. आभार प्रियंका मुळे यांनी, तर सूत्रसंचालन स्नेहल भांडवलकर यांनी केले.

Solapur Edition
13 Jan, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education
Dist. Solapur
Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2018 - 2019**

पुढारी

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात बेसबॉल स्पर्धा

**बार्शी (तालुका प्रतिनिधी) :** बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सोलापूर विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन बेसबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.सदर स्पर्धेमध्ये मुलांच्या ८ संघांनी सहभाग नोंदवला होता. तसेच सर्व स्पर्धा बाद पध्दतीने खेळवण्यात आल्या. सदर स्पर्धेत प्रथम क्रमांक : छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर, द्वितीय क्रमांक : संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर, तृतीय क्रमांक : वालचंद महाविद्यालय, सोलापूर असे यश मिळवण्यात आले. सदर स्पर्धेतून सोलापूर विद्यापीठाचा बेसबॉल संघ निवड समितीचे अध्यक्ष प्रा. संतोष गवळी, प्रा. महादेव वाघमारे, प्रा. दत्ता बिराजदार व प्रा.डॉ. सुभाष मारकड यांनी निवडला. स्पर्धेचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार प्रा. दिलीप रेवडकर यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे हे होते. यावेळी प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात, प्रा.डॉ.डी.एम.मोहिते, प्रा. प्रशांत तांबिले, प्रा.एम.ए.भुजबळ, प्रा.एस.एस.पाटील व डॉ.एच.के. बारसकर उपस्थित होते. स्पर्धा पार पाडण्यासाठी सोलापूर बेसबॉल संघटनेचे पंच मंडळाचे प्रशांत कदम, शिवाजी वसपटे व त्यांचे सहकारी यांचे सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ.जी. कांबळे यांनी करुन दिला. उपस्थितांचे आभार स्पर्धा सचिव प्रा.डॉ. सुरेश लांडगे यांनी मानले. स्पर्धेसाठी प्रा.बी.टी. गुंड व बी.पी.एड. व एम.पी.एड.चा सर्व स्टाफ व प्रशिक्षणार्थी यांनी परिश्रम घेतले.

Solapur Edition
15 Jan, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education, Dist. Solapur, Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2018 - 2019**

पुढारी

News By
गणेश गोडसे,बार्शी

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात कलाम विज्ञान मंडळाची स्थापना

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचालित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व कलाम विज्ञान मंडळ स्थापना करण्यात आली.

प्रमुख पाहुणे म्हणून न्यू कॉलेज, कोल्हापूर येथील सेवानिवृत्त सहयोगी प्राध्यापक डॉ. आर.एस. पाटील हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे हे होते. प्रास्ताविक प्रियंका जगदाळे यांनी केले. पाहुण्यांचा डॉ. व्ही.पी. शिखरे यांनी करून दिला.

कार्यक्रमाचे औचित्य साधून बी.एड्. प्रशिक्षणार्थींनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यावर आधारित तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी मोनिका देशपांडे व यशवंत चव्हाण यांची अनुक्रमे मनोगते झाली.

डॉ. पाटील म्हणाले की, कलाम विज्ञान मंडळाची स्थापना हा स्तुत्य उपक्रम आहे. यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते. गुणवत्तापूर्ण शिक्षण हे वैज्ञानिक दृष्टिकोन व नैतिक क्षमता विकसित करते. माझा असा विश्वास आहे की, गुणवत्तापूर्ण शिक्षणाद्वारे विकसित झालेला वैज्ञानिक दृष्टिकोन व सामाजिक, आर्थिक समस्या दूर करण्यास उपयुक्त ठरतो. संस्थात्मक उत्कृष्ठता हे अंतर्गत चालकांचे फलित आहे. आपल्या विद्यार्थ्यांनी अध्ययनामध्ये उंच भरारी घेतली पाहिजे. सहजीवनासाठी अध्ययन हे आपल्या जीवनाचे ध्येय असले पाहिजे, नेहमी सत्याचा शोध घेतला पाहिजे, नॅनो तंत्रज्ञान आपणा सर्वांसाठी आकर्षण ठरत आहे. त्यामुळे संशोधन वृत्ती जोपासण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करावा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, समन्वयक प्रा. डॉ. व्ही.पी. शिखरे, बी.एड्. विभागप्रमुख डॉ. एस.डी. भिलेगावकर, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. एम.व्ही. मते, डॉ. एम.एस. डिसले, डॉ. पी.ए. पाटील उपस्थित होते.


बाळाचे दांत
सुलभतेने
येण्यासाठी उपयुक्त
डेन-टॉनिक®

नकलेपासून सावधान!
होमिओपाथिक गोळ्या
होमिओ लॅबोरेटरीज्, पुणे.
संपर्क : 8652756688
सोलापूर : अरिहंत एजन्सी : 08237-134563
पंढरपूर : वोरा मेडीकल : 02186-224455
सोलापूर : के नागदेव एजन्सी : 0217-2743231
अक्कलकोट : भारत मेडीकल स्टोअर्स : 02181-220375


Solapur Edition
6 Jan, 2019 Page No. 1

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2018 - 2019**

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात विशाखा वाङ्‌मय मंडळाचे उद्‌घाटन

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'भूगोल दिन, मकर संक्रांत व विशाखा वाङ्‌मय मंडळ उद्‌घाटन' या त्रिवेणी कार्यक्रमांचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते.

श्री शिवाजी महाविद्यालयाचे सहाय्यक प्रा. सुधीर पैकेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रा. डॉ. विक्रांत शिंदे यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस.गोरे होते. प्रास्ताविक कोमल कांबळे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ.एम.एस. डिसले यांनी करून दिला. कार्यक्रमाचे औचित्य साधून बी.एड. प्रशिक्षणार्थीनींनी भूगोल दिन, मकर संक्रांत व मराठी भाषा संवर्धन पंधरवडा यावर आधारित तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्‌घाटन मान्यवरांकडून करण्यात आले.

कर्मवीर प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये महाविद्यालयात यश संपादन केलेल्या प्रशिक्षणार्थींचा सत्कार करण्यात आला. यात प्रथम क्रमांक- प्रदीप आगलावे, द्वितीय क्रमांक विभागून अमृता माळी व पवन जगदाळे व तृतीय क्रमांक- अश्विनी भोसले असे यश संपादन केले. संस्थांतर्गत योगासने स्पर्धेत खुल्या गटात प्रथम क्रमांक मिळवलेल्या प्रियंका मुळे यांचा सत्कार करण्यात आला.

प्रा. सुधीर पैकेकर म्हणाले की, सद्यस्थितीत भूगोल विषयाबाबत सर्वत्र उदासिनता आहे. भूगोल विषयाची व्याप्ती मोठी असल्याने वर्गाबरोबरच निसर्गाच्या सानिध्यात भूगोल अध्ययन आवश्यक आहे. रोजगाराच्या अनेक संधी भूगोल अभ्यासाने मिळतात.

अमोल कदम व स्वप्नाली मोहिते यांनी भूगोल सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे सादरीकरण केले. आभार स्नेहल बोराडे यांनी, तर सूत्रसंचालन मोनिका देशपांडे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, बी.एड. विभाग प्रमुख डॉ. एस.डी. भिलेगावकर, नॅक समन्वयक प्रा.डॉ.व्ही.पी.शिखरे, कार्यक्रम समन्वयक डॉ.एम.एस. डिसले व डॉ. आर.ए. फुरडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.एम.व्ही. मते आदी उपस्थित होते.

College of Education Dist. Solapur Barshi.

Solapur Edition
16 Jan, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2018 - 2019**

पुढारी

News By
गणेश गोडसे,बार्शी

## कर्मवीर केसरी कुस्ती स्पर्धेत १२६ मल्लांचा सहभाग

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या ११६ व्या जयंतीनिमित्त संस्थांतर्गत कर्मवीर कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेत संस्थेच्या विविध शाखांतून १०९ पुरुष मल्ल व १७ महिला मल्ल अशा १२६ मल्लांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धा प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, वरिष्ठ महाविद्यालयीन व कर्मवीर केसरी कुस्ती स्पर्धा सिनिअर व ज्युनिअर पुरुष व महिला गटात घेण्यात आल्या.




बार्शी : कुस्ती स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांसमवेत उपस्थित मान्यवर.

यातील प्रत्येक गटातून प्रत्येक वजन गटामध्ये विजयी व उपविजयी मल्लांना बक्षिसांची रोख रक्कम व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यामध्ये पुरुष सिनिअर कर्मवीर केसरी गटात एम.पी.एड. भाग दोनमधील प्रशिक्षणार्थी सोमनाथ वाघमोडे यांनी प्रथम क्रमांक, तर युवराज मोटे यांनी द्वितीय क्रमांक संपादन केला. तर महिला सिनिअर कर्मवीर केसरी स्पर्धेत माधुरी मोरे यांनी प्रथम, तर शेख नेहा यांनी द्वितीय क्रमांक संपादन केला.

पुरुष ज्युनिअर केसरीपर्यंत मगरे किरण यांनी प्रथम, तर अनिकेत होदडे यांनी द्वितीय क्रमांक संपादन केला. महिला ज्युनिअर कर्मवीर केसरी स्पर्धेत प्रतिक्षा नाईकवाडे यांनी प्रथम, तर निकीता ओव्हाळ यांनी द्वितीय क्रमांक संपादन केला. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे यांच्या हस्ते झाले. शिवछत्रपती पुरस्कार विजेते नागनाथ देशमुख, प्राचार्य डॉ.एस.एस.गोरे उपस्थित होते. नागनाथ देशमुख यांनी कुस्ती खेळाविषयी उपस्थित मल्लांना शास्त्रशुध्द माहिती दिली. प्राचार्य डॉ.एस.एस.गोरे म्हणाले की, संस्थेमार्फत विद्यालयांना अनेक क्रीडा सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात असल्याचे ते म्हणाले. स्पर्धेचे बक्षीस वितरण प्राचार्य डॉ. एस.एस.गोरे व माजी नगरसेवक कुमार डमरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमासाठी बी.पी.एड. विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुरेश लांडगे, प्रा.जी.एस.फरताडे, प्रा. डॉ. ए. जी कांबळे, प्रा. बी. टी. गुंड, प्रा. एस. एस. सुरवसे, प्रा.एस.ए.सावळे, अमोल पालके, अनुप जाधव यांच्यासह बी.पी.एड. व एम.पी.एड. विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. आभार प्रा.डॉ.एस.एस.मारकड यांनी मानले.

My Solapur Edition
25 Jan, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education
Dist. Solapur
Barshi.

# Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's
# College of Education, Barshi
## Publicity 2018 - 2019

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मतदानाबाबत जागृती

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ऋषीकेत शेळके, प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, नायब तहसीलदार मुरलीधर भोये, आकाश गुळवे, नोडल अधिकारी प्रा. डॉ. एम.व्ही. मते, समन्वयक प्रा. डॉ. पी.ए. पाटील, डॉ. एस.डी. भिलेगावकर, प्रा.डॉ.व्ही. पी.शिखरे, प्रा.डॉ.एम.एस. डिसले, प्रा.डॉ.आर.ए.फुरडे, प्रा.सौ.एस.एस सुरवसे, प्रा.डॉ.एल.आय. राठोड आदी उपस्थित होते. 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो' या विषयावर आधारित महाविद्यालयातील बी.एड प्रशिक्षणार्थींनी शहरात रॅली काढून मतदार जनजागृती संदर्भात पथनाट्य सादरीकरण केले. लोकांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले. यामध्ये ज्योती ढेरे, निलम पवार, अबोली खेडकर, जयश्री पाचकवडे, प्रिती मुठाळ, प्रतिभा चव्हाण या बी.एड. प्रशिक्षणार्थिनींनी सहभाग नोंदविला.



बार्शी : विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून मतदानाबाबत जागृती केली.

मतदार जनजागृती संदर्भात महाविद्यालयातील बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांनी निबंधलेखन स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. मतदानाचा हक्क बजावताना कर्तव्य आणि जागरुकता, राष्ट्रीय मतदार दिन, मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो असे तीन विषय देण्यात आले होते. यामध्ये ज्योती ढेरे, अमृता माळी, योगिता कातुरे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांव संपादन केला. मतदार जागरुकता, राष्ट्री मतदार दिन असे दोन विषय देण्यात आले होते. यामध्ये शीतल लोंढे, जयश्र पाचकवडे, अमृता माळी यांनी अनुक्रम प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक संपाद केला.

Solapur Edition
1 Feb, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education
Dist. Solapur
Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2018 - 2019

लोकमत



बार्शी येथे शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने आयोजित कर्मवीर कुस्ती स्पर्धेत विजेतेपद पटकावलेल्या खेळाडूंसोबत नंदन जगदाळे, नागनाथ देशमुख, डॉ.एस.एस. गोरे, सुरेश लांडगे, जी.एस. फरताडे, डॉ.कांबळे, बी.टी.गुंड, एस.एस.सुरवसे, एस.ए. सावळे, अमोल पालके, अनुप जाधव, एस.एस.मारकड आदी.

# सोमनाथ वाघमोडे, माधुरी मोरे प्रथम

## बार्शी: कुस्ती स्पर्धेत १०१ पुरुष, १७ महिला मल्लांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**बार्शी** : श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या ११६ व्या जयंतीनिमित्त शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या संस्थांतर्गत कर्मवीर कुस्ती स्पर्धेत वरिष्ठ गटात सोमनाथ वाघमोडे, महिला वरिष्ठ गटात माधुरी मोरे, कनिष्ठ गटात किरण मगरे व प्रतीक्षा नाईकवाडे यांनी कर्मवीर चषक पटकावला.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या कर्मवीर जिम्नॅशियम हॉल येथे या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. सदर कुस्ती स्पर्धेत संस्थेच्या विविध शाखेतून १०१ पुरुष मल्ल व १७ महिला मल्लांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धा प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, वरिष्ठ महाविद्यालयीन व कर्मवीर चषक कुस्ती स्पर्धा सिनियर ज्युनियर पुरुष महिला गटात घेण्य आल्या. या स्पर्धेचा शुभारंभ नं जगदाळे यांच्या हस्ते व शिवछत्रप पुरस्कार विजेते नागनाथ आप देशमुख यांच्या उपस्थितीत करण्य आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए एस. गोरे हे उपस्थित होते.

यासाठी बी.पी.एड. कॉले विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुरेश लांडगे, प्र जी. एस. फरताडे, प्रा. डॉ. कांबळे, प्र बी. टी. गुंड , प्रा. एस. एस. सुरव प्रा. एस. ए. सावळे, अमोल पाल अनुप जाधव यांच्यासह बी.पी.एड. व एम.पी.एड. विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक स्पर्धा सचिव प्रा. डॉ. सुरेश लांडगे तर आभारप्रदर्शन प्रा.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

Solapur Main
Page No. 12 Feb 02, 2019
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2018 - 2019**

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतली शालेय कामकाजाची माहिती



मोडनिंब,दि. ३१ : शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ३६ प्रशिक्षणार्थींनी अरण येथील संत सावतामाळी विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व तुळशी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विविध उपक्रमाची माहिती घेतली. बीएड प्रशिक्षणार्थीसाठी प्रशिक्षणाचा भाग तसेच या भावी शिक्षकांना भविष्यात शाळा चालविताना व शाळेत गेल्यावर कराव्या लागणाऱ्या उपक्रमाची सविस्तर माहिती होण्यासाठी म्हणून या अभ्यास भेटीचे नियोजन केल्याची माहिती बिएड डिपार्टमेंटचे हेड डॉ.सदानंद भिलेगावकर यांनी संत सावतामाळी विद्यालयात बोलताना दिली.उत्कृष्ट विद्यालय व आदर्श प्राथमिक शाळामधे चालनारे नवोपक्रम, शालेय कामकाजातील बारकावे, विद्यार्थी शिक्षकसुसंवाद,शालेय रुटीन कामकाज,भौतिक सुविधा,

ईलर्निंग, डिजिटल क्लासरूम, शाळेतील प्रयोगशाळा याची माहिती प्रत्यक्षात देण्यात आली.

यावेळी डॉ रविराज फुरडे ,डॉ महादेव डिसले, केंद्र प्रमुख विलास काळे, मुखध्यापक औदुंबर भांगे,प्राचार्य हरिदास रणदिवे, पर्यवेक्षक सुरेश मरे,मुख्याध्यापिका शांता वाघमोडे, सास्कृतिक विभाग प्रमुख उत्तमराव सावंत , तुळशी शाळेचे मुख्याध्यापक राजन सावंत, गोरख राऊत यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षिका उपस्थित होते यावेळी उत्तमराव सावंत, संजय शिंदे, तानाजी इंगळे, आबासाहेब सरडे यांनी प्रशिक्षणार्थींना विविध प्रकारच्या उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. आभार डॉ फुरडे सरांनी मानले.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आंतरवासिता शिबिर

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सराव अध्यापन व शालेय आंतरवासिता प्रात्यक्षिकांतर्गत अहवाल प्रकाशन व प्रत्याभरण कार्यक्रम उत्साहात झाला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे होते. बी.एड्. प्रथम व द्वितीय वर्षाच्या द्वितीय व चतुर्थ सत्रातील सराव अध्यापन व शालेय आंतरवासिता प्रात्यक्षिक संत तुकाराम विद्यालय, पानगाव व किसान कामगार विद्यालय, उपळाई ठोंगे येथे आयोजिले होते. बी.एड्. प्रशिक्षणार्थींनी सराव पाठ घेणे तसेच कार्यानुभव, शारीरिक शिक्षण, मूल्यशिक्षण, विविध शालेय समित्यांचा अभ्यास यासंदर्भातील माहिती घेणे यासाठी हा उपक्रम आयोजिला होता. विविध उपक्रमांची संकलित माहिती व फोटो गोळा करून अहवाल स्वरुपात प्रकाशन करण्यात आले. या प्रात्यक्षिकाची माहिती पवन जगदाळे व पूजा जोशी यांनी विषद केली. पल्लवी क्षीरसागर व विशाल माने यांनी प्रातिनिधीक स्वरुपात शालेय आंतरवासिता प्रात्यक्षिकात आलेले अनुभव विशद केले. विविध स्पर्धांतील यशस्वीतांना प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये निबंध लेखन स्पर्धेत ज्योती ढेरे, अश्विनी भोसले व अश्विनी देशमुख यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. पत्रलेखन स्पर्धेत प्रियंका मुळे, अश्विनी ईटकर व अमृता माळी यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. रांगोळी स्पर्धेत दयानंद लोकरे, शीतल लोंढे, गीतांजली पाटील यांनी अनुक्रमे

Solapur Edition
7 Apr, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

पुढारी

प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला, तर उत्तेजनार्थ म्हणून जयश्री पाचकवडे व ज्योती ढेरे यांनी क्रमांक मिळविला. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे म्हणाले की, भावी शिक्षकांना शालेय आंतरवासिता कार्यक्रम अत्यावश्यक आहे. या उपक्रमातून शिक्षक होण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्य, क्षमता विकसित होतात. प्रत्यक्ष अनुभवाद्वारे ज्ञान ग्रहण करता येते. विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया साधली जाते त्यातूनच परिणामकारक अध्ययन अध्यापन प्रक्रिया होते. प्रास्ताविक डॉ. एम.व्ही. मते यांनी केले.

Solapur Edition
7 Apr, 2019 Page No. 2
Powered by : erelego.com

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2018 - 2019**

पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात पदवी प्रदान कार्यक्रम उत्साहात

**बार्शी (तालुका प्रतिनिधी ) :** बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड., बी.पी.एड., एम.एड. व एम.पी.एड. द्वितीय वर्षातील प्रशिक्षणार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.एस. गोरे होते. कार्यक्रमाचा प्रारंभ कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने झाला. प्रास्ताविक बी.एड. विभाग प्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर यांनी केले. स्मिता मासाळ, विकास पाटील, जयश्री पाचकवडे, यशवंत चव्हाण व सुरेखा जाधव यांनी मनोगते व्यक्त केली. महाविद्यालयातील भौतिक व मानवी सुविधांमुळेच आमच्या व्यक्तिमत्व विकासात भर पडली, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. 'नॅक' समन्वयक डॉ.व्ही.पी. शिखरे यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.एस.एस. गोरे म्हणाले की, द्विवार्षिक शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमातून समृद्ध शिक्षक निर्माण करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना तात्विक, प्रात्यक्षिक व विविध उपक्रम सहभागाद्वारे भावी शिक्षक म्हणून कार्य करण्यासाठी आवश्यक ते ज्ञान व कौशल्ये विकसित करण्याचा या महाविद्यालयात प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे. बी.एड. विभागातील प्रशिक्षणार्थींनी विविध विभागांतून नैपुण्य संपादन केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. आभार प्रा.एस.ए. सावळे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.एल.आय. राठोड यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांनी परिश्रम घेतले.

College of Education Dist. Solapur Barshi.

पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी

# देशाचे संरक्षण करणाऱ्या जवानांबद्दल आदर बाळगा

## कारगिल विजयदिनानिमित्त निवृत्त कर्नल बोंगे यांचे बार्शीत आवाहन

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

आपले लष्करी जवान अहोरात्र परिश्रम करून देशाचे संरक्षण करत असतात. त्यांच्याबद्दल प्रत्येक देशवासीयाने आदर बाळगायला हवा, असे प्रतिपादन सेवानिवृत्त लेप्टनंट कर्नल एच. एल. बोंगे यांनी केले.

बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड्. कक्षामध्ये कारगिल विजयदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते. यावेळी बी.एड्. विभागप्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर, बी.पी. एड्. विभागप्रमुख डॉ. सुरेश लांडगे व कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. पी. ए. पाटील उपस्थित होते.



**बार्शी : उपस्थितांना मार्गदर्शन करताना निवृत्त कर्नल एच. एल. बोंगे.**

कार्यक्रमाच्या प्रारंभी कारगील युद्धामध्ये शहीद झालेल्या वीरजवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रास्ताविक अमृता माळी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय मोनिका देशपांडे यांनी करुन दिला.

निवृत्त लेप्टनंट कर्नल बोंगे यांनी कारगिल विजयदिनानिमित्त प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी बी.एड्. प्रशिक्षणार्थींना सैन्यदलातील भरती प्रक्रिया, विविध युद्धकला, प्रशिक्षण, सैनिकी शाळा व महाविद्यालये तसेच नोकरीची संधी याविषयी मार्गदर्शन केले. कारगिल युद्धावेळी झालेल्या घडामोडी उपस्थितांसमोर मांडल्या. 'ऑपरेशन कारगिल' बाबत सविस्तर आढावा विषद केला.

ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी जीवनात संधी शोधली पाहिजे, स्वतः च्या जीवनाचे वेळीच नियोजन करा, नवनिर्मितीचा ध्यास घ्या, स्वतःच्या कर्तृत्वाने इतरांना प्रेरित करा.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे म्हणाले की, देश सीमेवर अहोरात्र सेवा करणाऱ्या जवानांमुळेच आपण सर्वजण सुरक्षित आहोत. प्रतिकूल परिस्थितीतदेखील राष्ट्रसेवेच्या कार्यासाठी जवान सदैव तत्पर असतात. म्हणूनच देशसेवेचे हे जवानांचे कार्य आपणा सर्वांना प्रेरणादायी आहे.

आभार लक्ष्मी कांबळे यांनी मानले.

Solapur Edition
28 July, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

**लोकमत**



कवी कालिदास मंडळ आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शीच्या वतीने धनाजी घोरपडे व निलावती कांबळे यांचा मेघदूत पुरस्काराने गौरव करण्यात आला. यावेळी प्रा. सविता देशमुख, कवयित्री डॉ.स्मिता पाटील, तहसीलदार सदाशिव पडदुणे, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे आदी.

## धनाजी घोरपडे, निलावती कांबळे यांचा मेघदूत पुरस्काराने सन्मान

### बार्शीत कवी कालिदास मंडळ, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**बार्शी:** कवी कालिदास मंडळ, बार्शी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय 'मेघदूत' काव्य पुरस्काराचे वितरण उत्साहात पार पडले. यावर्षी 'गाऱ्हाणं' या काव्यसंग्रहासाठी धनाजी घोरपडे सांगली व 'वास्तव' निलावती कांबळे कुर्डूवाडी यांचा मेघदूत पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सविता देशमुख या होत्या. कवयित्री डॉ. स्मिता पाटील, तहसीलदार सदाशिव पडदुणे, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सविता देशमुख यांनी भाषणात बोलताना कविता कूस बदलतेय, असा सूर आळवला तसेच कवी कालिदासांच्या मेघदूताचे वर्णन केले. कवयित्री डॉ. स्मिता पाटील यांनी काव्य हे एक नवसंजीवनी आहे. कवी कालिदासांच्या साहित्याचा वारसा चालविल्यास जनमानसात निसर्गप्रेमाची भावना वाढीस लागेल, असे स्पष्ट करीत सिनेगीतांमध्ये वाढता चंगळवाद नव्या पिढीला बिघडवत असल्याची कळकळही व्यक्त केली.

जयकुमार शितोळे यांनीही साहित्यिकांवर फार मोठी जबाबदारी असल्याची भावना यावेळी व्यक्त केली. जुगलकिशोर तिवाडी यांनी रंजक शैलीत कविता आनंदयात्री असल्याचे सांगितले. आनंद निर्मिती हेच काव्याचे प्रमुख वैशिष्ट्य असल्याचे सांगताना म्हणाले, पूर्वी अभावात आनंद होता, आज आनंदाचाच अभाव आहे. कवयित्री सुनंदा शिगनाथ यांनी आपल्या मंजूळ आवाजात स्वरचित बहारदार लावणी सादर करून रसिकांची मने जिंकली.

पां. न. निपाणीकर यांनी बार्शीच्या साहित्यिकांच्या संकलित साहित्य ग्रंथाचे प्रकाशन करण्याचा मानस यावेळी व्यक्त केला. ॲड. वहाब इनामदार व वांगी सर यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते झाला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमोदिनी गायकवाड यांच्या गीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कवी कालिदास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. रविराज फुरडे यांनी केले. मान्यवरांचा परिचय प्रा. डॉ. पी. ए. पाटील यांनी करून दिला तर पुरस्कारप्राप्तांचा परिचय प्रा. डॉ. एम. एस. डिसले यांनी करून दिला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष डॉ. रविराज फुरडे, सचिव गंगाधर अहिरे, कोषाध्यक्ष डॉ. पी. ए. पाटील, प्रा. डॉ. एम. एस. डिसले, प्रकाश महामुनी, आबासाहेब घावटे, युवराज जगताप, रमाकांत लिंबकर, अर्चना पोळ यांनी परिश्रम घेतले. आभार गंगाधर अहिरे यांनी मांडले. सूत्रसंचालन अर्चना पोळ यांनी केले.

Hello Solapur Gramin
Page No. 2 Aug 05, 2019
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी



बार्शी : उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. ए. बी. कदम. यावेळी उपस्थित मान्यवर.

## अण्णा भाऊंनी साहित्यातून श्रमजिवीवर्गाच्या व्यथा मांडल्या

### डॉ. कदम; महाविद्यालयात साठे,टिळकांना अभिवादन

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

अण्णा भाऊ साठे हे एक सामाजिक चळवळीचे लोकनेते होते. त्यांनी आपल्या साहित्यकृतीतून कष्टकरी व श्रमजिवीवर्गाचे दैनंदिन जीवन रेखाटले आहे. श्रमजिवीवर्गाच्या कष्टातूनच राष्ट्राची प्रगती होते. स्वराज्य क्रांतीच्या कार्यात लोकमान्य टिळकांचे कार्यदेखील उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन डॉ. ए. बी. कदम यांनी केले.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा १५ वा वर्धापनदिन, लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णा भाऊ साठे जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कदम हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे होते. यावेळी डॉ. एस. डी. भिलेगावकर, प्रा. डॉ. एस. एम. लांडगे, प्रा. जी. एस. फरतडे, कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. एम. एस. डिसले उपस्थित होते.

प्रियंका मुळे हिने प्रास्ताविक केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ठ प्राचार्य पुरस्कार मिळाल्याबद्दल प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांचा सत्कार करण्यात आला. बी.एड्. प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी होळकर विद्यापीठाच्या स्थापनेपासूनची यशस्वी वाटचाल विशद केली. लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांच्या कार्याचा आढावा घेतला. सूत्रसंचालन मोहिनी गायकवाड व अश्विनी ईटकर यांनी केले. आभार विजयसिंह देवकर यांनी मानले.

Solapur Edition

College of Education Dist. Solapur Barshi

पुढारी

# देशाच्या सर्वांगीण विकासाची नाळ शिक्षकांशी जोडलेली : डॉ. यादव

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

शिक्षक हा देशाचा मूलभूत आधारस्तंभ असतो. सुज्ञानी व सक्षम नागरिक निर्माण प्रक्रियेत शिक्षकाचा सिंहाचा वाटा असतो. देशाच्या सर्वांगीण विकासाची नाळ शिक्षकांशी जोडलेली असते, असे प्रतिपादन शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव यांनी केले.

ते बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते.

७३ वा स्वातंत्र्य दिन व रक्षाबंधन सणानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे जनरल सेक्रेटरी व्ही. एस. पाटील, प्राचार्य डॉ. सी. एस. मोरे, तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. रविराज फुरडे यांनी केले. यावेळी सांस्कृतिक प्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर, डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. एम. व्ही. मते, डॉ. पी. ए. पाटील तसेच सर्व प्रशिक्षणार्थी यांनी परिश्रम घेतले.


Solapur Edition
20 Aug, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com


College of Education Dist. Solapur Barshi

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी

# विद्यापीठाच्या 'उत्कृष्ट प्राचार्य' पुरस्काराने डॉ. गोरे सन्मानित

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुग्रीव श्रीमंत गोरे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' देऊन केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी सहकार व मदत पुनर्वसन मंत्री सुभाष देशमुख, कुलगुरू मृणालिनी फडणवीस आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ.एस.एस. गोरे हे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, सिनेट, आंतरविद्याशाखीय अभ्यास मंडळाचे प्रभारी अधिष्ठाता, विद्या परिषद, अभ्यास मंडळ, मूल्यमापन मंडळ अशा विविध पदांवर सदस्य व प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.




**बार्शी : प्राचार्य गोरे यांना सपत्नीक सन्मानित करताना ना. नितीन गडकरी.**

विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास व क्रीडा उपक्रमांचे आयोजन तसेच विविध विषयांवर व्याख्याने व सामाजिक कार्याची दखल घेत सदर पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली. त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी व्ही.एस. पाटील, सहसचिव पी.टी. पाटील, खजिनदार डी.एस. रेवडकर आदींनी अभिनंदन केले.

My Solapur Edition
6 Aug, 2019 Page No. 1

College of Education, Dist. Solapur, Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2019 - 2020

लोकमत

# जिल्हा व्हॉलिबॉल संघटनेच्या उपाध्यक्षपदी सुरेश लांडगे

लोकमत न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** सोलापूर जिल्हा व्हॉलिबॉल संघटनेच्या उपाध्यक्षपदी प्रा. डॉ. सुरेश लांडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

संघटनेचे अध्यक्ष सिद्राम खेडगीकर बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. संघटनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वीरभद्र रेगळ, संघटनेचे आश्रयदाते विजयभाई पटेल, सचिव अशोक पाटील, उपाध्यक्ष प्रा. बाळासाहेब भास्कर, सहसचिव मिलिंद गोरटे, खजिनदार प्रशांत कांबळे, नितीन भोगशेट्टी, प्रशांत बिराजदार यांच्यासह कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

प्रा. लांडगे बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शारीरिक शिक्षण विभागप्रमुख आहेत.

संघटनेचे ज्येष्ठ उपाध्यक्ष प्रा. व्ही. तिरुपती यांची संघटनेचे आश्रयदाते म्हणून नियुक्तीचा, तसेच नगरसेवक नागेश वल्याळ, विक्रम शहा, हेमंत कदम, नीलेश वरवडकर, रमेश चिंताकिंदी, संगीता हत्ती, मनीषा जाधव यांची संघटनेच्या सदस्यपदी नियुक्ती करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते (कै.) मोतीसा बिद्री यांचे नाव पार्क मैदानावरील व्हॉलिबॉल मैदानाला देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्याबद्दल महापालिका पदाधिकारी आणि प्रशासनाच्या कौतुकाचा ठराव या बैठकीत करण्यात आला.

मैदानाचा नामकरण समारंभ महापौर, राज्याचे मंत्री, आमदार, महापालिकेचे पदाधिकारी, आयुक्त, जिल्हा क्रीडा फेडरेशनचे पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत लवकरच आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती खेडगीकर यांनी दिली.

Solapur Main
Page No. 12 Sep 12, 2019
Powered by: erelego.com

College of Education
Dist. Solapur
Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2019 - 2020

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मतदान जनजागृती

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृतीबाबत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमांत महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, नोडल अधिकारी प्रा.डॉ. एम. व्ही. मते, प्रा. डॉ. पी. ए. पाटील, सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद, प्रशिक्षणार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला.

१० ऑक्टोबर रोजी मतदान जनजागृतीसंदर्भात संकल्प उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी उपस्थित प्राध्यापक, प्रशिक्षणार्थी



**बार्शी : मुक्त चर्चेत सहभागी विद्यार्थी.**

व शिक्षकेतर कर्मचारी यांना मतदान जनजागृतीसंदर्भात मार्गदर्शन केले. मतदानाचे महत्त्व सविस्तर विशद केले. राष्ट्र विकासासाठी मतदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. स्वत: मतदान करणार, त्याचबरोबर इतरांनाही मतदान करण्यास प्रेरित करणार, असा संकल्प उपस्थित सर्वांनी केला.

निबंध लेखन स्पर्धेमध्ये 'मतदार जागरुकता', 'मतदार राजा जागा हो', 'सुदृढ लोकशाहीसाठी मतदान' असे तीन विषय देण्यात आले होते. यातून योगीता मोहन कापुरे, परवीन वाहेद शेख, अश्विनी अरुणराव भोसले यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावले. घोषवाक्ये स्पर्धेमध्ये 'मतदार जागरूकता', 'सुदृढ लोकशाहीसाठी मतदान', असे दोन विषय देण्यात आले होते. यातून अश्विनी बसवंत इटकर, प्रणिता बाबासाहेब गायकवाड, अश्विनी अरुणराव भोसले यांनी यश मिळवले. वादविवाद स्पर्धेमध्ये 'सुदृढ लोकशाहीसाठी मतदान' हा विषय देण्यात आला होता. यातून पल्लवी लक्ष्मण क्षीरसागर, अश्विनी अरुणराव भोसले, योगीता मोहन कापुरे व प्रियंका आप्पा मुळे यांना यश मिळाले.

महाविद्यालयातील बी.एड्. प्रशिक्षणार्थी गणेश वडेकर यांचा नकला सादरीकरण कार्यक्रम झाला. पोस्टर स्पर्धेत 'मतदार जागरुकता', 'सुदृढ लोकशाहीसाठी मतदान', 'मतदार राजा जागा हो' असे विषय देण्यात आले होते. पवन जगदाळे, प्रियंका जगदाळे, सोनाली गुरव यांनी यश संपादन केले. मतदार जनजागृतीसंदर्भात पथनाट्य सादरीकरण केले. मतदान यंत्राची माहिती विशद केली. मतदान करण्यासाठी उपस्थितांना प्रेरित केले.

१४ ऑक्टोबर रोजी 'लोकशाही बळकटीकरणासाठी तरुणाईशी खुली चर्चा' यावर आधारित मुक्त संवाद हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये बी.एड्. प्रशिक्षणार्थी अश्विनी अरुणराव भोसले यांनी उपस्थित पत्रकार, प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, पालक आदींशी मुक्त संवाद साधला. यावेळी पत्रकार गणेश गोडसे, धनंजय जगदाळे, रणजित काकडे, मल्लिकार्जुन धारुरकर या मान्यवरांनी सहभाग नोंदवला. प्रा.डॉ. व्ही. पी. शिखरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. 'मतदान जनजागृती' उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, नोडल अधिकारी प्रा. डॉ. एम. व्ही. मते, प्रा. डॉ. पी. ए. पाटील, प्रा. डॉ. व्ही.पी. शिखरे, प्रा. डॉ. एस.एम. लांडगे, प्रा.डॉ. ए. जी. कांबळे, प्रा.डॉ. एम.एस. डिसले, प्रा.एस.एस. सुरवसे, प्रा. पी. पी. नरळे आदींनी परिश्रम केले.

Solapur Edition
20 Oct, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी

# अनुभव हाच गुरू असतो : डॉ. गोरे

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

अनुभव हाच आपला खरा गुरू असतो. कोणतेही काम मनापासून करा, त्यामुळे निश्चित यश मिळेल, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. एस.गोरे यांनी केले.

बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सराव पाठ विभागाच्या वतीने बी.एड. द्वितीय वर्ष, सत्र ३, सन २०१९-२० मधील सराव अध्यापन व छात्रसेवाकाल अहवाल प्रकाशन कार्यक्रम उत्साहात झाला.



**बार्शी : अहवाल प्रकाशनावेळी उपस्थित मान्यवर.**

यावेळी गोरे हे बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्रास्ताविक डॉ. पी. ए. पाटील यांनी केले. बी. एड. प्रशिक्षणार्थी प्रियांका मुळे, योगिता कातुरे व विशाल माने यांनी दीड महिन्यांच्या कालावधीत छात्रसेवाकाल उपक्रमात आलेले अनेक अनुभव कथन केले.

या कार्यक्रमात सहा आठवड्यांच्या कालावधीत साधना कन्या प्रशाला, बार्शी, जिजामाता विद्यामंदिर, जिजामाता कन्या प्रशाला या तिन्ही शाळांमध्ये राबविलेल्या सराव अध्यापन व छात्रसेवाकाल उपक्रमाच्या लिखित अहवालाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांच्या हस्ते झाले. तिन्ही शाळांतील अभिरूप मुख्याध्यापक बी.एड. प्रशिक्षणार्थी पल्लवी क्षीरसागर, सोमनाथ वेदपाठक व अश्विनी भोसले यांनी सादरीकरण केले.

यावेळी डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एस.डी. भिलेगावकर, डॉ. आर.ए. फुरडे, डॉ. एम. एस. डिसले उपस्थित होते. आभार प्रदर्शन डॉ. एम. व्ही. मते यांनी, तर मोनिका देशपांडे व लक्ष्मी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी बी.एड. विभागातील सर्व प्राध्यापक, बी.एड. प्रशिक्षणार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2019 - 2020

पुढारी

# साने गुरुजी कथामालेच्या स्पर्धेचे बक्षीस वितरण

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

साने गुरुजी कथामाला शाखा बार्शी, नगरपालिका शिक्षण मंडळ व शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शीमध्ये कथाकथन स्पर्धा व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम नुकताच पार पडला. या कथाकथन स्पर्धेत नगरपालिका शाळा तसेच खासगी प्राथमिक शाळा, बार्शी येथील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अनिल बनसोडे, तर अध्यक्षस्थानी जयकुमार शितोळे होते. कार्यक्रमाची सुरुवात साने गुरुजी यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी डॉ.सी.एस. मोरे, इंगळे, प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, प्राचार्य डॉ. दीपक गुंड, डॉ. भिलेगावकर एस.सी., डॉ. जळकुटे जे.बी. आदी यावेळी उपस्थित होते. या स्पर्धेत ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेनंतर लगेच बक्षीस वितरण करण्यात आले. आकांक्षा स्वामी, प्रियांका ढेरे, तेजस्वीनी पवार, शुभांगी पाथ्रुड, सदफ शेख, शुभांगी होनराव, समर्थ माळवदे, शाहीर शेख, अमित दास, ईश्वरी जाधव, पियुष करडे, मयुरी नायकू, रोहन राऊत, अभिषेक धस, साक्षी पवार, संध्या डिगे या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत यश मिळविले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. एम.एस. डिसले व सुमती पवार यांनी काम पाहिले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना पुस्तक व प्रमाणपत्र देण्यात आले. आभार डॉ. सी.एस. मोरे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. जळकुटे यांनी केले.



**बार्शी : साने गुरुजी कथाकथन स्पर्धेचे बक्षीस वितरणप्रसंगी मान्यवर.**

My Solapur Edition
8 Oct, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात निवडणुकीबाबत प्रबोधन

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालय बी.एड. विभागाच्या वतीने विधानसभा सार्वत्रिक निवडणुका २०१९ निमित्त 'तरुणाईशी खुली चर्चा, मुक्त संवाद' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात नवमतदारांना मतदानाबाबत प्रबोधन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार गणेश गोडसे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी डॉ. व्ही. पी. शिखरे होते. यावेळी मल्लिकार्जुन धारूरकर, डॉ. रणजित काकडे, धनंजय जगदाळे आदी उपस्थित होते. या चर्चात्मक कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व प्रशिक्षणार्थिनी सहभाग घेतला. लोकशाही बळकटीकरणासाठी



**बार्शी : चर्चात्मक कार्यक्रमास उपस्थित असलेले मान्यवर व विद्यार्थी.**

मतदान या विषयावर मनमोकळेपणाने संवाद साधला. प्रश्न, शंका, तरुणांची भूमिका व जबाबदारीची, लोकशाही बळकटीकरण, तरुणांचा सहभाग, मतदानाचा टक्का कमी होण्यामागची कारणे, निवडणूक आयोग, जिल्हा प्रशासन, स्थानिक प्रशासनाचे आदी प्रमुख मुद्यांवर चर्चा करण्यात आली.

घटनेतील ११ वे कलम मूलभूत कर्तव्य म्हणून मतदानासाठी बंधनकारक करावे, अशी सूचना मांडण्यात आली. मतदानावर बहिष्कार घालण्यामागची कारणे व मागण्यांच्या पूर्ततेसाठी काय पर्याय असू शकतात, याचे शंका निरसन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे संवाद संचलन बी.एड. प्रशिक्षणार्थी अश्विनी भोसले यांनी केले. याप्रसंगी डॉ. एस.एम.लांडगे, प्रा. एस.एस. सुरवसे, प्रा.पी. पी. नरळे यांच्यासह सर्व विभागातील विभाग प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे व विभाग प्रमुख डॉ. एस.डी. भिलेगावकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम समन्वयक डॉ. पी.ए.पाटील, डॉ. एम.एस. डिसले, डॉ. एम.व्ही. मते व सर्व बी.एड. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

My Solapur Edition
17 Oct, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी



बार्शी : संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करताना उपस्थित शिक्षक.

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**बार्शी** : बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, पृथ्वी कुल व सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. प्रा. एस. व्ही. निंबाळकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. एस. डी. भिलेगावकर हे होते. यावेळी व्यासपीठावर प्रा डॉ. एम. एस. डिसले, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. एम. व्ही. मते व डॉ. पी. ए. पाटील आदी उपस्थित होते.

प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व बी. एड. प्रशिक्षणार्थींनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. २६/११/२०१९ ते १४/०४/२०२० या कालावधीत संविधान जनजागृती संदर्भात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. स्वप्नाली भोसले यांनी प्रास्ताविक केले. उपस्थित सर्वांनी संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. उपस्थित प्रशिक्षणार्थींना व एनएसएस स्वयंसेवकांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ देण्यात आली. ज्योती गोटने यांनी शपथ वाचन केले. यावेळी २६/११ हल्ल्यातील शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अपेक्षा चव्हाण व दुर्गा गायकवाड यांनी भारतीय संविधानाची ओळख यावर विचार व्यक्तकेले. संकेत निचल यांनी भारतीय नागरिकांची मूलभूत हक्क व कर्तव्य यावर मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे प्रा. व्ही. एस. निंबाळकर यांनी संविधान दिनाचे महत्त्व विशद केले. लोकशाही ही एक जीवन प्रणाली आहे. सर्वांनी लोकशाहीचा आदर केला पाहिजे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. एस. डी. भिलेगावकर यांनी संविधान दिन विषयी माहिती विशद केली. उपस्थितांचे आभार प्राजक्ता काळे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एम. एस. डिसले यांनी केले.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

My Solapur Edition
28 Nov, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

# सणाचे तत्वज्ञान जाणल्यास नाविन्यपूर्ण आनंद मिळतो : गोरे

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

बदलत्या काळानुसार सण व उत्सव साजरे करण्याचा झगमगाट वाढला आहे. परंतु सणाचे स्वरुप व दिला जाणारा संदेश कायम आहे. सण-उत्सवाचे खरे तत्वज्ञान जाणल्यास मानवी जीवनात नाविन्यपूर्ण आनंद घेता येतो. सामाजिक सौंदर्य व सामाजिक संदेश यात सण-उत्सवाची भूमिका उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन प्रा. एस.एस. गोरे यांनी केले. ते बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात दीपोत्सव कार्यक्रमात बोलत होते.



बार्शी : दीपोत्सव कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. एस.एस गोरे.

यावेळी व्यासपीठावर समन्वयक प्रा. डॉ. पी.ए. पाटील, प्रा. डॉ. एस. डी. भिलेगावकर, प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे, प्रा. डॉ. एम.एस.डिसले, प्रा. डॉ. आर. ए. फुरडे, प्रा. डॉ. एम. व्ही. मते आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीपावली सणाविषयी भक्तीगीते सादर केली. प्रास्ताविक समन्वयक प्रा. डॉ. पी.ए. पाटील यांनी केले. बी.एड. प्रशिक्षणार्थींनी उपस्थित प्राध्यापकांचे औक्षण केले. यानंतर वसुबारस, धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा अर्थात पाडवा, भाऊबीज विविध राज्यात सण साजरा करण्याचे स्वरुप व पर्यावरणपूरक दिवाळी या विषयावर अनेकांनी मनोगते व्यक्त केली. प्रा. डॉ. एम. व्ही. मते यांनी दीपावली सणाचे स्वरुप व संदेश याविषयी माहिती विशद केली. आभार मयुर माने, तर सूत्रसंचालन लक्ष्मी कांबळे व मोनिका देशपांडे यांनी मानले.

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2019 - 2020

पुढारी

# बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात उद्या माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे शैक्षणिक वर्ष १९९४-९६ मधील बी.पी.एड विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा रविवार, १५ डिसेंबर रोजी आयोजित केला आहे.

या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे हे उपस्थित राहणार आहेत. मेळाव्यात महाविद्यालयाचे प्रा. डॉ. एस.एस. गोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्यासाठी बीपीएड विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. गोरे, बी.पी.एड. विभागप्रमुख डॉ. एस. एम. लांडगे, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. ए. जी. कांबळे, एम.पी.एड. विभागप्रमुख प्रा. जी. एस. फरताडे व पदाधिकारी यांनी केले आहे. मेळाव्यासाठी सुरेश राऊत व प्रताप गुं[illegible] यांच्याशी संपर्क साधावा.

Solapur Edition
14 Dec, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष १९९३-९४ मधील बी.पी.एड. विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा पार पडला.

या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे व विद्यमान प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, गोव्याचे माजी आमदार व मनोरंजन सोसायटीचे चेअरमन सुभाष फळदेसाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी अनेकांनी आपले मनोगत आणि जुन्या आठवणींना उजाळा दिला. शिक्षकांच्या अध्यापन व प्रात्यक्षिक कार्यासंबंधी आलेले सुखद अनुभव विशद केले. तसेच महाविद्यालयाच्या प्रगतीविषयीही समाधान व्यक्त केले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना माजी विद्यार्थी तथा सांगलीचे जिल्हा क्रीडाधिकारी वाघमारे म्हणाले की, या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विविध प्रकारच्या पदावर कार्यरत आहेत. आम्ही माजी विद्यार्थी महाविद्यालयाच्या विकासाठी सातत्याने प्रयत्नशील राहू. स्नेहमेळाव्याच्या यशस्वी आयोजनाचे कौतुक केले व भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. बी. पी. एड. विभागप्रमुख डॉ. एस. एम. लांडगे व एम.पी. एड. विभागप्रमुख प्रा. जी.एस. फरताडे, सुरेश राऊत व प्रताप गुंड आदी उपस्थित होते. डॉ. एस. एम. लांडगे यांनी आभार मानले.



**बार्शी : बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात सहभागी झालेले विद्यार्थी.**

My Solapur Edition
18 Dec, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

**बार्शी :** शिक्षणशास्त्रमहाविद्यालय, बार्शी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते १९ दरम्यान 'आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकास' कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव उपस्थित राहणार आहेत, तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभाग संचालक डॉ. गुणवंत सरवदे व संस्थेचे सहसचिव पी. टी. पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव व्ही. एस. पाटील, खजिनदार दिलीप रेवडकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यशाळेसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग संचालक डॉ. गुणवंत सरवदे, पुण्याचे आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ उल्हास केळकर, सोलापूर जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयातील बॉम्बशोध पथक, बार्शी तालुका वैद्यकीय अधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ व मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेत विविध महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे एकूण १५० स्वयंसेवक सहभागी होणार आहेत, त्यांना आपत्ती व्यवस्थापन- रेस्क्यू ऑपरेशन, भूकंप, आग आटोक्यात आणणे इ., प्रथमोपचार, नेतृत्व विकास या विषयांवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक सादर केले जाणार आहेत. या कार्यशाळेत स्वयंसेवकांनी व सर्व महाविद्यालयाच्या समन्वयकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस. गोरे यांनी केले आहे.

College of Education Dist. Solapur Barshi

पुढारी



बार्शी : बार्शी येथील महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस व मान्यवर.

## पर्यावरण समृद्धतेसाठी शाश्वत विकास गरजेचा : कुलगुरू

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

विकास आणि आपत्ती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापन करून सामाजिक उपयोगिता जोपासली पाहिजे, पर्यावरण समृद्धता नष्ट होत असून, त्यासाठी शाश्वत विकास अत्यंत गरजेचा आहे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी केले.

शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकास' कार्यशाळेचे उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

व्यासपीठावर संस्थेचे जनरल सेक्रेटरी व्ही. एस. पाटील, खजिनदार प्रा. दिलीप रेवडकर, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, समन्वयक डॉ. एम. एस. डिसले आदी उपस्थित होते.

डॉ. फडणवीस पुढे म्हणाल्या, विद्यार्थी जीवनात नेतृत्व विकास महत्त्वाचा आहे. राष्ट्रविकासासाठी सक्षम नागरिक शिक्षणातून तयार झाले पाहिजेत, असे आवाहन केले. अध्यक्षस्थानी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग संचालक डॉ. गुणवंत सरवदे व संस्थेचे सहसचिव पी. टी. पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने झाली. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी कार्यशाळेचा उद्देश विशद केला. आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. म्हणूनच सामाजिक जीवनातील आपत्तीवर मात करण्यासाठी सक्षम स्वयंसेवक या कार्यशाळेतून तयार करावयाचे आहेत, असे त्यांनी सांगितले. डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांचा परिचय करून दिला. प्रमुख पाहुणे व संस्थेचे सहसचिव पी. टी. पाटील यांनी आपत्ती व्यवस्थापनात विद्यार्थ्यांची भूमिका यावर सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या सभोवताली घडून आलेल्या आपत्तीमध्ये सर्वांनी योगदान दिले पाहिजे. यासाठी एन.एस.एस. स्वयंसेवकांनी नेतृत्व केले पाहिजे, असे आवाहन केले. डॉ. गुणवंत सरवदे यांनी आपत्ती व्यवस्थापनात स्वयंसेवकांची कार्ये सांगितली. तसेच एन.एस.एस. स्वयंसेवकांची गुणवैशिष्ट्ये विशद केली. उल्हास केळकर यांनी आपत्ती व्यवस्थापनाची संपूर्ण कार्यप्रणाली सांगितली.

डॉ. बी. वाय. यादव यांनी वैद्यकीय क्षेत्रातील आपत्ती व्यवस्थापन याविषयी सविस्तर माहिती विशद केली. या कार्यशाळेत विविध महाविद्यालयांचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे एकूण १५० स्वयंसेवक सहभागी झाले होते. त्यांना आपत्ती व्यवस्थापन- रेस्क्यू ऑपरेशन, भूकंप, आग आटोक्यात आणणे इ. प्रथमोपचार, नेतृत्व विकास या विषयांवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार डॉ. एम. एस. डिसले यांनी मानले. डॉ. एल. आय. राठोड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

My Solapur Edition
20 Dec, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education Dist. Solapur Barshi.

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकास' कार्यशाळा

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते १९ डिसेंबर दरम्यान 'आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकास' या विषयावर तीन दिवसीय क्षेत्रीय कार्यशाळा उत्साहात झाली.

या कार्यशाळेचा समारोप समारंभ बक्षीस वितरण कार्यक्रम सपोनि राहुल देशपांडे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे कार्यकारिणी सदस्य जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, विविध महाविद्यालयांचे समन्वयक, डॉ. एम. एस. डिसले आदी उपस्थित होते.

डॉ. डिसले यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेचा उद्देश, तीन दिवस सादर करण्यात आलेल्या संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा घेतला. यात विद्यार्थ्यांना नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, प्रथमोपचार, नेतृत्व विकास या विषयांवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक याद्वारे माहिती दिली. पुण्याचे उल्हास केळकर यांनी आपत्ती व्यवस्थापनाची संपूर्ण प्रात्यक्षिकांसह कार्यप्रणाली सांगितली. एनएसएस स्वयंसेवकांनी उत्तम नेतृत्व केले पाहिजे, असे आवाहन केळकर यांनी केले.



बार्शी : आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेप्रसंगी प्रात्यक्षिके सादर करताना विद्यार्थी.

'आपत्ती व्यवस्थापन' ही काळाची गरज आहे. म्हणूनच बार्शी व परिसरातील जनतेच्या संपूर्ण सुरक्षिततेसाठी, कोणत्याही आपत्तीवर मात करण्यासाठी सक्षम स्वयंसेवक या कार्यशाळेतून तयार झाले आहेत. सर्व स्वयंसेवक बार्शीतील पोलिस आणि अग्निशामक दलाच्या मदतीला तत्परतेने धावून येतील, असा विश्वास राहुल देशपांडे यांनी व्यक्त केला.

या कार्यशाळेत विविध महाविद्यालयांचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे १५० स्वयंसेवक सहभागी झाले होते. त्यांना आपत्ती व्यवस्थापन- रेस्क्यू ऑपरेशन, भूकंप, आग आटोक्यात आणणे यासारख्या प्रात्यक्षिक सादरीकरणाचे कौतुक केले. प्रा. स्मिता सुरवसे यांनी सूत्रसंचालन तर आभार प्रा. पंकज नरळे यांनी मानले.

Solapur Edition
25 Dec, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

## थोडक्यात महत्वाचे



सोलापूर : श्री शिवाजी महाविद्यालय बार्शीत आयोजित केलेल्या आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यशाळेत उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस व इतर मान्यवर.

### पर्यावरणं समृध्दीसाठी शाश्वत विकास आवश्यक : कुलगुरू डॉ. फडणवीस

**सोलापूर :** विकास आणि आपत्ती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यामध्ये शहरीकरण, हवामान बदल, शाश्वत विकास, पाणी व्यवस्थापन आवश्यक आहे. पर्यावरणाच्या समृद्धीसाठी शाश्वत विकास अत्यंत गरजेचा आहे. विद्यार्थी जीवनात नेतृत्व विकास महत्वाचा आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी केले. बार्शीतील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकास' कार्यशाळेचे उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. गुणवंत सरवदे, संस्थेचे सहसचिव पी. टी. पाटील, संस्थेचे जनरल सेक्रेटरी व्ही. एस. पाटील, खजिनदार प्रा. दिलीप रेवडकर, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, समन्वयक डॉ. एम. एस. डिसले आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी कार्यशाळेचा उद्देश विशद केला. डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी परिचय करून दिला.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2019 - 2020

# आपत्ती व्यवस्थापनाचे शिक्षण काळाची गरज : देशपांडे

**बार्शी/प्रतिनिधी**

**आपत्ती व्यवस्थापनाचे शिक्षण ही काळाची गरज आहे. कोणत्याही आपत्तीवर मात करण्यासाठी सक्षम स्वयंसेवकाची गरज आहे. त्यामुळे कार्यशाळेतून तयार झालेले स्वयंसेवक बार्शीतील पोलीस आणि अग्निशमन दलाच्या मदतीला तत्परतेने धाऊन येतील, असा विश्वास तालुका पोलिस ठाण्याचे स.पो.नि. राहुल देशपांडे यांनी व्यक्त केला.**

ते सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या व येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय 'आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकास' या कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारिणी सदस्य जयकुमार शितोळे, प्राचार्य एस एस गोरे, प्रा. एम. एस. डिसले आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रा. एम.

## ■ बार्शीत आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकास कार्यशाळा



एस. डिसले यांनी कार्यशाळेचा उद्देश, तीन दिवस सादर करण्यात आलेल्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, प्रथमोपचार, नेतृत्व विकास या विषयांवरील मार्गदर्शन व प्रात्यक्षिकाचा आढावा घेतला. तज्ञ उल्हास केळकर (पुणे) यांनी आपत्ती व्यवस्थापनाची संपूर्ण प्रात्यक्षिकांसह कार्यप्रणाली सांगितली. रासेयो स्वयंसेवकांनी उत्तम नेतृत्व केले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. जयकुमार शितोळे यांनी आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापन करून सामाजिक उपयोगिता जोपासली पाहिजे, असे आवाहन केले.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

प्रतिनिधी
बार्शी

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते १९ डिसेंबर या कालावधीत आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकास या विषयावर तीन दिवसीय क्षेत्रीय कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेचा समारोप समारंभ नी बक्षीस वितरण कार्यक्रम पोलीस उपनिरीक्षक राहुल देशपांडे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे कार्यकारिणी सदस्य जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे कार्यशाळा समन्वयक डॉ. एम. एस. डिसले व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमपूजन व दीपप्रज्वलनाने झाली. कार्यशाळा समन्वयक डॉ. एम. एस. डिसले यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पंकज नरळे यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांचा परिचय करून दिला. तज्ज्ञ उल्हास केळकर (पुणे) यांनी आपत्ती व्यवस्थापनाची संपूर्ण प्रात्यक्षिकांसह कार्यप्रणाली सांगितली.



सोलापूर : शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनावर प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे राहुल देशपांडे म्हणाले, आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. म्हणूनच बार्शी व परिसरातील जनतेच्या संपूर्ण सुरक्षिततेसाठी, कोणत्याही आपतीवर मात करण्यासाठी सक्षम स्वयंसेवक या कार्यशाळेतून तयार झाले आहेत, आणि हे सर्व स्वयंसेवक बार्शीतील पोलीस आणि अग्निशमन दलाच्या मदतीला तत्परतेने धावून येतील.

कार्यक्रमाचे अध्यक्ष जयकुमार शितोळे यांनी आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापन करून सामाजिक उपयोगिता जोपासली पाहिजे, असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात जयकुमार शितोळे यांनी विविध क्षेत्रातील आपत्ती व्यवस्थापन याविषयी सविस्तर माहिती आपल्या खास शैलीत विशद केली. आभार प्रा.पंकज नरळे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. स्मिता सुरवसे यांनी केले. सामूहिक राष्ट्रगीताने समारोप समारंभाची सांगता करण्यात आली.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

पुढारी

## डॉ. महादेव डिसले यांचे नेट परीक्षेत यश

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

विद्यापीठ अनुदान आयोग व राष्ट्रीय पात्रता कक्ष यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पात्रता नेट परीक्षेत शिक्षणशास्त्र विषयात शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे डॉ. महादेव डिसले उत्तीर्ण झाले आहेत. डॉ. डिसले यांच्या शिक्षणशास्त्रातील संशोधन कार्यासाठी सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांनी पीएच.डी. ही पदवी बहाल केली आहे. डॉ. महादेव डिसले नेट परीक्षा पात्र झाल्याबद्दल शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांच्यासह अनेक शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

Solapur Edition
7 Jan, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

पुढारी **News By** गणेश गोडसे, बार्शी




बार्शी : एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. विकास घुटे.

## गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी तंत्रज्ञान जागरूकता गरजेची

### कुलसचिव डॉ. विकास घुटे यांचे प्रतिपादन

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

विद्यार्थी प्रवेश, अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन व परीक्षा आदी घटकांबाबत तंत्रज्ञान आवश्यक असून शाळेत व महाविद्यालयात माहिती संप्रेषण तंत्रज्ञान संदर्भात नियोजन महत्त्वाचे आहे. शिक्षक व विद्यार्थ्यांनी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाबाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विकास घुटे यांनी व्यक्त केले.

ते शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी व पुण्यश्लोक अहिल्यादेव होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्य संयुक्त विद्यमाने आयोजित 'उच्च शिक्षणात माहिती संप्रेषण तंत्रज्ञाना एकात्मिकरण' या विषयावर ए दिवसीय राष्ट्रीय परिषदेत बोल होते. अध्यक्षस्थानी दिलीप रेवडक होते. यावेळी मुंबई विद्यापीठाच्य शिक्षणशास्त्र विभागाच्या प्रमु डॉ. सुनीता मग्रे, प्रा. डॉ. एस. एस गोरे, माजी प्रा. डॉ. चंद्रकांत मोरे विद्यापीठाचे सहायक कुलसचिव डॉ शिवाजी शिंदे, समन्वयक डॉ. एम एस. डिसले आदी मान्यवर उपस्थि होते.

प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यां उपस्थितांचे स्वागत करून परिषदेच उद्देश विशद केला. तंत्रज्ञान वाप ही काळाची गरज आहे. म्हणून शिक्षण क्षेत्रातील समस्यांवर मा करण्यासाठी तंत्रज्ञान आवश्य असल्याचे त्यांनी सांगितले. परिषदे साधन व्यक्ती डॉ. सुनीता म. यांनी 'माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची उच्च शिक्षणातील उपयुक्तता' यावर संशोधकांना मार्गदर्शन केले.

या परिषदेसाठी विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, संशोधन विद्यार्थी असे एकूण ६५ संशोधक सहभागी झाले होते. आभार डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी मानले. डॉ. एल. आय. राठोड यांनी सूत्रसंचालन केले.

Solapur Edition
8 Jan, 2020 Page No. 1

पुढारी
News By
गणेश गोडसे, बार्शी

# उपळाईत श्रमसंस्कार शिबिर उत्साहात

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शी तालुक्यातील उपळाई (ठोंगे) येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर मोठ्या उत्साहात झाले.

या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप समारंभ श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळातील विविध पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे खजिनदार प्रा. दिलीप रेवडकर, प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, उपळाईचे उपसरपंच सुंदरराव पाटील, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. एम.एस. डिसले उपस्थित होते. डॉ. एम.एस. डिसले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन केले. यामध्ये ग्रामस्वच्छता, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन, जनजागरण फेरी, प्रबोधनपर व्याख्याने, आरोग्य तपासणी शिबिर, जलसंधारण, वाचन संस्कृती विकास आदी कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. तसेच 'एनएसएस'चे स्वयंसेवक जबाबदार नागरिक आहेतच, ते समाज व राष्ट्राचे उत्तम नेतृत्व करू शकतील, असा आशावाद व्यक्त केला.

समाजाच्या व राष्ट्राच्या निकोप विकासाचे केंद्रस्थान हे युवक आहेत. राष्ट्रातील युवकांच्या सक्षमीकरणाचे उत्तम कार्य राष्ट्रीय सेवा योजनेतूनच घडते. एनएसएस स्वयंसेवक स्वयंशिस्तीचे उत्तम नेतृत्व करणारे, सुसंस्कार व श्रमप्रतिष्ठेला प्राधान्य देणारे तयार होतात. यातून समाज सक्षम बनतो, असा विश्वास प्रा. दिलीप रेवडकर यांनी आपल्या मार्गदर्शनातून व्यक्त केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी समारोप केला. रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबिरातून शाश्वत व सर्वांगीण विकासासाठी दिशादर्शक काम केले असून मौजे उपळाईच्या सर्वांगीण ग्रामविकासात ते मोलाचे ठरेल, असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. स्मिता सुरवसे यांनी मानले. पल्लवी क्षीरसागर व मधुरा गुंड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



बार्शी : उपळाई प्रशालेत आयोजित श्रमसंस्कार शिबिराप्रसंगी डॉ. एम.एस. डिसले, प्रा. दिलीप रेवडकर, एस.एस. गोरे व इतर.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

पुढारी



**बार्शी : येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात क्रीडाज्योत रॅलीचे स्वागत करताना एस.एस. गोरे व इतर मान्यवर.**

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात क्रीडाज्योत रॅलीचे स्वागत

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात २३ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेच्या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात क्रीडाज्योत रॅलीचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

हे महोत्सव २६ डिसेंबर ते ३० डिसेंबर दरम्यान होणार आहे. यानिमित्ताने जिल्ह्यात क्रीडाज्योत रॅली आयोजित करण्यात आली आहे. याचा उद्देश खेळाडूंमध्ये विविध प्रकारच्या क्रीडा प्रकारांविषयी आवड निर्माण करणे असा आहे. यावेळी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. एस. एस. गोरे यांनी क्रीडाज्योत रॅलीचे स्वागत केले. यावेळी सिनेट सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यापीठाचे सहाय्यक लसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी ोडा महोत्सवाबाबत विद्यापीठाचे योजन सांगितले. यावेळी प्रा. रवी नाळे, प्रा. बी.टी. गुंड, प्रा. स्मिता रवसे, डॉ. एम.व्ही. मते, प्रा. पंकज ळे, रमेश पाचपुते, अमोल पालके, ी.पी.एड., एम.पी. एड. व बी. एड. शिक्षणार्थी उपस्थित होते. डॉ. अनिल ांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

College of Education, Dist. Solapur, Barshi.




Solapur Edition
23 Dec, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी

# पर्यावरण रक्षणासाठी सकारात्मक वृत्तीची गरज : प्रा. डॉ. गोरे

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज आहे. दैनंदिन जीवनातील समस्या हा पर्यावरण असमतोलाचा परिणाम आहे. पर्यावरणपूरक जीवन प्रणाली उपयोगात आणली पाहिजे. म्हणूनच पर्यावरण संरक्षणासाठी सर्वांनी सकारात्मक वृत्ती जोपासणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी केले.

ते बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आकाश कुल व सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने आयोजित भूगोलदिन व मकर संक्रांत कार्यक्रमात बोलत होते. यावेळी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर, डॉ. एस. एम. लांडगे, डॉ. आर. ए. फुरडे उपस्थित होते. डॉ. एस. डी. भिलेगावकर यांनी प्रास्ताविक केले. छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आभार डॉ. एम. व्ही. मते, तर सूत्रसंचालन योगीता कातुरे यांनी केले.

Solapur Edition
19 Jan, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education, Dist. Solapur, Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2019 - 2020

पुढारी



बार्शी : सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त उपस्थित प्राध्यापक.

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे अग्रिकुल व सांस्कृतिक विभाग यांच्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे हे होते. यावेळी सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. डी. भिलेगावकर, कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे, प्रा. डॉ. एम. एस. डिसले, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. एम. व्ही. मते व डॉ. पी. ए. पाटील हे उपस्थित होते.

डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी प्रास्ताविक केले. छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. बी.एड्. प्रशिक्षणार्थी लक्ष्मी कांबळे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती सांगितली. प्रा. भिलेगावकर यांनी काव्य वाचनातून मनोगत व्यक्त केले. प्रा. फुरडे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक कार्याची माहिती दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य गोरे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा घेतला. त्यांच्या या महान कार्यामुळेच मुलींना व स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळाली तसेच शिक्षणाचा हक्क मिळाला. त्यांच्या या समाजकार्यामुळेच त्यांचा थोर समाजसुधारक म्हणून उल्लेख केला जातो. सावित्रीबाई फुले यांचे कार्य विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

My Solapur Edition
6 Jan, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

College of Education Dist. Solapur Barshi.

सोलापूर ◆बुधवार, दिनांक २२ जानेवारी २०२० ◆वर्ष ०८ वे । अंक : २२ वा ◆पाने १२ ◆किंमत : ४ रुपये

epaper : http://www.dainikekmat.com/epaper

पुरोगामी विचाराचे

एकमत

संस्थापक : विलासराव देशमुख



चांदी, सोने महागले; दोन आठवड्यांचा उच्चांक

NMK-1 (Golden)

Mo. 9881426974, 9850228053

शेअर बाजार ▶BSE-41,324(205) ▶NSE-12,170(55) चलन (रुपयात) ▶डॉलर-71.20 ▶युरो-79.08 ▶एकमत मित्र 7030903041


# शिक्षणशास्त्र महाविद्यालयास ३ सिल्व्हर पदके

**प्रतिनिधी / पांगरी : घावटे डी एम**



श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचालित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथील बी. पी. एड. प्रशिक्षणार्थींना क्रीडा महोत्सवात तीन सिल्व्हर पदके प्राप्त झाली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात २३ वा राज्यस्तरीय क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. यामध्ये या महाविद्यालयातील बी. पी. एड. प्रशिक्षणार्थींनी विद्यापीठ संघात सहभाग घेतला होता.

यात शुभांगी हिरेमठ, क्रांती बनकर व ज्योती बनसोडे यांनी अनुक्रमे बास्केटबॉल व गोळाफेक या क्रीडा प्रकारात यश मिळवले. या खेळाडूंना प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, बी. पी. एड. विभागप्रमुख डॉ. एस. एम. लांडगे, डॉ. ए. जी. कांबळे, प्रा. बी. टी. गुंड, प्रा. स्मिता सुरवसे व प्रा. पंकज नरळे यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, जनरल सेक्रेटरी व्ही. एस. पाटील, जॉईंट सेक्रेटरी पी. टी. पाटील, खजिनदार प्रा. डी. एस. रेवडकर, संस्थेचे सर्व सदस्य, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व प्रशिक्षणार्थींनी अभिनंदन केले आहे.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2019 - 2020**

पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी



बार्शी : शिक्षणशास्त्र महाविद्यालयात योगदिनाचे धडे घेताना शिक्षक.

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात योग दिन उत्साहात साजरा

**बार्शी (तालुका प्रतिनिधी)** : श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या जिम्नॅशिअम सभागृहात जागतिक योग दिन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे हे होते. योगप्रशिक्षक म्हणून बी.पी.एड. विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ. एस.एम. लांडगे हे उपस्थित होते. डॉ.ए.जी. कांबळे यांनी कार्यक्रमाचा उद्देश विषद केला. तसेच प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांनी जागतिक योगदिनाचे औचित्य साधून योग आणि मानवी जीवन याविषयीचा परस्पर संबंध स्पष्ट केला. प्रा.डॉ.ए.जी. कांबळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

डिजिटल शैक्षणिक दै. रयतेचा वाली (श्री. शाहू संभाजी भारती - ९९७५७३८३२१) (वर्ष १ - अंक २८१) शनिवार दिनांक ०१ ऑगस्ट २०२० पान ०७

## बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन

सोलापूर दि.३१ (रयतेचा वाली, ऑनलाइन वृत्तसेवा) कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे संस्थापित श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी जि. सोलापूर (महाराष्ट्र राज्य ) येथे बुधवार दिनांक ०५ ऑगस्ट २०२० रोजी एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय वेबिनारचा मुख्य विषय Security and Privacy Concerns in Online Teaching--Learning असा आहे. कोव्हीड-- १९ यामुळे शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत. पारंपारिक शिक्षण प्रणाली सोडून ऑनलाईन शिक्षण प्रणालीचा स्वीकार केला जात आहे. अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन, प्रशिक्षण आदि क्षेत्रांची परिमाणे बदलत आहेत. याचे शिक्षक, विद्यार्थी, पालक , समाज यांनी स्वागत केले आहे. याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाने वर्क फ्रॉम होम द्वारे ऑनलाईन शिक्षण प्रणाली देखील राबविली आहे. याचा बी.एड., बी.पी. एड.,एम. एड., एम. पी. एड., पीएच. डी. विध्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे. शिक्षकांनी देखील मोठ्या प्रमाणात वेबिनार, कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग नोंदवला आहे. महाविद्यालयातील प्राध्यापकांना मायक्रोसॉफ्ट टीम द्वारे प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच महाविद्यालयाने मायक्रोसॉफ्ट टीम या ॲपद्वारे विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन



शिक्षण प्रणाली सुरु केली आहे. म्हणूनच महाविद्यालयाने एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले आहे. ऑनलाईन शिक्षण प्रणाली राबविताना शिक्षक व विद्यार्थी यांची अध्ययन व अध्यापन यातील सुरक्षितता व गोपनीयता याविषयी माहिती घेणे गरजेचे असल्याचे लक्षात घेऊन हा राष्ट्रीय स्तरावरील वेबिनार आयोजित केला आहे. या वेबिनारसाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. वेबिनारसाठी मुख्य साधन व्यक्ती तथा मार्गदर्शक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद उपकेंद्र उस्मानाबाद येथील शिक्षणशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. महेश्वर कळलावे हे मार्गदर्शन करणार आहेत.

यातून ऑनलाईन शिक्षण प्रणालीचे विविध पैलू तसेच सुरक्षितता व गोपनीयता यावर चिंतन केले जाणार आहे. प्रचलित शिक्षण प्रणालीत ऑनलाईन शिक्षण प्रणाली संकल्पना, घटक, संरचना, क्षेत्रे, परिमाणे, प्रभाव व उपयुक्तता यावर देखील सविस्तर चर्चा केली जाणार आहे. या वेबिनारसाठी महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यातील शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आदी सहभागी होणार आहेत. हा वेबिनार निःशुल्क आहे.वेबिनार मध्ये सहभागी झाल्यानंतर ई प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या वेबिनारमध्ये सहभागी होण्यासाठी गुगल लिंकचा वापर करता येईल असे संयोजकांनी कळविले आहे. या राष्ट्रीय स्तरावरील वेबिनारमध्ये जास्तीत जास्त इच्छुकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य तथा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे व्यवस्थापन परिषद व सिनेट सदस्य आणि आंतर विद्याशाखीय अभ्यासचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. गोरे ९८५०३६८३८५, महाविद्यालयाचे आय. क्यु. ए. सी. समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे ९५२७१७०४६१, समन्वयक डॉ. पी. ए. पाटील ९८९०६२७१७९ यांनी केले आहे.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

# रयतेचा वाली

डिजिटल शैक्षणिक दैनिक




डिजिटल शैक्षणिक दै. रयतेचा वाली (श्री. शाहू संभाजी भारती - ९९७५७३८३२१) (वर्ष १ - अंक २८१) शनिवार दिनांक ०८ ऑगस्ट २०२० पान ०७

## बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय वेबिनारचे यशस्वी आयोजन

सोलापूर: दि.७ (रयतेचा वाली,प्रतिनिधी श्री.गणेश पवार): कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे संस्थापित श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी जि. सोलापूर (महाराष्ट्र राज्य ) येथे बुधवार दिनांक ०५ ऑगस्ट २०२० रोजी एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय वेबिनारचा मुख्य विषय "Security and Privacy Concerns in Online Teaching-Learning" असा होता.

कोव्हीड -१९ यामुळे शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत. पारंपारिक शिक्षण प्रणाली सोडून ऑनलाईन शिक्षण प्रणालीचा स्वीकार केला जात आहे. अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन, प्रशिक्षण आदि क्षेत्रांची परिमाणे बदलत आहेत. याचे शिक्षक, विद्यार्थी, पालक , समाज यांनी स्वागत केले आहे. याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाने वर्क फ्रॉम होम द्वारे ऑनलाईन शिक्षण प्रणाली देखील राबविली आहे. याचा बी.एड., बी.पी.एड, एम.एड., एम.पी.एड.,पीएच. डी. विध्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे. म्हणूनच महाविद्यालयाने एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले होते. ऑनलाईन शिक्षण प्रणाली राबविताना शिक्षक व विद्यार्थी यांची अध्ययन व अध्यापन यातील सुरक्षितता व गोपनीयता याविषयी माहिती घेणे गरजेचे असल्याचे लक्षात घेऊन हा राष्ट्रीय स्तरावरील वेबिनार आयोजित करण्यात आला होता.

या वेबिनारसाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव हे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणातून डॉ. बी. वाय. यादव यांनी संस्थेच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती विशद केली. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या विचारांचा वारसा अशा प्रकारच्या नाविन्यपूर्ण उपक्रमातून राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. कोव्हीड -१९ या काळात जगदाळे मामा हॉस्पिटल राबवित असलेल्या सेवा सुविधांचा त्यांनी उल्लेख केला. अत्याधुनिक सुविधा असलेल्या ट्रामा युनिटची उपयुक्तता विशद केली. ऑनलाईन शिक्षण ही सद्यस्थितीची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थी व शिक्षक यांनी ऑनलाईन शिक्षण प्रणाली आत्मसात करावी असे आवाहन त्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य तथा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद व सिनेट सदस्य आणि आंतर विद्याशाखीय अभ्यासचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. गोरे यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले. महाविद्यालयाची गुणवत्ता, विकास व नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. कोव्हीड -१९ मधील वर्क फ्रॉम होम च्या कार्याची माहिती सांगितली. ऑनलाईन शिक्षण प्रणालीचा वापर करुन शिक्षण प्रक्रियेत गतिमानता व लवचिकता आणणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. ऑनलाईन शिक्षण प्रणालीत सुरक्षितता व गोपनीयता याचा सर्वांनीच अवलंब करावा असे आवाहन त्यांनी केले.

वेबिनारसाठी मुख्य साधन व्यक्ती तथा मार्गदर्शक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद उपकेंद्र उस्मानाबाद येथील शिक्षणशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. महेश्वर कळलावे यांनी मार्गदर्शन केले.यातून ऑनलाईन शिक्षण प्रणालीचे विविध पैलू तसेच सुरक्षितता व गोपनीयता यावर सविस्तर माहिती विशद केली. प्रचलित शिक्षण प्रणालीत ऑनलाईन शिक्षण प्रणाली संकल्पना, घटक, संरचना, क्षेत्रे, परिमाणे, प्रभाव व उपयुक्तता यावर देखील मार्गदर्शन केले.ऑनलाईनचे स्वरूप, इंटरनेट माहिती, ब्राउझर सुरक्षितता, सोशल नेटवर्किंग,सायबर धोके, ऑनलाईन हॅकिंग, फिशिंग आदि महत्वपूर्ण घटकांवर प्रभावी सादरीकरणातून सखोल मार्गदर्शन केले.

त्यामुळे ऑनलाईन प्रणालीची आवश्यक माहिती घेऊन वापर केल्यास सुरक्षितता व गोपनीयता राखता येईल असे त्यांनी आपल्या व्याख्यानातून स्पष्ट केले. प्रश्नोत्तराद्वारे सहभागी विद्यार्थी व शिक्षकांच्या प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. वेबिनारसाठी महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यातील शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आदींसह सुमारे ४८४६ व्यक्तींनी सहभाग नोंदवला. या वेबिनारसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले नव्हते. वेबिनार मध्ये सहभागी झालेल्या सहभागी व्यक्तींना ई-प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन समन्वयक डॉ.पी.ए.पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.बी.वाय.यादव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस.गोरे यांचा परिचय डॉ.एम.व्ही.मते यांनी करून दिला. साधन व्यक्ती डॉ.महेश्वर कळलावे यांचा परिचय डॉ.आर.ए.फुरडे यांनी करून दिला. वेबिनारसाठी उपस्थितांचे आभार नॅक आय.क्यु.ए.सी.समन्वयक प्रोफेसर डॉ. व्ही.पी.शिखरे यांनी व्यक्त केले. वेबिनार यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

# रयतेचा वाली

डिजिटल शैक्षणिक दैनिक




डिजिटल शैक्षणिक दै. रयतेचा वाली (श्री. शाहू संभाजी भारती - ९९७५७३८३२१) (वर्ष १ - अंक २९४) शुक्रवार दिनांक १४ ऑगस्ट २०२० पान ०३

## बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात योगा आधारित राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन

सोलापूर: दि.१३(रयतेचा वाली, ऑनलाइन वृत्तसेवा): कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे संस्थापित श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी जि. सोलापूर महाराष्ट्र राज्य येथे रविवार दिनांक १६ ऑगस्ट २०२० रोजी एक दिवसीय दुसरे राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय वेबिनारचा मुख्य विषय "Role of Yoga for Maintaining Mental Health in COVID -19" असा आहे. कोव्हीड -१९ यामुळे दैनंदिन मानवी जीवनात आमूलाग्र बदल होत आहेत. पारंपारिक जीवन प्रणाली ढासळली आहे. मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात बदल झाल्याचे दिसून येत आहे. यांस आरोग्य व शिक्षण क्षेत्रही अपवाद नाही. शिक्षण क्षेत्रात ऑनलाईन शिक्षण प्रणाली स्वीकारली जात आहे. वर्क फ्रॉम होम च्या माध्यमातून शैक्षणिक कार्ये मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येत आहे. तंत्रज्ञान आत्मसात करून प्रत्येक जण स्वतःला बदलू पाहत आहे. एकंदरीत शिक्षण प्रणालीतील विविध टप्प्यावर डिजिटल प्रणाली कार्यरत झाली आहे. यातूनच अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन, प्रशिक्षण यांचे स्वरूप बदलत आहे. याचे शिक्षक, विद्यार्थी, पालक, समाज यांनी स्वागत केले आहे. याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाने वर्क फ्रॉम होम द्वारे ऑनलाईन शिक्षण प्रणाली देखील राबविली आहे. याचा बी. एड., बी. पी. एड., एम. एड., एम. पी. एड., पीएच. डी. विध्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे.



कोव्हीड -१९ यामुळे मानवी आरोग्यावर देखील परिणाम होत आहे. ऑनलाईन प्रणालीमुळे घरी राहून काम सुरु आहे. यामुळे शरीर आणि मन याबाबतच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढतच आहेत. योगासने, शारीरिक हालचाली, व्यायाम यांना पूर्वीपेक्षाही अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

ऑनलाईन योगासने शिबिरे आयोजित केली जात आहेत. याचा मानसिक स्वास्थ्यावर चांगल्या प्रकारे परिणाम होतो आहे. म्हणूनच महाविद्यालयाने एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले आहे. ऑनलाईन शिक्षण प्रणाली राबविताना शिक्षक व विद्यार्थी यांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य टिकविणे तसेच मानसिक आरोग्य व संतुलन जपणे गरजेचे असल्याचे लक्षात घेऊन हा राष्ट्रीय स्तरावरील वेबिनार आयोजित केला आहे

या वेबिनारसाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष मा.श्री.नंदनजी जगदाळे हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. वेबिनारसाठी मुख्य साधन व्यक्ती तथा मार्गदर्शक म्हणून लोणावळा योगा केंद्राचे संचालक डॉ मन्मथ घारोटे हे मार्गदर्शन करणार आहेत. यातून मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी योगासनांची भूमिका तसेच योगा जीवनप्रणालीचे विविध पैलू तसेच शारीरिक व मानसिक स्वास्थ्य यावर चिंतन केले जाणार आहे. ऑनलाईन शिक्षण प्रणाली राबविताना शारीरिक हालचाली, दैनंदिन व्यायाम, योगासने आदींचे महत्त्व व उपयुक्तता यावर देखील सविस्तर चर्चा केली जाणार आहे. या वेबिनारसाठी महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यातील शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आदी सहभागी होणार आहेत. हा वेबिनार निःशुल्क आहे.

वेबिनार मध्ये सहभागी झाल्यानंतर ई-प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या वेबिनारमध्ये सहभागी होण्यासाठी https://docs.google.com/forms/d/1JEslTZgdsyH42nEz0JZ4wocDtjaEyDBRHYHf5gHOJuc/edit?usp=sharing लिंकचा वापर करता येईल असे संयोजकांनी कळविले आहे. या राष्ट्रीय स्तरावरील वेबिनारमध्ये जास्तीत जास्त इच्छुकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य तथा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे व्यवस्थापन परिषद व सिनेट सदस्य आणि आंतर विद्याशाखीय अभ्यासाचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. गोरे (९८५०३६८३८५) , महाविद्यालयाचे आय. क्यु. ए. सी. समन्वयक प्रोफेसर डॉ. व्ही. पी. शिखरे (९५२७१७०४६१), समन्वयक प्रोफेसर डॉ. सुरेश लांडगे (९८२२०९०३३०) यांनी केले आहे. अशी माहिती प्रोफेसर डॉ. एम.व्ही. मते यांनी दिली.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

# Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's
# College of Education, Barshi
## Publicity 2020 - 2021

रयतेचा वाली
डिजिटल शैक्षणिक दैनिक




डिजिटल शैक्षणिक दै. रयतेचा वाली (श्री. शाहू संभाजी भारती - ९९७५७३८३२१) (वर्ष १ - अंक २९१) बुधवार दिनांक १९ ऑगस्ट २०२० पान ०५

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर ऑनलाईन शैक्षणिक व्याख्यानमालेचे आयोजन

सोलापूर: दि.१८( रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे संस्थापित श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी जि. सोलापूर आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक परिषद यांचे संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक २० ऑगस्ट २०२० ते रविवार दिनांक २३ ऑगस्ट २०२० या कालावधीत राज्यस्तरीय ऑनलाइन शैक्षणिक व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले आहे. या राज्यस्तरीय ऑनलाइन शैक्षणिक व्याख्यान मालेचा मुख्य विषय "नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०" असा आहे.

देशाच्या शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल घडवून आणणारे "नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०" नुकतेच केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाने मान्य केले आहे. विविध शैक्षणिक आयोग व धोरणे यातूनच शिक्षण प्रणाली ठरविली जाते. नवीन शैक्षणिक धोरणाचा उद्देश, सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण प्रदान करून आपल्या राष्ट्राला सातत्याने न्याय्य व चैतन्यमय ज्ञानी समाजामध्ये परावर्तित करण्यात थेट योगदान देणे असा आहे. नवीन शैक्षणिक धोरणातील शालेय शिक्षण,उच्च शिक्षण, शिक्षक शिक्षण आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे संपूर्ण मूल्यमापन याबाबत सविस्तर माहिती जाणून घेणे गरजेचे असल्याचे लक्षात घेऊन ही चार दिवसीय राज्यस्तरीय शैक्षणिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे.

या शैक्षणिक व्याख्यान मालेचा उदघाटन कार्यक्रम गुरुवार दिनांक २० ऑगस्ट २०२० रोजी होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालिका डॉ. राजश्री देशपांडे या असणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे जनरल सेक्रेटरी मा. श्री. व्ही. एस. पाटील हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. जेष्ठ शिक्षणतज्ज्ञ तथा माजी प्राचार्य डॉ. एच. एन. जगताप हे मुख्य साधन व्यक्ती तथा मार्गदर्शक म्हणून शालेय शिक्षण या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. शुक्रवार दिनांक २१ ऑगस्ट २०२० रोजी नवीन शैक्षणिक धोरणातील उच्च शिक्षण या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रोफेसर डॉ. मेघा उपलाने या मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव मा. श्री.पी. टी. पाटील हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

**या शैक्षणिक व्याख्यानमालेमध्ये सहभागी होण्यासाठी**
**https://docs.google.com/forms/d/140FtjWpg5VGW4vdpL16FnY56IfEj-a44mpEqwXDnpus/edit?usp=sharing**
**लिंकचा वापर करता येईल असे संयोजकांनी कळविले आहे.**

शनिवार दिनांक २२ ऑगस्ट २०२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर उस्मानाबाद येथील शिक्षणशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. महेश्वर कळलावे हे साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. नवीन शैक्षणिक धोरणातील शिक्षक शिक्षण हा त्यांच्या व्याख्यानाचा मुख्य विषय आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार मा. प्रा. श्री. दिलिप रेवडकर हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. व्याख्यानमालेचा समारोप रविवार दिनांक २३ ऑगस्ट२०२० या दिवशी होणार आहे. जेष्ठ शिक्षण तज्ज्ञ तथा गोंदिया येथील पुंजाभाई पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. भांडारकर हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संपूर्ण मूल्यमापन या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. बी. वाय. यादव हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

या राज्यस्तरीय शैक्षणिक व्याख्यानमालेतून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यातील विविध पैलूंवर सविस्तर चर्चा व चिंतन केले जाणार आहे. शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, शिक्षक शिक्षण आणि संपूर्ण मूल्यमापन यांचे विविधांगी स्वरूप, भविष्यातील अपेक्षा, शैक्षणिक, राष्ट्रीय व सामाजिक उपयुक्तता यावर देखील सविस्तर चर्चा केली जाणार आहे.

या शैक्षणिक व्याख्यानमालेसाठी महाराष्ट्र राज्यातील शिक्षण तज्ज्ञ, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक, संशोधक आदी सहभागी होणार आहेत. ही शैक्षणिक व्याख्यानमाला निःशुल्क आहे. या व्याख्यानमालेत सहभागी झाल्यानंतर ई-प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

सदर व्याख्यानमालेत जास्तीत जास्त इच्छुकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य तथा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे व्यवस्थापन परिषद व सिनेट सदस्य आणि आंतर विद्याशाखीय अभ्यासचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. गोरे ९८५०३६८३८५, महाविद्यालयाचे आय. क्यु. ए. सी. समन्वयक प्रोफेसर डॉ. व्ही. पी. शिखरे ९५२७१७०४६१, समन्वयक डॉ. एम. एस. डिसले ९५०३६३७८१७ यांनी केले आहे.

College of Education Dist. Solapur Barshi.

सोलापूर जिल्हा

## कोविड-१९ • दैनंदिन मानवी जीवनात होत आहेत आमूलाग्र बदल

# बार्शी येथील योगआधारित राष्ट्रीय वेबिनारमध्ये २१०० जण सहभागी

प्रतिनिधी | बार्शी

येथील शिक्षण शास्त्र महाविद्यालयात रविवारी एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले होते. रोल ऑफ योगा फॉर मेन्टेनिंग मेंटल हेल्थ इन कोविड- १९ असा या वेबिनारचा विषय होता.

कोविड-१९ मुळे दैनंदिन मानवी जीवनात आमूलाग्र बदल होत आहेत. शिक्षण क्षेत्रात ऑनलाइन शिक्षण प्रणाली स्वीकारली जात आहे. यातूनच अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन, प्रशिक्षण यांचे स्वरूप बदलत आहे. ऑनलाइन प्रणालीमुळे घरी राहून काम सुरू आहे. यामुळे शरीर आणि मन याबाबतच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढतच आहेत. योगासने, शारीरिक हालचाली, व्यायाम यांना पूर्वीपेक्षाही अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. ऑनलाइन योगासने शिबिरे आयोजित केली जात आहेत. याचा मानसिक स्वास्थ्यावर चांगल्या प्रकारे परिणाम होतो आहे. म्हणूनच महाविद्यालयाने एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले होते. ऑनलाइन शिक्षण प्रणाली राबविताना शिक्षक व विद्यार्थी यांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य टिकविणे तसेच मानसिक आरोग्य व संतुलन जपणे गरजेचे असल्याचे लक्षात घेऊन हा राष्ट्रीय स्तरावरील वेबिनार आयोजित करण्यात आला.

लोणावळा योगा केंद्राचे संचालक डॉ. मन्मथ घरोटे यांनी शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी योगासनांची भूमिका, योग जीवनप्रणालीचे विविध पैलू, शारीरिक व मानसिक स्वास्थ्य यावर सविस्तर मार्गदर्शन केले. मानवी व्यक्तिमत्त्वाची संरचना, मानसिक आरोग्य व योगाचे महत्त्व याविषयी माहिती दिली. दैनंदिन जीवनातील अस्वस्थता, निराशा, शरीर व मनाशी संबंधित आजार यावर चर्चा केली. विपरीत तत्त्वज्ञान यामध्ये अपचन, वाचा विकार, निराहार, मौन, स्थिरत्व या संकल्पना स्पष्ट केल्या. सामाजिक, भावनिक, मानसिक, शारीरिक व आध्यात्मिक एकात्मता याविषयी सविस्तर विवेचन केले. संयम, तप, पोषण, संकल्प, दया, प्रेरणा, अंतर्गत संदेश व विश्वास याद्वारे आपण कोविड-१९ या आजाराचा यशस्वीपणे सामना करून मानसिक आरोग्य राखता येईल, असे त्यांनी म्हटले. प्रश्नोत्तराद्वारे सहभागी विद्यार्थी व शिक्षकांच्या प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. यात राज्यासह देशातील इतर राज्यातील शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षणतज्ञ, संशोधक यांच्यासह सुमारे २१०० व्यक्तींनी सहभाग नोंदवला. यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क नव्हते. यात सहभागी व्यक्तींना ई-प्रमाणपत्र दिले. प्रास्ताविक प्रा. पंकज नरळे, आभार प्रा. डॉ. सुरेश लांडगे यांनी मानले. यावेळी प्रा. स्मिता सुरवसे, प्रा. डॉ. अनिल कांबळे उपस्थित होते. प्रा. डॉ. विष्णू शिखरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### योगासने महत्त्वाची

अध्यक्षस्थानावरून संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे म्हणाले, शारीरिक व मानसिक समस्यांसाठी योगासनांची महत्त्वाची भूमिका आहे. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे म्हणाले, कोविड-१९ मध्ये निर्माण झालेल्या शैक्षणिक व सामाजिक समस्यांचा सामना करण्यासाठी योगासने महत्त्वाची भूमिका बजावतात. दैनंदिन जीवनात शारीरिक व मानसिक संतुलन राखण्यासाठी सर्वांनी योगासने केली पाहिजेत.

College of Education Dist. Solapur Barshi

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी

# बार्शीत 'सावित्रीच्या आत्मनिर्भर लेकी' राज्यस्तरीय वेबिनार

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी व जिजाऊ-सावित्री-रमाई महिला बालविकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 'सावित्रीच्या आत्मनिर्भर लेकी' या राज्यस्तरीय ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

महिलांच्या नाविन्यपूर्ण कार्यप्रणालीचा आढावा व विचारमंथन याबाबत सविस्तर माहिती जाणून घेण्यासाठी हा वेबिनार आयोजित करण्यात आला. प्रास्ताविक महिला व बाल विकास समितीच्या अध्यक्षा प्रा. माधुरी शिंदे यांनी केले. प्रा. स्मिता सुरवसे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, महिला सक्षमीकरणाबाबत एक सकारात्मक व विधायक विचारप्रवाह रुजणे गरजेचे आहे. याबाबत शासन नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे. कर्मवीर मामांनी देखील मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले. महाविद्यालयात नेहमीच महिलांच्या सक्षमीकरणाबाबत उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. मीरा यादव यांनी महिला सक्षमीकरणाबाबत मार्गदर्शन केले. संस्था व महाविद्यालयाच्या वतीने महिला सक्षमीकरणाबाबत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले. महिलांना स्वातंत्र्य मिळाले. महिला व युवतींनी सक्षम होणे गरजेचे आहे. संस्कृती जतन व संक्रमणात महिलांचे योगदान उल्लेखनीय आहे. सर्वांनी महिलांचा आदर व सन्मान करावा, असे त्यांनी आवाहन केले. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे येथील उपसंचालक डॉ. कमलादेवी आवटे यांनी मुख्य साधन व्यक्ती तथा मार्गदर्शक म्हणून सावित्रीच्या आत्मनिर्भर लेकी या विषयावर सखोल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. या थोर महिलांचा वसा आणि वारसा चालविण्याचे कार्य आज होत असताना दिसून येत आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक अंतर हा शब्दप्रवाह रूढ झाला. यातूनच नवीन विचारप्रवाह तयार झाले. महिलांच्या कर्तृत्वाचे स्वागत मोठ्या मनाने केले पाहिजे. महिलांबाबतच्या संकुचित धारणांना सुरुंग लावण्याचे धाडसी काम या कर्तृत्ववान महिलांनी केले. यावेळी त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यकर्तृत्वाचा सविस्तर आढावा घेतला. निर्णय स्वातंत्र्याची दोरी महिलांच्या हातात येणे गरजेचे आहे.

महिला सक्षमीकरण अभ्यासक्रमातील विविध पैलूंवर सविस्तर चर्चा केली. महिला सबलीकरण हे फलित नसून ती एक प्रक्रिया आहे. शिक्षणातून महिला सक्षमीकरणाबाबत विशेष प्रयत्न करायला हवेत, असे आवाहन त्यांनी केले. या वेबिनारमध्ये संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे आदी उपस्थित होते. व्याख्यानमालेसाठी प्राचार्य डॉ. गोरे, जिजाऊ-सावित्री-रमाई महिला बळ विकास समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य, प्रा.डॉ. शिखरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

Solapur Edition
Sep 3, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

स्टार सिटी १ **बार्शी फोकस**
डिजीटल दुनियेतील सर्वात वेगवान गतीमान वार्तांकन..
STAR CITY1
■ बुधवार दि. २३ सप्टेंबर २०२०
■ MSME REG. NO.: MH26DO161766




## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात वायुपुत्र नारायणराव जगदाळे यांची जयंती साजरी

# मान्यवरांनी दिला बाबांच्या आठवणीला उजाळा

बार्शी । प्रतिनिधी

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचालित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे मंगळवार दिनांक २२/०९/२०२० रोजी वायुपुत्र नारायणराव जगदाळे यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा डॉ बी वाय यादव हे होते. यावेळी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे, प्राचार्य डॉ प्रकाश थोरात, प्राचार्य डॉ एस के पाटील, प्राचार्य डॉ दीपक गुंड, काकासाहेब जगदाळे, कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे गौरव समितीचे सदस्य श्री धनंजय जगदाळे, पत्रकार श्री सचिन वायकुळे आदी मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे व वायुपुत्र नारायणराव जगदाळे यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. डॉ बी वाय यादव यांनी वायुपुत्र नारायणराव जगदाळे तथा बाबा यांचे दातृत्व व कर्तृत्व विशद केले. बाबांनी आयुष्यभर सेवाभाव जोपासला. गरीब व होतकरु विद्यार्थी व मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले व आर्थिक मदत केली. संस्थेच्या विविध उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. संस्थेच्या जिजाऊ, सावित्री, रमाई महिला बळ विकास समिती, कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे स्मारक, कर्मयोगी स्मरणिका, कर्मवीर जलतरण तलाव,कर्मवीर ज्योत आदी उपक्रमांत बाबांचे योगदान उल्लेखनीय आहे. बाबांच्या नावाने एक सेवाभावी ट्रस्ट स्थापन करुन शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी सर्वांनी भरीव योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ एस एस गोरे यांनी बाबांच्या सेवाभावी व दानशूर कार्याचा आढावा घेतला. बाबा हे एक ध्येयनिष्ठ व त्यागी व्यक्तिमत्त्व होते असे त्यांनी प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ पी आर थोरात यांनी बाबांच्या सामाजिक कार्याची माहिती सांगितली. दैनिक संचारचे पत्रकार श्री सचिन वायकुळे यांनी बाबांच्या मातृत्व, दातृत्व व कर्तृत्व अशा बहुआयामी कार्याची माहिती सांगितली. बाबांनी विद्यार्थी, विद्यार्थिनी व महिलांच्या संदर्भातील केलेल्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा घेतला. डॉ पी ए पाटील यांनी मनोगत व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. आभार डॉ आर ए फुरडे यांनी मानले. वायुपुत्र नारायणराव जगदाळे तथा बाबांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबीराचे आयोजन श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथे करण्यात आले होते. यात एकूण ९४ स्वेच्छा रक्तदात्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.





SBI

आला आहे एसबीआय मेगा ई-लिलाव.
1000+ मालमत्तांसाठी बोली उघडण्यात येत आहेत.

ई-लिलावाची तारीख | 30 सप्टेंबर, 2020

नोंदणी करण्यासाठी खाली दिलेल्या कोणत्याही वेबसाइटवर लॉग ऑन करा:

| वेबसाइट | हेल्पलाइन |
|---|---|
| https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp | 033-22901004 |
| www.sbi.auctiontiger.net | 079 4000 5400 / 34 / 04 |
| www.bankeauctions.com/sbi | 0124 - 4302020 / 21 / 22 / 23 / 24 |
| www.tenderwizard.com/SBIEAUCTION | 18004256185 |



अनेक विविध मोकळे प्लॉट्स, निवासी, औद्योगिक आणि व्यावसायिक मालमत्तांचा लिलाव.
यशस्वी बोलीधारकांसाठी पात्रते अनुसार कर्ज उपलब्ध.

अधिक माहितीसाठी:
https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction-notices/bank-e-auctions,
https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction-notices/mega-e-auction &
https://ibapi.in

College of Education * Dist. Solapur * Barshi.

पुढारी News By गणेश गोडसे, बार्शी




बार्शी : येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात महात्मा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित प्राचार्य व प्राध्यापक.

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात महात्मा महोत्सवाचे आयोजन

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने १ ते ७ ऑक्टोबर या कालावधीत महात्मा गांधी जयंती सप्ताह तथा महात्मा महोत्सव ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात आला आहे. महात्मा गांधीजींची विचारधारा आजच्या युवकांना व समाजाला दिशादर्शक ठरते.

गांधीवादी विचारधारेचे विविध पैलू सर्वांना ज्ञात व्हावेत व सर्वांनी अंगीकार करावा, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे व समन्वयक डॉ. एम.एस. डिसले यांनी सांगितले.

यानिमित्ताने १ ऑक्टोबर रोजी प्रा. दत्तात्रय मांजरे यांचे ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'महात्मा गांधीजींच्या विचारांची समकालिन प्रस्तुतता' असा होता. प्रा. मांजरे यांनी महात्मा गांधींच्या विविध विचारदर्शनाचे पैलू विशद केले. महात्मा गांधींचे विचार व तत्वज्ञान चिरंतन आहे. सर्वांनी दैनंदिन जीवनात ही विचारप्रणाली राबवावी, असे आवाहन त्यांनी केले.

२ ऑक्टोबर रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे व इतर मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे, महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बी.एड. विभागप्रमुख डॉ. एस.डी. भिलेगावकर, बी.पी. एड. विभागप्रमुख डॉ. सुरेश लांडगे, डॉ. एम.एस. डिसले, प्रा. बी.टी. गुंड, डॉ. आर.ए. फुरडे, शिवराम गायकवाड आदी उपस्थित होते. ७ तारखेपर्यंत विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

Solapur Edition

College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

# रयतेचा वाली

**डिजिटल शैक्षणिक दैनिक**

मुख्य संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ )  ~ वर्ष दुसरे - अंक ०४९ ~  सोमवार दिनांक ०२/११/२०२० पान ०३

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्रा. बी. टी. गुंड सेवानिवृत्त



सोलापूर: दि.१ (रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथील शारीरिक शिक्षण विभागाचे सहयोगी प्राध्यापक श्री. भारत तुकाराम गुंड हे आपल्या ३५ वर्षाच्या प्रदीर्घ शिक्षक सेवेतून दिनांक ३१ ऑक्टोबर २०२० रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. यानिमित्ताने संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतीने सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. बी. वाय. यादव, जनरल सेक्रेटरी मा. श्री. विष्णू पाटील, विश्वस्त मा. प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, बी. पी. एडचे विभागप्रमुख डॉ. सुरेश लांडगे, एम पी एड विभागप्रमुख प्रा. जी. एस. फडतरे, प्रा. बी. टी. गुंड आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. बी. टी. गुंड यांनी बी. पी. एड व एम. पी. एड विभागाकडे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्य केले. वक्तशीरपणा व संयमी स्वभाव ही त्यांची विशेष गुणवैशिष्ट्ये आहेत. एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांची ओळख आहे. उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक म्हणून सरांचे कार्य उल्लेखनीय आहे. म्हणूनच महाराष्ट्र राज्य क्रीडा महासंघाच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले आहे.कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमांचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून सर्वांनी राष्ट्रीय एकतेची प्रतिज्ञा घेतली. डॉ. आर. ए. फुरडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

डॉ. ए. जी. कांबळे व डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी प्रा. गुंड सर यांच्या कार्यकर्तृत्वावर मनोगते व्यक्त केली. प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे यांनी उत्कृष्ठ क्रीडा मार्गदर्शक म्हणून प्रा. गुंड सर यांचा उल्लेख केला. तसेच विनम्रता व आदरभाव या गुणवैशिष्ट्यामुळेच ते आपल्या जीवनात यशस्वी झाले असे सांगितले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी प्रा गुंड सरांच्या उत्कृष्ट कार्यशैलीचा आढावा घेतला.

ते म्हणाले की, सरांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले अनेक क्रीडा शिक्षक व खेळाडू नावलौकिक प्राप्त करत आहेत. प्रवेश प्रक्रिया, क्रीडास्पर्धांचे आयोजन तसेच महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावरील विविध समितीतील सरांचा सहभाग उल्लेखनीय राहिला आहे. ते नेहमी प्रसिध्दी पासून दूर राहत आलेले आहेत. सर्वांशी सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्यात ते यशस्वी झाले आहेत असे त्यांनी सांगितले.

प्रा. बी. टी. गुंड यांनी देखील संस्था व महाविद्यालयातील सर्वांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अध्यक्षीय समारोपात डॉ. बी. वाय. यादव यांनी प्रा गुंड सरांना संस्थेच्या वतीने भावी आयुष्यासाठी आरोग्यमय शुभेच्छा दिल्या. प्रा गुंड यांच्या उत्कृष्ठ कार्याचा सविस्तर आढावा घेतला. खेळाडूंना प्रेरणादायी असलेले व्यक्तिमत्त्व आज सेवानिवृत्त होत असल्याचे त्यांनी नमूद केले. येथून पुढे देखील सरांनी संस्थेच्या कार्यात सहभागी व्हावे असे सांगितले. तसेच कोरोनाच्या काळात सर्वांनी काळजी घ्यावी याविषयी सूचना केल्या. जगदाळे मामा हॉस्पिटलच्या ट्रामा सेंटर उभारणीसाठी सर्वांनी सढळ हाताने मदत करावी असे याप्रसंगी आवाहन केले. प्रा. सौ. स्मिता सुरवसे यांनी आभार प्रदर्शन केले. प्रा. पी. पी. नरळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास प्राध्यापक वृंद व कर्मचारी उपस्थित होते.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

# रयतेचा वाली

डिजिटल शैक्षणिक दैनिक

!! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !!



प्रा.राजेंद्र दशरथ सोनवणे.(कवी-वादळकार,पुणे) राष्ट्रीय अध्यक्ष-नक्षत्राचं देणं काव्यमंच. साई कला आविष्कार नाट्य संस्था. साईराजे पब्लिकेशन, पुणे. जुन्नर तालुका मित्र मंडळ(पुणे). पत्ता-साई सदन,ए/३,महालक्ष्मी हाईटस,भोसरी,पणे३९

मुख्य संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) ~ वर्ष दुसरे - अंक ०५० ~ मंगळवार दिनांक ०३/११/२०२० पान ०३

## 'सर्जनशील व्यक्तिमत्त्व : डॉ. बी. वाय. यादव' ग्रंथाचे

## अमृत महोत्सवी वर्षानिमित्त थाटात प्रकाशन

सोलापूर दि:२ (रयतेचा वाली - श्री.गणेश पवार) श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संस्थेचे विद्यमान अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी संपादित केलेल्या 'सर्जनशील व्यक्तिमत्त्व : डॉ. बी. वाय. यादव' या ग्रंथाचे प्रकाशन संस्थेचे जनरल सेक्रेटरी श्री. विष्णू पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, जनरल सेक्रेटरी श्री विष्णू पाटील, विश्वस्त प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, बी. पी. एड विभागप्रमुख डॉ. सुरेश लांडगे, एम. पी. एड विभागप्रमुख प्रा. जी. एस. फडतरे, प्रा. बी. टी. गुंड आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. क्षेत्र भगवंत आणि कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या पवित्र भूमीत शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रात विधायक व सेवाभावी वृत्तीने कार्य करणारे एक महान धन्वंतरी म्हणून डॉ. बी. वाय. यादव यांचा उल्लेख केला जातो. सामाजिक जीवनात मानवतावादाची जोपासना करत त्यागी व समर्पित भावाने जीवन जगणारे डॉ. यादव हे एक महान ध्येयवादी आहेत.

ते रुग्णसेवेचा मानदंड जपणारे थोर धन्वंतरी आहेत. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्रांतीचा विचार वारसा आपल्या कृतिशील जीवन कार्यातून प्रगतीपथावर नेणाऱ्या डॉ. यादव यांची स्फूर्तीगाथा अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. म्हणूनच या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले आहे.



या ग्रंथामध्ये प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे ,बार्शी भूषण डॉ. बी. वाय. यादव, संस्थेचे विश्वस्त प्राचार्य व. न. इंगळे गुरुभक्तीचा गौरवशाली गौरीशंकर, संस्थेचे विश्वस्त प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बबन यशवंत यादव, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे एक सर्जनशील धन्वंतरी डॉ. बी. वाय. यादव अशा प्रकारे लेखनाची सविस्तर मांडणी करण्यात आली आहे.

या ग्रंथात डॉ. यादव यांच्या कार्याचा आढावा घेणारी छायाचित्रे समाविष्ट करण्यात आली आहेत. तसेच संस्थेचे पदाधिकारी यांनी डॉ. यादव यांचा कार्यगौरव केलेली भावविधाने आहेत. डॉ. यादव यांचे कार्य व पुरस्कार यांची देखील सविस्तर माहिती यात देण्यात आली आहे.

म्हणूनच तरुणांसाठी अत्यंत प्रेरणादायी असलेला हा एक दुर्मिळ ग्रंथ आहे. साई प्रिंटिंग प्रेसचे संचालक श्री. गिरीश सोनार यांनी अत्यंत कमी कालावधीत आकर्षक व सुबक असा हा ग्रंथ तयार केला आहे.

डॉ. यादव यांनी हा ग्रंथ प्रकाशित केलेल्या लेखकांचे आभार व्यक्त केले. तसेच जगदाळे मामा हॉस्पिटल येथील ट्रामा सेंटर उभारणीसाठी सर्वांनी सढळ हाताने मदत करावी असे आवाहन केले.

ग्रामीण भागातील गरीब, कष्टकरी, शेतकरी व गरजू रुग्णांसाठी सेवा करणारे डॉ यादव हे एक भूतलावरील देवदूत आहेत. रुग्णांसाठी वैद्यकीय कुशलता पणाला लावणारे डॉ. यादव हे एक निष्णात सर्जन आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जगदाळे मामा हॉस्पिटल मध्ये ट्रामा सेंटर उभारले जात आहे.

**सर्वसामान्य परिस्थितीतून असामान्य व्यक्तिमत्त्व घडण्यासाठी हा ग्रंथ अनेकांना प्रेरणादायी आहे. म्हणूनच हा ग्रंथ प्रकाशित केल्याचे संपादक प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी सांगितले. या ग्रंथ प्रकाशन कार्यक्रमास प्राध्यापक वृंद व कर्मचारी उपस्थित होते.**

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

# रयतेचा वाली

डिजिटल शैक्षणिक दैनिक

मुख्य संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) ~ वर्ष दुसरे - अंक ०५६ ~ सोमवार दिनांक ०९/११/२०२० पान ०५

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ऑनलाईन सराव अध्यापन व छात्रसेवाकाल संपन्न

सोलापूर : दि:८ (रयतेचा वाली - ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे ०१ नोव्हेंबर ते ०८ नोव्हेंबर २०२० या कालावधीत बी. एड. द्वितीय वर्ष सत्र तिसरे अंतर्गत ऑनलाईन सराव अध्यापन व छात्रसेवाकाल शिबीर यशस्वीरीत्या संपन्न झाले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शाळा व महाविद्यालये बंद आहेत मात्र ऑनलाईन शिक्षण प्रक्रिया अविरतपणे सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून बी. एड. प्रशिक्षणार्थींचे सराव पाठ अध्यापन प्रात्यक्षिक ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी छात्रसेवाकाल शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी सराव अध्यापन व छात्रसेवा काल संकल्पना व कार्यप्रणालीचा सविस्तर आढावा घेतला. विद्यापीठाच्या निर्देशानुसार या प्रात्यक्षिक अंतर्गत ऑनलाईन पध्दतीने सराव पाठ आयोजन व कार्यवाही अभिरूप पद्धतीने करण्यात आली. या प्रात्यक्षिक अंतर्गत बी. एड. प्रशिक्षणार्थींचे एकूण सहा गट करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने आशययुक्त अध्यापन व आय. सी. टी. आधारित अध्यापन असे अध्यापन पद्धती निहाय एकूण ०८ सराव पाठ प्रत्येक प्रशिक्षणार्थींनी ऑनलाईन पद्धतीने सादर केले. यात पीपीटी, व्हिडिओ व ऑडिओ क्लिप, इमेजेस, आदीद्वारे सराव पाठ घेतले.

ऑनलाईन आंतरक्रिया प्रभावीरित्या करून प्रशिक्षणार्थींनी नाविन्यपूर्ण सराव पाठ घेण्याचा प्रयत्न केला. यामुळे बी. एड. प्रशिक्षणार्थींना तंत्रज्ञान आधारीत सराव पाठ घेण्याचे कौशल्य विकसित करता आले. बी. एड. प्रशिक्षणार्थींनी शालेय आशय यावर आधारित दृकश्राव्य साधनांद्वारे ऑनलाईन अध्यापन केले.

या छात्रसेवा काल शिबिरामध्ये बी. एड. प्रशिक्षणार्थींनी सराव पाठ टाचण, आशय सराव अध्यापन, पाठ निरीक्षण, ई-शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर अशी विविध प्रकारची प्रात्यक्षिके पूर्ण केली. तसेच ऑनलाईन पद्धतीने छात्रसेवाकाल प्रात्यक्षिक बाबत बी. एड. प्रशिक्षणार्थींचे प्रत्याभरण व यशस्विता याबाबत माहिती घेतली. सदर छात्रसेवा काल उपक्रमात प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, समन्वयक डॉ. एम. व्ही. मते व डॉ. पी. ए. पाटील, डॉ. एस. डी. भिलेगावकर, डॉ व्ही. पी. शिखरे, डॉ. एम. एस. डिसले व डॉ. आर. ए. फुरडे तसेच बी. एड. प्रशिक्षणार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2020 - 2021

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ऑनलाईन सराव अध्यापन

**बार्शी :** बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात १ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबर २०२० याकालावधीत बी.एड्. द्वितीय वर्ष सत्र तिसरे यांतर्गत ऑनलाईन सराव अध्यापन व छात्रसेवाकाल शिबिर यशस्वीरीत्या झाले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शाळा व महाविद्यालये बंद आहेत. मात्र, ऑनलाईन शिक्षण प्रक्रिया अविरतपणे सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून बी.एड्. प्रशिक्षणार्थींचे सराव पाठ अध्यापन प्रात्यक्षिक ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले. प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांनी छात्रसेवाकाल शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी 'सराव अध्यापन व छात्रसेवाकाल संकल्पना व कार्यप्रणाली' याचा सविस्तर आढावा घेतला. विद्यापीठाच्या निर्देशानुसार या प्रात्यक्षिकांतर्गत ऑनलाईन पद्धतीने सराव पाठ आयोजन व कार्यवाही अभिरूप पद्धतीने करण्यात आली. या प्रात्यक्षिकांतर्गत बी.एड. प्रशिक्षणार्थींचे एकूण सहा गट करण्यात आले. प्रत्येक गटास एक मार्गदर्शक प्राध्यापक नियुक्त करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने आशययुक्त अध्यापन व आयसीटी आधारित अध्यापन असे अध्यापन पद्धतीनिहाय एकूण ८ सराव पाठ प्रत्येक प्रशिक्षणार्थींनी ऑनलाईन पद्धतीने सादर केले. यात पीपीटी, व्हिडीओ व ऑडिओ क्लिप, इमेजेस, आदींद्वारे सराव पाठ घेतले. ऑनलाईन आंतरक्रिया प्रभावीरित्या करून प्रशिक्षणार्थींनी नावीन्यपूर्ण सराव पाठ घेण्याचा प्रयत्न केला. यामुळे बी.एड्. प्रशिक्षणार्थींना तंत्रज्ञानावर आधारित सराव पाठ घेण्याचे कौशल्य विकसित करता आले. या छात्रसेवाकाल शिबिरामध्ये बी.एड्. प्रशिक्षणार्थींनी सराव पाठ टाचण अशी विविध प्रकारची प्रात्यक्षिके पूर्ण केली. ऑनलाईन पद्धतीने छात्रसेवाकाल प्रात्यक्षिकबाबत बी.एड. प्रशिक्षणार्थींचे प्रत्याभरण याबाबत माहिती घेतली. या उपक्रमात प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, डॉ. एम. व्ही. मते व डॉ. पी. ए. पाटील, डॉ. एस डी. भिलेगावकर, डॉ. व्ही.पी. शिरवे तसेच बी.एड. प्रशिक्षणार्थी यांनी परिश्रम घेतले.

Solapur Edition
Nov 10, 2020 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

College of Education, Dist. Solapur, Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

पुढारी

# पर्यावरणाची जोपासना दैनंदिन कृतीतून करावी : डोईफोडे

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

घरात ओला कचरा सुका, कचरा तसेच अनावश्यक वस्तू यापासून पुनर्वापर करण्याचे तत्त्व सांगत स्वतः दैनंदिन कृतीतून पर्यावरण जोपासना करण्याचे महत्त्व रोटरी क्लब बार्शीचे अध्यक्ष मधुकर डोईफोडे यांनी सांगितले.

ते शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे १९ नोव्हेंबरपासून कौमी एकता सप्ताह साजरा होत आहे. यानिमित्त प्रशिक्षणार्थींना ऑनलाईन मार्गदर्शन करताना ते बोलत होते. प्रारंभी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे यांनी उद्घाटन केले.

मधुकर डोईफोडे म्हणाले, सामाजिक स्तरावर कार्य करूनही प्रत्येकाला पर्यावरण जोपासना करता येते, हे त्यांनी स्वतः केलेल्या सामाजिक सेवा कृतीतून सांगितले. तीव्र आंतरिक इच्छा काम करण्याची आत्मियता आधी केले मग सांगितले. अशा काही महत्त्वाच्या नोंदी विद्यार्थ्यांनी लक्षात घेण्याचेही सूचवले. स्वतः शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे विद्यार्थी असल्याने व्यक्तिमत्व विकास घडविणारे महाविद्यालय असे कौतुकही केले. समाजसेवेमुळे व्यक्तिमत्व विकास होतो. अन्नदान, रक्तदान व धनदान याबरोबर श्रमदानाला महत्त्व द्यावे, असे सांगत अनेक पौराणिक अर्वाचीन दाखले देत तंत्रज्ञान युगात आपण नवीन माहिती मिळवून कार्यरत रहावे, असाही संदेश दिला. डॉ. मामासाहेब जगदाळे यांची त्याकाळी संस्था उभारणे ही एक समाजसेवा केवळ अलौकिक नसून समाजसेवा करताना अनंत अडचणी येतात. मामाचे कार्य आदर्श असून ते अंगीकारून आदर्श शिक्षक व्हा, पर्यावरण जोपासा, असे स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन आंतरक्रिया करून शंका विचारल्या. कार्यक्रमाचा समारोप समन्वयक डॉ. भिलेगावकर यांनी आभार प्रदर्शनाने केला. बी.एड. प्रशिक्षणार्थी झाडे, जाधव , नरखेडे, अपेक्षा चव्हाण, वर्षा मेंडगुळे यांनी अनुक्रमे पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, पंजाब व गुजरात राज्यातील सांस्कृतिक ओळख करून दिली. या सांस्कृतिक विविधतेतून एकता कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रणिता गायकवाड यांनी केले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी मनोगतात एकतेसाठी सांस्कृतिक बाबी महत्त्वाच्या आहेत, असे स्पष्ट केले. तसेच कार्यक्रमाच्या शेवटी आभार डॉ. भिलेगावकर यांनी मानले.

My Solapur Edition
Nov 28, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

रयतेचा वाली
डिजिटल शैक्षणिक दैनिक
बाल रक्षक
संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ )   वर्ष दुसरे - अंक ०९२   मंगळवार दिनांक १५/१२/२०२० पान ०६

## श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मानवी हक्क दिन साजरा

सोलापूर : दि.१४ (रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे दिनांक १० डिसेंबर २०२० रोजी सकाळी ठीक ९.०० वाजता आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन कार्यक्रमाचे आयोजन ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस एस गोरे हे उपस्थित होते. बी एड द्वितीय वर्ष सत्र तिसरे अंतर्गत सराव अध्यापन व छात्रसेवाकाल शिबीर सध्या ऑनलाईन पध्दतीने सुरू आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालये बंद आहेत मात्र ऑनलाईन शिक्षण प्रक्रिया अविरतपणे सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून बी एड प्रशिक्षणार्थींचे सराव पाठ अध्यापन प्रात्यक्षिक ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत आहेत. यातील एका प्रात्यक्षिकास अनुसरून विशेष दिनाचे आयोजन म्हणून आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सोमनाथ पाटील यांनी परिपाठ सादर केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ एम व्ही मते यांनी केले. वर्षा परकाळे यांनी मानवी हक्क दिनाचे औचित्य साधून पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशन द्वारे मानवी हक्क यांवर सविस्तर माहिती सादर केली. यामध्ये त्यांनी मानवी हक्क संदर्भात पार्श्वभूमी, संकल्पना, हेतू, मूलभूत हक्क, स्वरूप आदी घटकांवर सादरीकरण केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ एस एस गोरे यांनी या ऑनलाईन कार्यक्रमाचे कौतुक केले. तसेच मानवी हक्क दिन यांवर सविस्तर माहिती विशद केली. समाजातील प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधीत राहिले पाहिजे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जीवन जगता यावे या उद्देशाने हा दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो. मानवी हक्क हे सर्व मनुष्याला प्राप्त झालेले मूलभूत अधिकार आहेत. यामध्ये कोणत्याही परिस्थितीत भेदभाव केला जात नाही. मानवी हक्क हे जागतिक स्वरूपाचे असून ते सर्वांना समान आहेत. जीवनाधिकार, यातनापासून मुक्ती, भाषण स्वातंत्र्य, वैचारिक व धार्मिक स्वातंत्र्य आदी घटकांबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनात सर्वांनी मानवी हक्कांची जोपासना करावी असे त्यांनी आवाहन केले.

सोमनाथ पाटील यांनी ऑनलाईन उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त केले. अश्विनी पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सदर कार्यक्रमास प्राचार्य डॉ एस एस गोरे, समन्वयक डॉ एम व्ही मते, डॉ एस डी भिलेगावकर, डॉ व्ही पी शिखरे, डॉ एम एस डिसले, डॉ आर ए फुरडे, डॉ पी ए पाटील तसेच बी एड प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

पुढारी

# बार्शीत मानवी हक्कदिन साजरा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय मानवी हक्कदिन कार्यक्रमाचे आयोजन ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे हे उपस्थित होते.

बी.एड्. द्वितीय वर्ष सत्र तिसरे अंतर्गत सराव अध्यापन व छात्र सेवाकाल शिबिर सध्या ऑनलाईन पद्धतीने सुरू आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालये बंद आहेत. मात्र, ऑनलाईन शिक्षण प्रक्रिया अविरतपणे सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून बी.एड्. प्रशिक्षणार्थींचे सराव पाठ, अध्यापन, प्रात्यक्षिक ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत आहेत. यातील एका प्रात्यक्षिकास अनुसरून विशेष दिनाचे आयोजन म्हणून आंतरराष्ट्रीय मानवी हक्कदिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सोमनाथ पाटील यांनी परिपाठ सादर केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. एम.व्ही. मते यांनी केले. वर्षा परकाळे यांनी मानवी हक्कदिनाचे औचित्य साधून पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे 'मानवी हक्क' यावर सविस्तर माहिती सादर केली. सोमनाथ पाटील यांनी ऑनलाईन उपस्थितांचे आभार व्यक्त केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

Solapur Edition
Dec 19, 2020 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

पुढारी

News by
गणेश गोडसे, बार्शी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ऑनलाईन सराव अध्यापन

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे ७ ते १५ डिसेंबर दरम्यान बी.एड. द्वितीय वर्ष व सत्र तिसरे ऑनलाईन सराव अध्यापन व छात्रसेवाकाल शिबिर यशस्वीरीत्या झाले.

कोरोनामुळे महाविद्यालये बंद आहेत. मात्र ऑनलाईन शिक्षण प्रक्रिया सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून बी. एड. प्रशिक्षणार्थींचे सराव पाठ अध्यापन प्रात्यक्षिक ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी छात्रसेवाकाल शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी सराव अध्यापन व छात्रसेवाकाल संकल्पना व कार्यप्रणालीचा सविस्तर आढावा घेतला. विद्यापीठाच्या निर्देशानुसार या प्रात्यक्षिक अंतर्गत ऑनलाईन पध्दतीने सराव पाठ आयोजन व कार्यवाही अभिरूप पद्धतीने करण्यात आली.

या प्रात्यक्षिक अंतर्गत बी.एड. प्रशिक्षणार्थींचे एकूण सहा गट करण्यात आले. प्रत्येक गटास एक मार्गदर्शक प्राध्यापक नियुक्त करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने ८ सलग सराव पाठ अध्यापन पद्धतीनिहाय प्रत्येक प्रशिक्षणार्थींनी ऑनलाईन पद्धतीने सादर केले. प्रत्येक गटास एक मार्गदर्शक प्राध्यापक नियुक्त करण्यात आले. यात पीपीटी, व्हिडिओ व ऑडिओ क्लिप, इमेजेस आदीद्वारे सलग सराव पाठ घेतले. त्याचबरोबर विविध प्रात्यक्षिके देखील पूर्ण करण्यात आली. यात प्रामुख्याने भाषिक कौशल्ये विकसन, आयसीटी पाठ, मानसशास्त्रीय कसोटी, विद्यार्थी व्यक्ती अभ्यास, मूल्यमापन साधने, शैक्षणिक साधने, अवांतर माहिती व कौशल्ये विकसन आदी प्रात्यक्षिके प्रशिक्षणार्थींनी पूर्ण केली आहेत. ऑनलाईन आंतरक्रिया प्रभावीरित्या करून प्रशिक्षणार्थींनी नाविन्यपूर्ण सराव पाठ घेण्याचा प्रयत्न केला. या उपक्रमात प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, डॉ. एम.व्ही. मते, डॉ. पी.ए. पाटील, डॉ. एस.डी. भिलेगावकर, डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एम.एस. डिसले, डॉ. आर.ए. फुरडे व प्रशिक्षणार्थी यांनी परिश्रम घेतले.

Solapur Edition
Dec 19, 2020 Page No. 10
newspaper.pudhari.co.in

College of Education, Dist. Solapur, Barshi.

रयतेचा वाली

डिजिटल शैक्षणिक दैनिक

डिजिटल शैक्षणिक

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ )    वर्ष दुसरे - अंक ०९७    रविवार दिनांक ०२/१२/२०२० पान ०९


## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ऑनलाईन सराव अध्यापन व छात्रसेवाकाल संपन्न

सोलापूर: दि. १९.( रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे ०७ डिसेंबर ते १५ डिसेंबर २०२० या कालावधीत बी. एड. द्वितीय वर्ष सत्र तिसरे अंतर्गत ऑनलाईन सराव अध्यापन व छात्रसेवाकाल शिबीर यशस्वीरीत्या संपन्न झाले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालये बंद आहेत मात्र ऑनलाईन शिक्षण प्रक्रिया अविरतपणे सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून बी. एड. प्रशिक्षणार्थींचे सराव पाठ अध्यापन प्रात्यक्षिक ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी छात्रसेवाकाल शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी सराव अध्यापन व छात्रसेवाकाल संकल्पना व कार्यप्रणालीचा सविस्तर आढावा घेतला.

विद्यापीठाच्या निर्देशानुसार या प्रात्यक्षिक अंतर्गत ऑनलाईन पध्दतीने सराव पाठ आयोजन व कार्यवाही अभिरूप पद्धतीने करण्यात आली. या प्रात्यक्षिक अंतर्गत बी. एड. प्रशिक्षणार्थींचे एकूण सहा गट करण्यात आले. प्रत्येक गटास एक मार्गदर्शक प्राध्यापक नियुक्त करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने एकूण ०८ सलग सराव पाठ अध्यापन पद्धतीनिहाय प्रत्येक प्रशिक्षणार्थींनी ऑनलाईन पद्धतीने सादर केले. यात पी.पी.टी., व्हिडिओ व ऑडिओ क्लिप, इमेजेस, आदीद्वारे सलग सराव पाठ घेतले. त्याचबरोबर विविध प्रात्यक्षिके देखील पूर्ण करण्यात आली. यात प्रामुख्याने भाषिक कौशल्ये विकसन, आय. सी. टी. पाठ, मानसशास्त्रीय कसोटी, अभ्यासनुवर्ती उपक्रम, दैनंदिन परिपाठ, विद्यार्थी व्यक्ती अभ्यास, मूल्यमापन साधने, शैक्षणिक साधने, अवांतर माहिती व कौशल्ये विकसन आदि प्रात्यक्षिके प्रशिक्षणार्थींनी पूर्ण केली. ऑनलाईन आंतरक्रिया प्रभावीरित्या करून प्रशिक्षणार्थींनी नाविन्यपूर्ण सराव पाठ घेण्याचा प्रयत्न केला. यामुळे बी. एड. प्रशिक्षणार्थींना तंत्रज्ञान आधारीत सराव पाठ घेण्याचे कौशल्य विकसित करता आले. बी. एड. प्रशिक्षणार्थींनी शालेय आशय यावर आधारित दृक श्राव्य साधनांद्वारे ऑनलाईन अध्यापन व प्रात्यक्षिक पूर्ण केले.

या छात्रसेवाकाल शिबिरामध्ये बी. एड. प्रशिक्षणार्थींनी सराव पाठ टाचण, आशय सराव अध्यापन, पाठ निरीक्षण, ई-शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर अशी विविध प्रकारची प्रात्यक्षिके पूर्ण केली. तसेच ऑनलाईन पद्धतीने छात्रसेवाकाल प्रात्यक्षिक बाबत बी. एड. प्रशिक्षणार्थींचे प्रत्याभरण व यशस्वीता याबाबत माहिती घेतली. सदर छात्रसेवाकाल उपक्रमात प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, समन्वयक डॉ. एम. व्ही. मते व डॉ. पी. ए. पाटील, डॉ. एस. डी. भिलेगावकर, डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एम. एस. डिसले व डॉ. आर. ए. फुरडे तसेच बी. एड. प्रशिक्षणार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

College of Education Dist. Solapur Barshi.


## Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2020 - 2021


डिजिटल शैक्षणिक दैनिक

# रयतेचा वाली



संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ )    वर्ष दुसरे - अंक १०१    गुरुवार दिनांक २४/१२/२०२० पान ०३

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिन साजरा



सोलापूर : दि. २३ ( रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) दिनांक २२ डिसेंबर रोजी थोर व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय गणित दिन ऑनलाईन साजरा केला. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून गौरव भंडारी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे व रोटरी क्लब बार्शीचे अध्यक्ष मधुकर डोईफोडेयांची प्र मुख उपस्थिती होती. बी. एड. विभाग प्रमुख डॉ. भिलेगावकर यांनी गौरव भंडारी यांचा परिचय व उपस्थितांचे स्वागत केले.गौरव भंडारी यांनी बी. एड. प्रशिक्षणार्थींशी संवाद साधत गणितातील ट्रिकस सोप्या उदाहरणातून स्पष्ट केल्या. गणिताचे महत्व सांगत गणित सोपे कसे हे सांगताना पुस्तकातील ट्रिकस पेक्षा सोप्या व सुटसुटीत संकल्पना मांडल्या. वर्षातील दिवस, जन्म दिनांक, वार यावर आधारित उदाहरणे स्पष्ट केली. कमी वेळात अचूक गणित सोडवण्यासाठी सरांच्या ट्रिकस सोप्या आहेत असा प्रतिसाद प्रशिक्षणार्थींना दिला. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांशी चर्चा करुन व उपस्थितांचे आभार व्यक्त करुन झाली. कार्यक्रमास बी. एड. प्रशिक्षणार्थी, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, डॉ भिलेगावकर, रो. डोईफोडे तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

डिजिटल शैक्षणिक दैनिक

# रयतेचा वाली

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक १५१ बुधवार दिनांक १७/०२/२०२१ पान ०३

## डॉ. व्ही. पी. शिखरे यांना 'उत्कृष्ठ शिक्षक' पुरस्कार जाहीर

**सोलापूर: दि.१६ ( रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथील प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या वतीने देण्यात येणारा सन २०२० चा उत्कृष्ठ शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. दिनांक २२ फेब्रुवारी २०२१ रोजी हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. शिक्षण, संशोधन व प्रशासन क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण व उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल प्रा.डॉ. व्ही. पी. शिखरे यांना हा पुरस्कार दिला जाणार आहे.**

विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यासचे अधिष्ठाता तसेच विद्यापरिषद सदस्य म्हणून देखील प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे कार्यरत आहेत. कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे यांच्या विचारांने प्रेरित होऊन शिक्षण व संशोधन क्षेत्रांत डॉ शिखरे यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या वतीने दरवर्षी संशोधन, विस्तार कार्य, संशोधन मार्गदर्शन,संशोधन प्रकल्प, ग्रंथ-लेखन, अध्यापनातील नाविन्यपूर्ण उपक्रम, पेटंट, तज्ञ व्याख्याने, अभ्यासक्रम निर्मितीतील सहभाग, अभ्यासेतर व अभ्यासपूरक उपक्रमातील सहभाग, तसेच सामाजिक, राष्ट्रीय व इतर विधायक कार्यातील सहभाग आदी क्षेत्रांमध्ये विशेष उल्लेखनीय योगदान



देणाऱ्या व्यक्तीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ उत्कृष्ठ शिक्षक पुरस्कार दिला जातो. सन २०२० चा हा सन्मान बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे यांना विद्यापीठाच्या वतीने सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

अध्ययन, अध्यापन, प्रशासन, संशोधन, आदी क्षेत्रात डॉ शिखरे यांचे उल्लेखनीय योगदान आहे. राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ, अनेक संस्था व संघटना पातळीवर देखील डॉ शिखरे यांनी आपल्या शैक्षणिक कार्याचा ठसा उमटवला आहे. विविध संदर्भ ग्रंथ लेखन, संशोधन मार्गदर्शक, संशोधन प्रकल्प, संशोधन मूल्यमापन, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय सेमिनार व परिषद सहभाग, संशोधन लेख प्रकाशने, साधन व्यक्ती म्हणून तज्ज्ञ व्याख्याने, विस्तार सेवा कार्य, विद्यापीठ समिती कार्य, अधिष्ठाता, विद्यार्थी प्रिय शिक्षक आदी माध्यमातून डॉ. शिखरे यांचे कार्य प्रेरणादायी आहे. विविध संस्था व संघटनांनी डॉ. शिखरे यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष श्री. नंदकुमार जगदाळे, जनरल सेक्रेटरी श्री. विष्णू पाटील, सहसचिव श्री. प्रकाश पाटील, खजिनदार प्रा. दिलिप रेवडकर, सांस्कृतिक प्रमुख श्री. जयकुमार शितोळे, कार्यकारिणी सदस्य, विश्वस्त, प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे, सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी यांनी डॉ. शिखरे यांचे अभिनंदन केले आहे.

College of Education Barshi. Dist. Solapur

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2020 - 2021

डिजिटल शैक्षणिक दैनिक

# रयतेचा वाली

चळवळ माणुसकीची

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक १५२ गुरुवार दिनांक १८/०२/२०२१ पान ११

## शिक्षणशास्त्राचे 'परिवर्तन' नियतकालिक विद्यापीठात द्वितीय

सोलापूर: दि. १७ ( रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शीच्या परिवर्तन नियतकालिकास सन २०१९-२० चा व्यावसायिक महाविद्यालयातून विद्यापीठ स्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे.

विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव मिळावा, सर्जनशील लेखनास व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या हेतूने विद्यापीठाच्या वतीने नियतकालिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या परिवर्तन नियातकालिकास द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. विविध विषयांवर आधारित




सर्जनशील लेख, वैचारिक लेखन, कविता, नाविन्यपूर्ण उपक्रम, अहवाल आदि घटकांची प्रभावीपणे मांडणी करण्यात आली आहे. व्यावसायिक महाविद्यालय गटातून बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने हे यश पटकाविले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष श्री. नंदकुमार जगदाळे, जनरल सेक्रेटरी श्री. विष्णू पाटील, सहसचिव श्री. प्रकाश पाटील, खजिनदार प्रा. दिलिप रेवडकर, सांस्कृतिक प्रमुख श्री. जयकुमार शितोळे, कार्यकारिणी सदस्य, विश्वस्त यांनी परिवर्तन नियतकालिकाचे मुख्य संपादक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, संपादक डॉ. पी. ए. पाटील व संपादक मंडळ, शिक्षक व विद्यार्थी यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

डिजिटल शैक्षणिक दैनिक

# रयतेचा वाली

चळवळ माणुसकीची

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक १५५ रविवार दिनांक २१/०२/२०२१ पान ०३

## अश्विनी भोसले यांना बी. एड. परीक्षेत सुवर्ण पदक



सोलापूर : दि.२०( रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री.. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शीच्या अश्विनी अरुणराव भोसले यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने मार्च/ एप्रिल २०२० मध्ये घेतलेल्या बी. एड. परीक्षांमध्ये प्रथम क्रमांक संपादन केला आहे. बी. एड. परीक्षांमध्ये गुणानुक्रमे पहिल्या पाच मध्ये शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या तीन प्रशिक्षणार्थींनी यश संपादन केले आहे. या उज्जवल यशाची परंपरा महाविद्यालयाने कायम राखली आहे. समृध्द मानवी व भौतिक सुविधासह उत्कृष्ठ शिक्षक शिक्षण देणारे हे ग्रामीण भागातील एक लोकप्रिय महाविद्यालय आहे.

अश्विनी भोसले यांनी बी. एड. परीक्षेत ९.४५सी.जी.पी.ए. प्राप्त केला आहे. याबद्दल सोलापूर विद्यापीठ संलग्नित सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून बी. एड. पदवीमध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्व प्रथम येणाऱ्यास विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारे वै. रामचंद्र बाळकृष्ण बोधे अर्थात भाऊसाहेब बोधे सुवर्णपदक बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या अश्विनी अरुणराव भोसले यांना प्राप्त झाले आहे. तसेच शितल विठ्ठल लोंढे (९.१८ सी.जी.पी.ए.) आणि मधुरा लक्ष्मण गुंड (९.०९ सी.जी.पी.ए.) यांनी गुणानुक्रमे तिसरा व पाचवा क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष श्री. नंदकुमार जगदाळे, जनरल सेक्रेटरी श्री. विष्णू पाटील, सहसचिव श्री. प्रकाश पाटील, खजिनदार प्रा. दिलिप रेवडकर, सांस्कृतिक प्रमुख श्री. जयकुमार शितोळे, कार्यकारिणी सदस्य, विश्वस्त, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, शिक्षक,पालक व विद्यार्थी यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

पुढारी

# बी.एड. परीक्षेत भोसलेंना सुवर्णपदक

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने मार्च/एप्रिल २०२० मध्ये घेतलेल्या बी.एड. परीक्षांमध्ये शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शीच्या अश्विनी अरुण भोसले यांनी प्रथम क्रमांक मिळविला.



अश्विनी भोसले शितल लोंढे मधुरा गुंड

बी.एड. परीक्षेत पहिल्या पाचमध्ये शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या तिघींनी यश संपादन केले आहे. अश्विनी भोसले यांनी बी.एड. परीक्षेत ९.४५ सीजीपी प्राप्त केला. सोलापूर विद्यापीठ संलग्नित सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून बी.एड. पदवीमध्ये विद्यापीठात प्रथम येणाऱ्यास विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारे वै. रामचंद्र बाळकृष्ण बोधे अर्थात भाऊसाहेब बोधे सुवर्णपदक मिळाले. तसेच शीतल विठ्ठल लोंढे (९.१८ सीजीपी) आणि मधुरा लक्ष्मण गुंड (९.०९ सीजीपी) यांनी गुणानुक्रमे तिसरा व पाचवा क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, विष्णू पाटील, प्रकाश पाटील, दिलीप रेवडकर, जयकुमार शितोळे, महाविद्यालयाचे प्रा.डॉ. एस.एस. गोरे, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

Solapur Edition
Feb 22, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

डिजिटल शैक्षणिक दैनिक

# रयतेचा वाली

आता बदल दिसतोय महाराष्ट्र घडतोय

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक १६१ शनिवार दिनांक २७/०२/२०२१ पान १०

## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात

## राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक संपन्न

सोलापूर : दि.२६ ( रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा ) शुक्रवार दिनांक २६ फेब्रुवारी रोजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे महाविद्यालय स्तरीय राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग संचालक डॉ. गुणवंत सरवदे हे उपस्थित होते, तसेच राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय समन्वक डॉ. रवींद्र चाटी हे ही उपस्थित होते. ही बैठक महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

सदर बैठकीत महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एस. डिसले यांनी उपस्थितांचे स्वागत करून जून २०२० ते ३१ जानेवारी २०२१ पर्यंत राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून राबवीण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाचा तपशील सादर केला. महाविद्यायातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग अद्ययावत करण्याबाबत चर्चा करण्यात आली, तसेच भविष्यात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या समाजाभिमुख, ग्रामीण विकास, स्वयंपूर्ण खेडी, जलसाक्षरता इत्यादी उपक्रमाबाबत चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. गुणवंत सरवदे यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी विविध समाजोयोगी उपक्रम आणि अभियाने यशस्वीपणे राबविण्यासाठी कृती आराखडा सादर केला. ही बैठक अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. बैठकीची सांगता व उपस्थितांचे आभार व्यक्त करून झाली. बैठकीस सर्व समिती सदस्य उपस्थित होते.



College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**


रयतेचा वाली

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक






संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ )    वर्ष दुसरे - अंक १६३    सोमवार दिनांक ०१/०३/२०२१ पान ०४


## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

सोलापूर : दि. २८ ( रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा ) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचालित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे रविवार दिनांक २८/०२/२०२१ रोजी सकाळी ठीक ०९.०० वाजता महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, व अग्नि कुल यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील आंतर विद्याशाखीय अभ्यासचे प्रभारी अधिष्ठाता तथा महाविद्यालयातील प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एम. व्ही. मते यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ध्वनिमुद्रित विज्ञान गीत सर्वांनी श्रवण केले. बी. एड. प्रशिक्षणार्थी योगिता झाडे यांनी पॉवर पॉईंट द्वारे राष्ट्रीय विज्ञान दिन याविषयी माहिती प्रभावीपणे सादर केली. कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी उत्तम प्रकारे विवेचन केले.



त्यांच्या व्याख्यानाचा मुख्य विषय २१ व्या शतकातील वैज्ञानिक जीवन असा होता. त्यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन संदर्भात संकल्पना व पार्श्वभूमी आदि घटकांची सविस्तर माहिती दिली. आज प्रत्येकजण भौतिक सुखाच्या मागे लागला आहे. विज्ञानाचा भौतिक जीवनाशी संबंध जोडला जात आहे. भौतिक समृद्धीबरोबर निसर्गाचे संरक्षण व संवर्धन गरजेचे आहे. विवेकी विचार जीवनप्रणाली आत्मसात करणे आवश्यक आहे. विवेक व विज्ञान यातून अध्यात्मवाद जोपासला पाहिजे. विज्ञानाने मानवी जीवनात क्रांतिकारी बदल होत आहेत. आयुर्वेदासंबंधी सकारात्मक दृष्टिकोन विकसित होत आहे. कोरोनाच्या महामारीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासला गेला आहे. विज्ञानाचे सामर्थ्य ओळखले जात आहे. राष्ट्रीय संपत्ती म्हणजे मानवी ऊर्जेचा स्रोत निर्माण करणे होय. स्वच्छता, वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा, चिकित्सक वृत्ती, लैंगिक समानता, अंधश्रद्धा निर्मूलन, मूल्याधिष्ठित वर्तन आदि बाबत जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे.

विवेकी व सृजनशील माणूस घडविण्यात विज्ञानाचे मोठे योगदान आहे. वैज्ञानिक दृष्टीकोन प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देतो. राष्ट्राचे भविष्य हे त्या राष्ट्रातील बालकांवर अवलंबून आहे. म्हणूनच उदयोन्मुख शिक्षकांनी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन विषयी माहिती विशद केली.

राष्ट्राच्या विकसनात वैज्ञानिकांचे योगदान उल्लेखनीय आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन संवर्धित व जतन करण्यासाठी सर्वांचे योगदान महत्वपूर्ण आहे. मानवी मूल्ये व विज्ञान यांचा संबंध महत्वपूर्ण आहे. कोरोना महामारीत सर्वांनीच शारीरिक व मानसिक सामर्थ्य विकसन केले पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमासाठी उपस्थितांचे आभार अपेक्षा पवार यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षाराणी मेंडगुळे यांनी केले. कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख, शिक्षक, ऑनलाईन सहभागी बी. एड., बी. पी. एड., एम. एड., एम. पी. एड. प्रशिक्षणार्थी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

## बार्शीत मराठी भाषा गौरवदिन उत्साहात साजरा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, विशाखा वाङ्मय मंडळ व पृथ्वी कुल यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरवदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बालसाहित्यिक फारूक काझी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे हे होते.



**बार्शी : मराठी भाषा गौरवदिनानिमित्त परिसरात वृक्षारोपण करताना मान्यवर.**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. परमेश्वर पाटील यांनी केले. डॉ. महादेव डिसले यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ध्वनीमुद्रित मराठी भाषा गौरव गीत सर्वांनी श्रवण केले. प्रमुख पाहुणे बालसाहित्यिक फारूक काझी यांनी उत्तमप्रकारे बालसाहित्यसंदर्भात विवेचन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे यांनी मराठी भाषा गौरवदिनाविषयी माहिती विशद केली. राष्ट्राच्या विकासात साहित्यिकांचे योगदान उल्लेखनीय आहे. मराठी भाषा प्रचार, प्रसार व जतन करण्यासाठी सर्वांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. मराठी साहित्यातून विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक सामर्थ्य विकसन केले पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादन केले. आभार डॉ. महादेव मते यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन कार्यक्रम समन्वयक डॉ. महादेव डिसले यांनी केले. रेणुका सूर्यवंशी यांनी कार्यक्रमावर आधारित पॉवर पॉईंट सादरीकरण केले.

Solapur Edition
Mar 2, 2021 Page No. 11
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

# रयतेचा वाली

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक




संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक १६५ बुधवार दिनांक ०३/०३/२०२१ पान ०७

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

सोलापूर : दि.०२ ( रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचालित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे शनिवार दिनांक २७/०२/२०२१ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, विशाखा वाङ्मय मंडळ व पृथ्वी कुल यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी बालसाहित्यिक मा. श्री. फारूक काझी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. परमेश्वर पाटील यांनी केले. डॉ. महादेव डिसले यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ध्वनिमुद्रित मराठी भाषा गौरव गीत सर्वांनी श्रवण केले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध बालसाहित्यिक मा. फारूक काझी यांनी उत्तम प्रकारे बालसाहित्य संदर्भात विवेचन केले. त्यांच्या व्याख्यानाचा मुख्य विषय बालसाहित्य आकलन आणि परिचय असा होता. त्यांनी बालसाहित्य संदर्भात संकल्पना, पार्श्वभूमी, संदर्भ साहित्य, प्रकार आदि घटकांची सविस्तर माहिती दिली. बालसाहित्याचे बाल, किशोर व कुमार असे स्तर विशद केले. मूल समजून घेण्याचा आरसा म्हणजे बालसाहित्य होय. बालसाहित्य हे बालकांचे विश्व अधिक समृद्ध करते. बालकांच्या व्यक्तिमत्वाला आकार देते. सुसंस्कृत व सृजनशील वाचक घडविण्यात बालसाहित्याचे मोठे योगदान आहे. बालसाहित्य प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देते. राष्ट्राचे भविष्य हे त्या राष्ट्रातील बालकांवर अवलंबून आहे. म्हणूनच बालसाहित्य आकलन व परीचय करून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे यांनी मराठी भाषा गौरव दिन विषयी माहिती विशद केली. राष्ट्राच्या विकसनात साहित्यिकांचे योगदान उल्लेखनीय आहे. मराठी भाषा प्रचार, प्रसार व जतन करण्यासाठी सर्वांचे योगदान महत्वपूर्ण आहे. मराठी साहित्यातून विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक सामर्थ्य विकसन केले पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमासाठी उपस्थितांचे आभार डॉ. महादेव मते यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम समन्वयक डॉ. महादेव डिसले यांनी केले. रेणुका सुर्यवंशी यांनी कार्यक्रमावर आधारित पॉवर पॉईंट सादरीकरण केले. कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख, शिक्षक, ऑनलाईन सहभागी बी. एड., बी. पी. एड., एम. एड., एम. पी. एड. प्रशिक्षणार्थी , शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

पुढारी

News by
गणेश गोडसे, बार्शी



**बार्शी : योजना सल्लागार समितीच्या बैठकीत उपस्थितांचे स्वागत करताना डॉ. डिसले व इतर.**

## राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक

**बार्शी :** शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे महाविद्यालयस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक झाली. या बैठकीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग संचालक डॉ. गुणवंत सरवदे, समन्वक डॉ. रवींद्र चाटी उपस्थित होते. ही बैठक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. डिसले यांनी उपस्थितांचे स्वागत करून जून २०२० ते ३१जानेवारी २०२१ पर्यंत राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा तपशील सादर केला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग अद्ययावत करण्याबाबत चर्चा करण्यात आली. भविष्यात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या समाजाभिमुख, ग्रामीण विकास, स्वयंपूर्ण खेडी, जलसाक्षरता इत्यादी उपक्रमाबाबत चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. गुणवंत सरवदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी विविध समाजोपयोगी उपक्रम आणि अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी कृती आराखडा सादर केला.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

**जनमत**

सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगांव



## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक संपन्न

गणेश घोलप

बार्शी,दि. २ (प्रतिनिधी) २६ फेब्रुवारी रोजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे महाविद्यालय स्तरीय राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग संचालक डॉ. गुणवंत सरवदे हे उपस्थित होते, तसेच राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय समन्वक डॉ रवींद्र चाटी हेही उपस्थित होते. ही बैठक महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ एस एस गोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली . सदर बैठकीत महाव्यिालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एस. डिसले यांनी उपस्थितांचे स्वागत करून जून २०२० ते ३१जानेवारी २०२१ पर्यंत राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून राबवीण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाचा तपशील सादर केला. महाविद्यायातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग अद्ययावत करण्याबाबत चर्चा करण्यात आली, तसेच भविष्यात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या समाजाभिमुख, ग्रामीण विकास, स्वयंपूर्ण खेडी, जलसाक्षरता इत्यादी उपक्रमाबाबत चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. गुणवंत सरवदे यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी विविध समाजोयोगी उपक्रम आणि अभियाने यशस्वीपणे राबविण्यासाठी कृतीआराखडा सादर केला. ही बैठक अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. बैठकीची सांगता व उपस्थितांचे आभार व्यक्त करून झाली . बैठकीस सर्व समिती सदस्य उपस्थित होते.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

जनमत

सोलापूर. उस्मानाबाद. कोल्हापूर. सांगली. सातारा. बेळगांव

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

गणेश घोलप

बार्शी,दि. २ (प्रतिनिधी) श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचालित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे शनिवार दि. २७ रोजी सकाळी ठीक १० वाजता मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना , विशाखा वाङ्मय मंडळ व पृथ्वी कुल यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी बालसाहित्यिक फारूक काझी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे हे होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. परमेश्वर पाटील यांनी केले. डॉ. म




हादेव डिसले यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ध्वनिमुद्रित मराठी भाषा गौरव गीत सर्वांनी श्रवण केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध बालसाहित्यिक फारूक काझी यांनी उत्तम प्रकारे बालसाहित्य संदर्भात विवेचन केले. त्यांच्या व्याख्यानाचा मुख्य विषय बालसाहित्य आकलन आणि परिचय असा होता. त्यांनी बालसाहित्य संदर्भात संकल्पना, पार्श्वभूमी, संदर्भ साहित्य, प्रकार आदि घटकांची सविस्तर माहिती दिली. बालसाहित्याचे बाल, किशोर व कुमार असे स्तर विशद केले. मूल समजून घेण्याचा आरसा म्हणजे बालसाहित्य होय. बालसाहित्य हे बालकांचे विश्व अधिक समृद्ध करते. बालकांच्या व्यक्तिमत्वाला आकार देते. सुसंस्कृत व सृजनशील वाचक घडविण्यात बालसाहित्याचे मोठे योगदान आहे.

बालसाहित्य प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देते. राष्ट्राचे भविष्य हे त्या राष्ट्रातील बालकांवर अवलंबून आहे. म्हणूनच बालसाहित्य आकलन व परीचय करून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ सुग्रीव गोरे यांनी मराठी भाषा गौरव दिन विषयी माहिती विशद केली. राष्ट्राच्या विकसनात साहित्यिकांचे योगदान उल्लेखनीय आहे. मराठी भाषा प्रचार, प्रसार व जतन करण्यासाठी सर्वांचे योगदान महत्वपूर्ण आहे. मराठी साहित्यातून विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक सामर्थ्य विकसन केले पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमासाठी उपस्थितांचे आभार डॉ महादेव मते यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम समन्वयक डॉ महादेव डिसले यांनी केले. रेणुका सुर्यवंशी यांनी कार्यक्रमावर आधारित पॉवर पॉईंट सादरीकरण केले. कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख, शिक्षक, ऑनलाईन सहभागी बी एड, बी पी एड, एम एड, एम पी एड प्रशिक्षणार्थी , शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

College of Education Dist. Solapur Barshi.

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ऑनलाईन राष्ट्रीय परिषद

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'नवीन शैक्षणिक धोरण-२०२०' यावर एकदिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

बी.एड्., बी.पी.एड्., एम.एड्., एम.पी.एड्., पीएच.डी. विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे. नवीन शैक्षणिक धोरण-२०२० याविषयी माहिती घेणे गरजेचे असल्याचे लक्षात घेऊन ही राष्ट्रीय स्तरावरील परिषद आयोजित करण्यात आला होती. याप्रसंगी डॉ. बी. वाय. यादव यांनी संस्थेच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती विशद केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी, ऑनलाईन शिक्षण प्रणालीचा वापर करून शिक्षण प्रक्रियेत गतिमानता व लवचिकता आणणे गरजेचे असल्याचे सांगितले.

परिषदेसाठी मुख्य साधन व्यक्ती तथा मार्गदर्शक म्हणून झारखंड येथील डी. ए. व्ही. शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकेश कुमार शर्मा यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या व्याख्यानाचा मुख्य विषय 'नवीन शैक्षणिक धोरण-२०२० : फायदे आणि तोटे' असा होता.

या ऑनलाईन राष्ट्रीय परिषदेसाठी महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यांतील शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आदींसह सुमारे ३९५ व्यक्तींनी सहभाग नोंदवला. प्रास्ताविक डॉ. पी. ए. पाटील यांनी केले.

Solapur Edition
Mar 9, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

College of Education, Dist. Solapur, Barshi.

# Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's
# College of Education, Barshi
## Publicity 2020 - 2021

# रयतेचा वाली

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक २२७ गुरुवार दिनांक २०/०५/२०२१ पान ०२

## बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन

सोलापूर: दि.१९ (रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे संस्थापित श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी जि. सोलापूर येथे मंगळवार दिनांक १८ मे २०२१ रोजी एक दिवसीय ऑनलाइन आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या ऑनलाइन आंतरराष्ट्रीय परिषदेचा मुख्य विषय जागतिक दृष्टिकोनातून २१ व्या शतकातील संशोधने असा होता.

२१ व्या शतकातील नाविन्यपूर्ण संशोधन प्रणाली विकसित करून जागतिक पातळीवर शिक्षण व सामाजिक क्षेत्रांत आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या हेतुने या ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचा उद्घाटन कार्यक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू मा. डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या उपस्थितीत झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. बी. वाय. यादव हे उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे व प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे आदि मान्यवर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी जागतिक दृष्टिकोनातून २१ व्या शतकातील संशोधने यावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी संशोधनाची मूलभूत संकल्पना मांडली. संख्यात्मक आणि गुणात्मक संशोधनाचे पैलू विशद केले.संशोधन प्रकार, संशोधन अभिकल्प, संशोधन समस्येचे स्रोत, विश्लेषण व अर्थनिर्वचन आदी घटकांवर सविस्तर चर्चा केली. समाजातील प्रचलित गरजा व समस्यांवर आधारित २१ व्या शतकातील संशोधने झाली पाहिजेत असे त्यांनी आवाहन केले. डॉ. बी. वाय. यादव यांनी संस्थेच्या माध्यमातून राबविले जाणाऱ्या सामाजिक उपक्रमांची माहिती सांगितली. जगदाळे मामा हॉस्पिटलच्या ट्रामा सेंटरची भूमिका विशद केली. कोव्हीड-१९ कालावधीत जगदाळे मामा हॉस्पिटलच्या माध्यमातून उत्कृष्ठ काम सुरू असल्याचे सांगितले. ऑनलाईन शिक्षण प्रणालीतून विद्यार्थ्यांना अध्ययनाची मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध झाली आहे. २१ व्या शतकातील संशोधने सामाजिक आशयाची जाण आणि नैतिक विचारसरणीवर आधारित असावीत असे त्यांनी प्रतिपादन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी ऑनलाईन परिषदेस उपस्थित असलेल्यांचे स्वागत केले. महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण उपक्रमांची माहिती दिली. समाज व राष्ट्र विकासात शिक्षक, शिक्षण, अभ्यासक्रम महत्वाचा आहे. म्हणूनच २१ व्या शतकातील संशोधने ही शिक्षक शिक्षण क्षेत्राला गतिमानता देणारी असावीत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



परिषदेच्या दुसऱ्या सत्रात साधन व्यक्ती म्हणून अमेरिकेतील प्रोफेसर डॉ. अनिलकुमार भाटे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी जागतिक दर्जाचे संशोधन महत्वाचे असल्याचे सांगितले. २१ व्या शतकात स्पर्धेत मोठ्या प्रमाणात वाढ अपेक्षित आहे. विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, उद्योगधंदे आणि शासन यांच्यात ज्ञान संक्रमण गरजेचे आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात ज्ञान संक्रमण आवश्यक आहे. अमेरिका तंत्रज्ञान तर भारत सांस्कृतिक मूल्ये यात योगदान देऊ शकतात असे त्यांनी सांगितले. अमेरिकेतील जागतिक बँक वॉशिंग्टनचे डॉ. रमेश देशपांडे यांनी जागतिक पातळीवर संशोधन गरजेचे असल्याचे सांगितले. त्यांनी शाश्वत विकास ही संकल्पना सविस्तर विशद केली. कोव्हीड-१९ मुळे विकासाची गती खुंटली आहे. जागतिक समस्या निर्माण होत आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील विद्यापीठांनी निश्चित कृति योजना तयार करून शाश्वत विकासाच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी बहु- विद्याशाखीय कौशल्य विकास, संशोधन आणि नाविन्यता यांवर भर दिला पाहिजे असे त्यांनी आवाहन केले.

अमेरिकेतील डॉ. विक्रम पत्तरकिने यांनी 'इको व्हिलेज- शाश्वत पर्यावरणाकडे' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी इको व्हिलेज, मूलभूत तत्वे, जागतिक लोकसंख्या, निसर्गाचा इशारा, इको व्हिलेज वैशिष्ट्ये आदी घटकांवर सविस्तर मार्गदर्शन केले. पर्यावरण संतुलन राखणे गरजेचे आहे.

भविष्यातील मानवी जीवनाचा विकास हा पर्यावरणावर आधारित आहे. म्हणूनच जगभरात इको व्हिलेज संकल्पना रुजविण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत असे आवाहन केले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर यांनी संशोधन ओळख यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. परिषदेच्या पुढील सत्रात संशोधन पेपर सादरीकरण घेण्यात आले . एकूण २० संशोधन पेपरचे सादरीकरण झाले. यावेळी एकूण ०४ उत्कृष्ठ संशोधन पेपर निवडण्यात आले. यासाठी तज्ञ म्हणून सौदे अरेबिया येथील डॉ. कौकब अझीम, हरियाणा येथील डॉ. सारिका शर्मा, सांगलीचे डॉ. बी. पी. मरजे व मुंबई येथील डॉ. सुनिता मग्रे यांनी संशोधन पेपरचे मूल्यांकन केले.

परिषदेच्या समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष श्री. नंदन जगदाळे हे उपस्थित होते. यावेळी सौदी अरेबियाचे डॉ. कौकब अझीम यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे उपाध्यक्ष श्री. नंदन जगदाळे यांनी आपल्या भाषणातुन महाविद्यालयाने आयोजित केलेल्या या परिषदेचे कौतुक केले. एकूण ९० पेक्षा अधिक संशोधन पेपर संकलन झाल्याचे त्यांनी सांगितले. २१ व्या शतकातील विद्यार्थी व शिक्षक यांनी कौशल्याधिष्टीत शिक्षण प्रणाली राबवावी. अशा शिक्षण प्रणालीचा समाजाला उपयोग झाला पाहिजे. शिक्षणातून समाजोपयोगीता जोपासली पाहिजे असे त्यांनी आवाहन केले. सदर परिषदेत जगभरातून तसेच देशातील विविध विद्यापीठातील शिक्षणतज्ञ, प्राध्यापक, शिक्षक, संशोधन विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला. परिषदेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आय. क्यु. ए. सी. समन्वयक प्रोफेसर डॉ. व्ही. पी. शिखरे, समन्वयक डॉ. एस. डी. भिलेगावकर, सह समन्वयक डॉ. आर. ए. फुरडे व प्रा. पी. पी. नरळे तसेच सर्व विभागाचे विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

पुढारी

# प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातर्फे प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचा मुख्य विषय 'प्रशासकीय कर्मचारी व्यावसायिक विकास' असा आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे सचिव व्ही. एस. पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यशाळेत विविध विषयांवरील तज्ज्ञ व नामांकित साधन व्यक्ती मार्गदर्शन करणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी दिली.

२७ मे २०२१ रोजी कोल्हापूरचे उपकुलसचिव डॉ. विलास शिंदे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील उपकुलसचिव डॉ. दिगंबर नेटके यांचे, तर २८ रोजी सोलापूर विद्यापीठाचे डॉ. शिवाजी शिंदे व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. श्रीकांत अंधारे, तर २९ रोजी डी. आर. बी. सिंधू महाविद्यालय, नागपूरचे नवीन अग्रवाल व पुणे विद्यापीठाचे मुंजाजी रासवे हे मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही. कार्यशाळेत विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. गोरे यांनी केले आहे.

या कार्यशाळेसाठी आयक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, एस. एल. जाधव, डॉ. एल. आय. राठोड व एस. व्ही. वाघमारे आदी शिक्षक प्रयत्न करत आहेत.

Solapur Edition
May 26, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

College of Education, Dist. Solapur, Barshi.

पुढारी

# प्रशासकीय कर्मचाऱ्यांची ऑनलाईन कार्यशाळा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावरील प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसीय राष्ट्रीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे सचिव व्ही. एस. पाटील यांनी केले, तर समारोप खजिनदार प्रा. डी. एस. रेवडकर यांच्या उपस्थित झाला.

या कार्यशाळेचा मुख्य विषय प्रशासकीय कर्मचारी, व्यावसायिक विकास असा होता. २७ मे २०२१ रोजीच्या पहिल्या सत्रात शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे उपकुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी 'संस्था व महाविद्यालय विकासात प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे योगदान' या विषयावर सविस्तर माहिती दिली, तर दुसऱ्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील उपकुलसचिव डॉ. दिगंबर नेटके यांनी 'प्रशासकीय कामकाज व कार्यसंस्कृती' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

२८ मे रोजीच्या पहिल्या सत्रात सोलापूर विद्यापीठ सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी 'नॅक मूल्यांकनात प्रशासकीय कर्मचाऱ्यांची भूमिका' याबाबत अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले, तर दुसऱ्या सत्रात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील उपकुलसचिव डॉ. श्रीकांत अंधारे यांनी 'दैनंदिन प्रशासकीय कामकाज आणि ताणतणाव व्यवस्थापन' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. २९ मे रोजीच्या पहिल्या सत्रात डी.आर.बी. सिंधू महाविद्यालय, नागपूर येथील कुलसचिव नवीन अग्रवाल यांनी 'माहितीचा अधिकार' याविषयी सखोल विवेचन केले. तर दुसऱ्या सत्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील उपकुलसचिव मुंजाजी रासवे यांनी 'दैनंदिन कामकाजातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन केले.

प्रशासकीय कर्मचाऱ्यांची भूमिका, कर्तव्य, जबाबदारी, महत्त्वपूर्ण नोंदी, पारंपरिक व ऑनलाईन प्रणाली, कार्यसंस्कृती, ताण-तणाव व्यवस्थापन आदींवर चर्चा केली. या कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, डॉ. व्ही.पी. शिखरे, एस.एल. जाधव, डॉ. एल.आय. राठोड व एस. व्ही. वाघमारे आदींनी प्रयत्न केले.

Solapur Edition
Jun 1, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

डिजिटल दैनिक

रयतेचा वाली

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक २४२ रविवार दिनांक ०६/०६/२०२१ पान ०५

## पर्यावरण संरक्षण व संवर्धन गरजेचे -प्राचार्य डॉ.एस.एस. गोरे

सोलापूर: दि.५ (रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचालित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सांस्कृतिक विभाग व पृथ्वी कुलातर्फे आज शनिवार दि.५ जून २०२१ रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रम निमित्ताने महाविद्यालयात प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे ,विविध विभाग प्रमुख ,प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी पर्यावरण दिनाचे महत्त्व विशद केले. वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन हे पर्यावरणाचा समतोल साधतात. त्यामुळे सर्वांनी पर्यावरण संरक्षण व संवर्धन करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

गतवर्षीच्या ३५ वृक्षांचेही उत्कृष्ट संवर्धन करण्यात आले आहे. तसेच महाविद्यालयातील बी. एड.,बी. पी. एड., एम. एड., एम. पी. एड. अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणार्थी साठी पर्यावरण आधारित ऑनलाईन क्विझ आयोजित करण्यात आली. यात ६७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच पर्यावरण महत्व, पर्यावरण रक्षण काळाची गरज, पर्यावरण आणि आरोग्य पर्यावरण रक्षा जगाची सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन, आदी विषयावर निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली.



महाविद्यालयातर्फे प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिक रोख रक्कम अनुक्रमे रु १०००, रु ७०० ,रु ५०० व रु २०० व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन पृथ्वी कुल प्रमुख डॉ. एम. एस. डिसले व डॉ. पी. ए. पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. भिलेगावकर,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख डॉ. व्ही. पी. शिखरे , सर्व विभाग प्रमुख ,प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिवस्वराज्य दिन साजरा

**बार्शी** - शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सांस्कृतिक विभाग व अग्नि कुल यांच्या वतीने शिवस्वराज्य दिन कार्यक्रमाचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. यावेळी सौ.शोभाताई सोपल कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. बाळासाहेब गव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ एस.एस.गोरे अध्यक्षस्थानी होते. अल्पना पिंपळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आश्रुबा वाघमारे यांनी आभार मानले. धनश्री सोनके यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.व्ही.पी.शिखरे, डॉ.एस.डी.भिलेगावकर, डॉ.एम.व्ही. मते आदींनी परिश्रम घेतले.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2020 - 2021**


# रयतेचा वाली

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ )  वर्ष दुसरे - अंक २५८  मंगळवार दिनांक २२/०६/२०२१ पान ०६


## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

सोलापूर:दि. २१(रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे सोमवार दिनांक २१ जून २०२१ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शारीरिक शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने ७ व्या आंतरराष्ट्रीय योगा दिन ऑनलाईन कार्यक्रमाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे सहसचिव श्री. पी. टी. पाटील व खजिनदार प्रा. डी. एस. रेवडकर आदि मान्यवर ऑनलाईन उपस्थित होते. यावेळी पुणे येथील प्रमुख साधन व्यक्ती तथा सुप्रसिद्ध योगाचार्य डॉ. अमोल पाटील यांनी आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्ताने योगा प्रात्यक्षिकासह सविस्तर माहिती दिली. योगासनाचे विविध प्रकार विशद केले. यात त्यांनी ध्यान, ताडासन, मकारासन, वज्रासन,वक्रासन आदींविषयी माहिती सांगितली.



विद्यार्थ्यांनी नियमित योगासने केली पाहिजेत. योगासनामुळे मन आनंदी व शांत राहते. जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यात योगासनांची भूमिका महत्त्वाची आहे. योगासने विषयी शास्त्रशुध्द माहिती देऊन आनंदी जीवनासाठी प्रेरणादायी संदेश दिला. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी नियमित व्यायाम व योगासने केली पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी आंतरराष्ट्रीय योगा दिनाचे औचित्य साधून मौलिक मार्गदर्शन केले. योगाला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा यामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक व भावनिक विकास होतो. दैनंदिन ताण तणावापासून मुक्तता मिळते. मन आनंदी व एकाग्र राहते. रोग प्रतिकार शक्तीत वाढ होते. रोजच्या धावपळीच्या जीवनात आनंदी राहण्यासाठी योगासने केली पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ए. जी. कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पी.पी. नरळे यांनी केले. उपस्थितांचे आभार बी. पी. एड. विभाग प्रमुख डॉ. एस. एम. लांडगे यांनी मानले. प्रमुख साधन व्यक्ती डॉ.अमोल पाटील यांचा परिचय प्रा.सौ.एस. एस. सुरवसे यांनी करून दिला.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांचा परिचय डॉ. एस. एस. मारकड यांनी केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. एम. लांडगे, राष्ट्रीय सेवा योजना सर्व स्वयंसेवक, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांनी परिश्रम घेतले.

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2021 - 2022

रयतेचा कैवारी
डिजिटल शैक्षणिक दैनिक

संपादक - शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी'- वर्ष तिसरे - अंक २२६) गुरुवार दि.२३/०६/२०२२ पान ११

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात कर्मचाऱ्यांसाठी योग प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

सोलापूर: दि.२२(रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त दिनांक १५ जून ते २१ जून २०२२ या कालावधीत महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी योग प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. याचे उद्घाटन योग प्रशिक्षक प्रा. जी एस फरताडे यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे विश्वस्त माजी प्राचार्य डॉ सी एस मोरे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस.गोरे होते.

यावेळी आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. व्ही पी शिखरे व मुख्य लिपिक श्रीकांत वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यशाळेतून योगसंबंधीत शास्त्रीय व विस्तृत माहिती मिळाली. योगासनांचे महत्त्व समजले. दैनंदिन जीवनात व्यायाम,योगासने व आरोग्याचे महत्त्व लक्षात आल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच योगासने निरंतर करावीत असे सांगितले.




या कार्यशाळेत प्रा.जी एस फरताडे (प्राणायाम, मुद्रा व बंध), प्रा.डॉ. एस एम लांडगे (व्यायाम व आसने यांचे गरज व महत्त्व ), डॉ एस एस मारकड (आसन प्रात्यक्षिक), श्री. अनिल वेदपाठक(शुद्धी क्रिया), प्रा. पी पी नरळे (सूर्य नमस्कार) स्नेहल वेदपाठक ( झुंबा व एरोबिक्स नृत्य), मनमोहन भुतडा ( योगासने व समतोल आहार), प्रा. सौ. एस एस सुरवसे ( आहार व जीवनशैली ) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख पाहुणे संस्थेचे विश्वस्त माजी प्राचार्य डॉ सी एस मोरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. शरीर व मन यात सुसंवाद महत्वाचा आहे. व्यक्तीच्या शारीरिक, बौद्धिक, मानसिक व भावनिक विकासासाठी योगा महत्वाचा आहे. योगा हा शरीर व मन संतुलित राखतो. निरंतर योगा केल्याने दीर्घायुष्य व निरोगी जीवनाचा आनंद मिळतो. योग प्रशिक्षणाचा दैनंदिन जीवनात उपयोग करावा असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस.गोरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत सहभागी कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला याबद्दल कौतुक केले. प्रत्येक व्यक्तीने दैनंदिन जीवनातील वेळ योगासाठी द्यायला हवा. शारीरिक व मानसिक विकास योगावर अवलंबून आहे. योगाची व्याप्ती प्रचंड आहे. निरंतर योगासने करणे गरजेची आहेत. योग एक जीवन प्रणाली आहे.योगावर आधारित जीवन प्रणालीचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून सर्वांनी आपले आरोग्य उत्तम राखावे असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविक प्रा. सौ. एस एस सुरवसे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पंकज नरळे यांनी केले तर आभार प्रा. एस ए. सावळे यांनी मानले. कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. एस एम लांडगे यांनी कार्य केले. सदर कार्यक्रमास अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. व्ही पी शिखरे, एन एस एस समन्वयक डॉ एम एस डिसले, सर्व विभागाचे विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

# रयतेचा कैवारी
शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

-: नम्र निवेदन :-
याद्वारे नम्रपणे कळविण्यात येते, की दि. १४/०७/२०२१ पासून 'रयतेचा वाली' या नावाऐवजी **'रयतेचा कैवारी'** हे नाव धारण केलेले आहे.

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक २८१ गुरुवार दिनांक १५/०७/२०२१ पान ०३


## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या सीईटी ऑनलाइन अर्ज नोंदणी प्रक्रियेला सुरुवात

सोलापूर: दि.१५ (रयतेचा कैवारी, ऑनलाइन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथील बी. एड., बी. पी. एड., एम. एड. व एम. पी. एड. अभ्यासक्रमाच्या सीईटी-२०२१ ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सीईटी परीक्षेचे आयोजन करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ प्रवेशासाठी देखील सीईटी २०२१ परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. सीईटी २०२१ परीक्षेसाठी ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी https://cetcell.mahacet.org/ ही वेबसाईट उपलब्ध करून देण्यात आली आहे. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शीच्या वतीने सीईटी २०२१ संदर्भात मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सीईटी संदर्भात आवश्यक ती सविस्तर माहिती व मार्गदर्शन महाविद्यालयात उपलब्ध करून दिले जात आहे. बी. एड. सीईटी अर्ज ऑनलाईन सादर करण्याची अंतिम मुदत २७ जुलै २०२१ ही आहे. बी. पी. एड., एम. पी. एड. व एम. एड. सीईटी अर्ज ऑनलाईन सादर करण्याची अंतिम मुदत २६ जुलै २०२१ ही आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात तात्काळ संपर्क साधावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे व प्रवेश समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

College of Education Dist. Solapur Barshi.

# रयतेचा कैवारी


शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक २९८ बुधवार दिनांक ०४/०८/२०२१ पान ०८


## संशोधन व कौशल्यविकसन अभ्यासक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अग्रेसर - डॉ. शिवाजी शिंदे

सोलापूर:दि.०३ ( रयतेचा कैवारी, अ◌ॉनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे सांस्कृतिक विभाग, पृथ्वी कुल व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांचे संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ०१ ऑगस्ट २०२१ रोजी दुपारी ठीक ०४.३० वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ १७ वा वर्धापन दिन, लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती या ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे उपस्थित होते.

यावेळी डॉ. शिवाजी शिंदे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत सविस्तर व मौलिक मार्गदर्शन केले. सुरुवातीला लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे कार्य सविस्तर विशद केले. विद्यापीठ वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, शैक्षणिक वर्ष २००४-०५ मध्ये स्थापन झालेल्या सोलापूर विद्यापीठाची यशस्वी कामगिरी राहिली आहे. विद्यापीठाने दर्जेदार स्वरूपाचे अनेक अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले आहेत. अध्ययन, अध्यापन, संशोधन व मूल्यमापन क्षेत्रात विद्यापीठाने यश संपादन केले आहे. अनेक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थी व शिक्षक प्रभावी कामगिरी करत आहेत. विद्यार्थी केंद्रित शिक्षणप्रणाली राबविण्यावर विद्यापीठाचा नेहमीच भर राहिला आहे. अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या कला- गुणांना वाव देण्याचे काम




विद्यापीठाच्या वतीने केले जात आहे. रोजगाराभिमुख शिक्षणप्रणालीतून अनेक विद्यार्थ्यांना रोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. कला,विज्ञान, क्रीडा, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, एन. सी. सी., कृषी, तंत्रज्ञान, वाणिज्य, अभियांत्रिकी, शिक्षणशास्त्र आदी अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची जडणघडण केली जात आहे. संशोधन व कौशल्याधिष्टीत अभ्यासक्रम राबविण्यात विद्यापीठ अग्रेसर राहिले आहे. क्रीडा महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कौशल्याधिष्टीत अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना फायदेशीर ठरत आहेत. कोविड - १९ कालावधीत ऑनलाईन मूल्यमापन प्रणाली राबविण्यात इतर विद्यापीठाच्या तुलनेत सोलापूर विद्यापीठाने प्रभावी यश संपादन केले आहे. यामुळे अल्पावधीतच विद्यापीठ लोकप्रिय झाले आहे. विद्यापीठाच्या या यशस्वी कामगिरीत अनेक समाजघटकांचे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांच्या सामाजिक कार्याचा सविस्तर आढावा घेतला. लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय कार्याची माहिती दिली. अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक व साहित्यिक कार्य विशद केले. सोलापूर विद्यापीठ वर्धापन दिनाच्या निमित्ताने विद्यापीठाच्या नाविन्यपूर्ण कामगिरीचे विवेचन केले. समृद्ध मानवी व भौतिक सुविधांच्या जोरावरच विद्यापीठ प्रगती करत आहे. कौशल्य आधारित शिक्षण प्रणाली राबविली जात आहे. नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार कार्यप्रणाली राबविण्यासाठी विद्यापीठाच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत. यामुळे शिक्षणक्षेत्रात अनेक सकारात्मक बदल पाहावयास मिळतील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैभव घुगे यांनी केले. मिताली अबनावे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख प्रोफेसर डॉ. एस. डी. भिलेगावकर, आय. क्यू. ए. सी. समन्वयक प्रोफेसर डॉ. व्ही. पी. शिखरे, कुल मार्गदर्शक डॉ. एम. एस. डिसले, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, पृथ्वी कुल आदींनी योगदान दिले.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठेंना अभिवादन

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग, पृथ्वीकुल व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णा भाऊ साठे जयंती या ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे उपस्थित होते.

यावेळी डॉ. शिवाजी शिंदे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. सुरुवातीला लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे कार्य सविस्तर विशद केले. ते म्हणाले, शैक्षणिक वर्ष २००४-०५ मध्ये स्थापन झालेल्या सोलापूर विद्यापीठाची यशस्वी कामगिरी झाली आहे. विद्यापीठाने दर्जेदार स्वरूपाचे अनेक अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले आहेत. प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांनी लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांच्या सामाजिक कार्याचा सविस्तर आढावा घेतला. लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय कार्याची माहिती दिली. अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक व साहित्यिक कार्य विशद केले.

प्रास्ताविक वैभव घुगे यांनी केले. मिताली अबनावे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. पल्लवी भोसले यांनी आभार व्यक्त केले.

Solapur Edition
Aug 6, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

**पुढारी**

News by
गणेश गोडसे,बार्शी

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ग्रंथपाल दिन साजरा



बार्शी : राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना डॉ. एस.एस. गोरे व मान्यवर.

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे आदी उपस्थित होते.

सुरुवातीला कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांनी ग्रंथपाल दिनाचे औचित्य साधून उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी ग्रंथालय चळवळीतील डॉ. रंगनाथन यांचे योगदान स्पष्ट केले. ग्रंथालय विकास व प्रसार याविषयी माहिती दिली. सामाजिक हितासाठी ग्रंथालय महत्त्वाचे आहे. ग्रंथालयातील महत्त्वपूर्ण घटक म्हणून ग्रंथपालाचे योगदान याविषयी विवेचन केले. वाचन संस्कृती जोपासली पाहिजे. ग्रंथालयाच्या माध्यमातून समाजमने समृद्ध केली जावीत, असे आवाहन त्यांनी केले. महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. एस. एल. जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. एस.डी. भिलेगावकर, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. एम. व्ही. मते, प्रा. पी. पी. नरळे, प्रा. एस. ए. सावळे, मुख्य लिपिक एस.ठ ही. वाघमारे, एस. टी. गायकवाड आदी उपस्थित होते.

Solapur Edition
Aug 14, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

# रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

१५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्यदिन चिरायू होवो !

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक ३०९ रविवार दिनांक १५/०८/२०२१ पान ०६

## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा

सोलापूर : दि.१४ (रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे ग्रंथालय विभाग, सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक १२ ऑगस्ट २०२१ रोजी राष्ट्रीय ग्रंथपाल दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा जन्म दिन राष्ट्रीय ग्रंथपाल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांना ग्रंथालय शास्त्राचे पितामह म्हणून ओळखले जाते. सर्वसामान्य जनतेपर्यंत वाचन संस्कृती रुजविण्यासाठी व टिकविण्यासाठी ग्रंथपाल दिन राष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी ग्रंथपाल दिनाचे औचित्य साधून मार्गदर्शन केले. त्यांनी ग्रंथालय चळवळीतील डॉ. रंगनाथन यांचे योगदान स्पष्ट केले. ग्रंथालय विकास व प्रसार याविषयी माहिती दिली. सामाजिक हितासाठी ग्रंथालय महत्वाचे आहे. ग्रंथालयातील महत्वपूर्ण घटक म्हणून ग्रंथपालाचे योगदान याविषयी विवेचन केले.



वाचन संस्कृती जोपासली पाहिजे. वाचन केल्याने माणूस बहुश्रुत होतो. वाचन हे व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त आहे. पारंपरिक व ई-स्रोतांचा वापर करून वाचन कौशल्यावर भर दिला पाहिजे. वाचनाने समृध्द ज्ञान प्राप्त होते. वाचन केल्याने वैचारिक विकास होतो. ग्रंथालयाच्या माध्यमातून समाजमने समृध्द केली जावीत असे आवाहन त्यांनी केले. महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. एस. एल. जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. एस. डी. भिलेगावकर, डॉ. एम. एस. डिसले, डॉ एम. व्ही. मते, प्रा. पी. पी. नरळे, प्रा.एस. ए. सावळे, मुख्य लिपिक श्री. एस. व्ही. वाघमारे, श्री. एस. टी. गायकवाड आदी उपस्थित होते.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

## बार्शीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय अभिनव प्रयोगशाळा : डॉ. कदम

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या त्रिसदस्यीय समितीने भेट दिली. या समितीत प्रा.डॉ. विकास कदम, डॉ. आर. बी. भोसले आणि प्रा. पी. पी. तपकिरे यांचा समावेश होता. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे उपस्थित होते.

समितीचे अध्यक्ष तथा अधिष्ठाता डॉ. विकास कदम यांनी पीएच. डी. संशोधनासाठी महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधा पाहून शिक्षणशास्त्र विषयातील एक अभिनव अशी प्रयोगशाळा आहे, असे गौरवोद्गार काढले. या संशोधन केंद्रात सात संशोधन मार्गदर्शक असून पाच वर्षांमध्ये ५० संशोधकांनी पीएच.डी. ही शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी प्राप्त केली आहे. सध्या ३० विद्यार्थी पीएच. डी. संशोधनाचे कार्य करीत आहेत. संशोधक विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्रे, वेबिनार यांचे आयोजन व कार्यवाही या महाविद्यालयात केली जाते. संशोधक विद्यार्थ्यांच्या संशोधनाला योग्य दिशा देण्याचे कार्य महाविद्यालयातील मार्गदर्शकांकडून केले जात असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे यांनी दिली.

Solapur Edition
Aug 18, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**


# रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन !

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक ३१२ बुधवार दिनांक १८/०८/२०२१ पान ०३


## बार्शीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय एक अभिनव शैक्षणिक प्रयोगशाळा - डॉ. विकास कदम

सोलापूर: दि. १७ ( रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा ) शिक्षणशास्त्र विषयांमध्ये संशोधनासाठी ख्यातनाम व लोकप्रिय असणाऱ्या श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय,बार्शी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाच्या त्रिसदस्यीय समितीने शुक्रवार दिनांक १३.०८.२०२१ रोजी भेट दिली. या समितीत प्रा.डॉ.विकास कदम, डॉ. आर. बी. भोसले आणि प्रा. पी. पी. तपकीरे यांचा समावेश होता. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे उपस्थित होते.

समितीचे अध्यक्ष तथा अधिष्ठाता डॉ.विकास कदम यांनी पीएच.डी.संशोधनासाठी महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधा पाहून "शिक्षणशास्त्र विषयातील एक अभिनव अशी प्रयोगशाळा आहे" असे गौरवोद्गार काढले. उच्च शिक्षणातील नाविन्यपूर्ण बदलांसाठी संशोधन दिशा देते. बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षक शिक्षण क्षेत्रात संशोधन करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.



महाविद्यालयाने स्थापनेपासूनच शैक्षणिक प्रयोगशाळा म्हणून आपला नावलौकिक प्राप्त केला आहे. महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर चे मान्यताप्राप्त संशोधन केंद्र आहे. या संशोधन केंद्रामध्ये सात संशोधन मार्गदर्शक असून गत पाच वर्षांमध्ये एकूण ५० संशोधकांनी पीएच.डी.ही शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी प्राप्त केली आहे. तसेच सध्या ३० विद्यार्थी पीएच.डी. संशोधनाचे कार्य करीत आहेत. संशोधन विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्रे, वेबिनार यांचे यशस्वी आयोजन व कार्यवाही या महाविद्यालयात केली जाते.

संशोधक विद्यार्थ्यांच्या संशोधनाला योग्य दिशा देण्याचे कार्य महाविद्यालयातील मार्गदर्शकाकडून केले जात असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुग्रीव गोरे यांनी दिली.

समितीने महाविद्यालयातील पी. एच. डी.संशोधन केंद्रासाठी दिल्या जाणाऱ्या सुविधांची पाहणी केली. शैक्षणिक मानसशास्त्र प्रयोगशाळा, शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष, माहिती तंत्रज्ञान कक्ष, संशोधन कक्ष, ग्रंथालय इत्यादी केंद्रांना भेटी दिल्या. ग्रंथालयात संशोधकांना स्वतंत्र अद्ययावत बैठक व्यवस्था असून विविध प्रयोगशाळांमध्ये प्रयोग करण्याची सोय महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेली आहे.

या सर्व सोयीसुविधा पाहून समितीने समाधान व्यक्त केले. समितीचे स्वागत बी.एड.विभाग प्रमुख डॉ. एस.डी.भिलेगावकर यांनी केले. यावेळी डॉ. व्ही. पी.शिखरे, डॉ. एम.एस.डिसले, डॉ. एस. एल. जाधव, डॉ. एम.व्ही. मते तसेच संशोधन मार्गदर्शक प्राध्यापक उपस्थित होते.

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी

## संक्षिप्त

News by
गणेश गोडसे,बार्शी



बार्शी : पंधरवडा कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित मान्यवर.

### शिक्षणशास्त्र महाविद्यालयात पंधरवडा कार्यक्रम

**बार्शी :** बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालय २० ऑगस्ट ते ५ नोव्हेंबरपर्यंत सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने सामाजिक ऐक्य पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २० ऑगस्ट रोजी दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांचा जन्मदिवस सद्भावना दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. नीलिमा पांडे या ऑनलाईन उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे होते. डॉ. पी. ए. पाटील यांनी प्रास्ताविक केले. मानव संसाधन हा निसर्गातील महत्त्वाचा घटक आहे. समाजाच्या उन्नतीसाठी विषमता नष्ट केली पाहिजे. एकमेकांचा आदर केला पाहिजे. ऐक्यभाव जोपासला पाहिजे. संविधानात समाविष्ट असलेली मूल्ये मानवी मनात व विचारात जोपासली पाहिजेत. सकारात्मक व व्यापक दृष्टिकोनातून सामाजिक बांधिलकी निर्माण केली पाहिजे. सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. आभार सागर राऊत यांनी मानले. सूत्रसंचालन हरी मुकटे यांनी केले.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**


# रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक






संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक ३१६ रविवार दिनांक २२/०८/२०२१ पान १०


## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सामजिक ऐक्य पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन

सोलापूर : दि. २१ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे दिनांक २०/०८/२०२१ ते ०५/०९/२०२१ या कालावधीत सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने सामजिक ऐक्य पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने दिनांक २०/०८/२०२१ हा दिवस दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांचा जन्मदिवस सदभावना दिन म्हणून देशभर मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. विविध प्रदेशातील अनेक धर्मांच्या व अनेक भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये एकमेकांविषयी ऐक्याची भावना, सौहार्द भाव वृद्धिंगत करणे व हिंसाचार टाळणे, सामाजिक ऐक्य निर्माण करणे ही प्रमुख उद्दिष्टे हा पंधरवडा साजरा करण्यामागे आहेत. त्या निमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने विविध स्पर्धा व उपक्रमांचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २०/०८/२०२१ रोजी सदभावना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील समाज कार्य विभागाच्या सेवानिवृत्त सहयोगी प्राध्यापिका मा. डॉ. नीलिमा पांडे या ऑनलाईन उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस एस गोरे हे उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ पी ए पाटील यांनी प्रास्ताविक केले. यानंतर सदभावना गीत गायन करण्यात आले. सदभावना शपथ घेण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सोमनाथ लोंढे यांनी करून दिला.

यावेळी डॉ नीलिमा पांडे यांनी मौलिक व सविस्तर मार्गदर्शन केले. कलह आणि संघर्ष यामुळे समाजात दुफळी निर्माण होते. मानव संसाधन हा निसर्गातील महत्वाचा घटक आहे. निकोप सामाजिक विकास करणे गरजेचे आहे. यानिमित्ताने त्यांनी आदर्श गाव संकल्पना व तंटामुक्त गाव यावर विवेचन केले.समाज एकोप्याने राहणे आवश्यक असते. सामाजिक न्यायाची उभारणी समाजमान्य मूलभूत तत्वावर होत असते. आम्ही सर्व भारतीय एक आहोत हा विचार जन मनात रुजला पाहिजे.स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही चिरंतन मूल्ये आत्मसात केली पाहिजेत. संविधानात्मक मूल्ये यानुसार मानवी वर्तन अभिप्रेत आहे. समाजातील विषमता दूर करणे आवश्यक आहे. मूलभूत हक्क व कर्तव्ये यांची ओळख करून घेणे आवश्यक आहे. समाजात मात्र एकमेकांचे शोषण करणे यावर भर राहिला आहे. यामुळेच अनेक सामाजिक समस्या उग्र स्वरूप धारण करत आहेत. समाजाला अभिप्रेत सामाजिक बंधुभावाचा अभाव आहे. म्हणूनच प्रत्येकामध्ये सदभावना रुजविण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस एस गोरे यांनी सदभावना दिन निमित्ताने मौलिक मार्गदर्शन केले. समाजाच्या उन्नतीसाठी विषमता नष्ट केली पाहिजे. एकमेकांचा आदर केला पाहिजे. ऐक्य भाव जोपासला पाहिजे. संविधानात समाविष्ट असलेली मूल्ये मानवी मनात व विचारात जोपासली पाहिजेत. सकारात्मक व व्यापक दृष्टिकोनातून सामाजिक बांधिलकी निर्माण केली पाहिजे. सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी ऑनलाईन उपस्थितांचे आभार सागर राऊत यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरी मुकटे यांनी केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ एस. डी. भिलेगावकर, आय क्यू ए सी समन्वयक डॉ व्ही पी शिखरे, शौर्य कुल मार्गदर्शक डॉ पी.ए.पाटील, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व शौर्य कुल बी.एड. प्रशिक्षणार्थी आदींनी परिश्रम घेतले.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

# Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's
# College of Education, Barshi
## Publicity 2021 - 2022

# रयतेचा कैवारी
शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

संपादक :- शाहू संभाजी भारती -- डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' (वर्ष दुसरे - अंक ३२४) सोमवार दि.३०/०८/२०२१ पान ०४

## सुजाण नागरिक घडविण्यात खेळाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.- रमेश पाटील
## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

सोलापूर : दि.२९ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे रविवार दिनांक २९/०८/२०२१ रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन ऑनलाईन स्वरूपात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे खजिनदार श्री. जयकुमार शितोळे व माजी विद्यार्थी तथा माजी नगराध्यक्ष मा. श्री. रमेश पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. बी. पी. एड. विभागप्रमुख डॉ. सुरेश लांडगे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या कार्याचा आढावा घेतला. तसेच शारीरिक शिक्षण व क्रीडाचे महत्त्व विशद केले. प्रमुख पाहुणे मा.श्री. रमेश पाटील यांनी क्रीडा दिनाचे महत्त्व विशद केले. सुजाण नागरिक घडविण्यात क्रीडा व खेळ यांची महत्वपूर्ण भूमिका आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात क्रीडा व खेळ महत्वाचे आहेत. खेळाच्या सहभागातून शारीरिक पातळीवर चांगल्या प्रकारे विकास होतो. मानसिक आरोग्य चांगले राहते. आत्मविश्वास वाढला जातो. म्हणूनच सर्वांनी क्रीडा व खेळ याविषयी आवड निर्माण करावी असे आवाहन केले.



संस्थेचे खजिनदार मा.श्री जयकुमार शितोळे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा सविस्तर आढावा घेतला. मेजर ध्यानचंद यांनी आठ सुवर्णपदक प्राप्त करून हॉकी खेळामध्ये महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासासाठी शारीरिक शिक्षण महत्वाचे आहे. भारतीय खेळाबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित झाला पाहिजे. खेळाडूंची संख्या वाढली पाहिजे. क्रीडा शिक्षकांची यात मोठी जबाबदारी आहे. विविध खेळ व क्रीडा प्रकारातून खेळाडूंचा समतोल व सर्वंकष विकास होतो. "जगप्रसिध्द करूयात भारतीय खेळ" असे काव्य स्वरूपात त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे यांनी राष्ट्रीय क्रीडा दिन विषयी माहिती विशद केली. राष्ट्राच्या विकसनात खेळाडूंचे योगदान उल्लेखनीय आहे. व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासासाठी बोधात्मक व भावात्मक घटकाबरोबर क्रियात्मक विकास महत्वाचा आहे. क्रीडा व खेळ याविषयी शास्त्रीय माहिती घेतली पाहिजे. शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. शिक्षणाच्या सर्व स्तरावर खेळाडू तयार झाले पाहिजेत. प्रशासकीय स्तरावर आणि लोकप्रतिनिधी यांनी क्रीडा व खेळ याकडे विशेष लक्ष द्यावे असे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. ए. जी. कांबळे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांचा परिचय प्रा. स्मिता सुरवसे यांनी करून दिला. उपस्थितांचे आभार डॉ. एस. एस. मारकड यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. पंकज नरळे यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने ऑनलाईन उपस्थित होते.

College of Education Dist. Solapur Barshi.

# Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's
# College of Education, Barshi
## Publicity 2021 - 2022

रयतेचा कैवारी
शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक
संपादक :- शाहू संभाजी भारती -- डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' ( वर्ष ०२ - अंक ३३२ ) मंगळवार दि. ०७/०९/२०२१ पान १३

## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

सोलापूर: दि.०६ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे आय. क्यू. ए. सी., राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग आणि पृथ्वी कुल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ०५ सप्टेंबर २०२१ रोजी ऑनलाईन पध्दतीने शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे तथा व्याख्याते म्हणून महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष आणि सिल्व्हर ज्युबिली प्रशाला, बार्शीचे मुख्याध्यापक मा. श्री. प्रशांत कोल्हे हे उपस्थित होते. संस्थेचे विश्वस्त तथा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छ. शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या शुभहस्ते पूजन करून अभिवादन करण्यात आले. वैभव घुगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. पी. ए. पाटील यांनी सामाजिक ऐक्य पंधरवडा कार्यक्रम अहवाल सादर केला. शिक्षक दिन कार्यक्रम निमित्ताने सोमनाथ लोंढे, शितल लोंढे, आंनद सुतार यांनी विचार व्यक्त केले. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित मा. श्री. प्रशांत कोल्हे यांनी बदलते




शिक्षण, बदलते शिक्षक" या विषयावर सखोल व अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. नवीन शैक्षणिक धोरण २०२० याविषयी माहिती सादर केली. शिक्षकांची भूमिका स्पष्ट केली. ज्ञान, कौशल्ये, मूल्ये विकसित करणारे शिक्षक आज समाजाला हवे आहेत. शिक्षकांनी उपक्रमशीलता जोपासली पाहिजे. आई-वडीलानंतर शिक्षक महत्वपूर्ण आहेत. जीवनाचे मौलिक मार्गदर्शन शिक्षक करतात. बदलत्या काळानुसार शिक्षकांनी अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत बदल केले पाहिजेत. कौशल्याधिष्टीत शिक्षण ही संकल्पना शिक्षकांनी राबविली पाहिजे. जीवन कौशल्याचे मार्गदर्शन शिक्षकांनी केले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व संस्थेचे विश्वस्त डॉ. चंद्रकांत मोरे यांनी शिक्षक दिनाचे औचित्य साधून विशेष मार्गदर्शन केले. शिक्षक ही संकल्पना विस्तृतपणे स्पष्ट केली. शिक्षक या संकल्पनेत शिस्तप्रिय, क्षमाशील व कर्तव्यदक्ष हे गुण समाविष्ट आहेत. त्यांनी शिक्षकांचे विशेष गुण विशद केले. शिक्षकांनी ज्ञान संपदा, आत्मविश्वास, निष्ठा,औदार्य, चारित्र्य संपन्न या पंचसूत्रीचा अवलंब करावा असे त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी शिक्षक दिन निमित्ताने मौलिक मार्गदर्शन केले. ते म्हणाले, आज माहितीचा प्रस्फोट झाला आहे. शिक्षकांनी कृतीशीलता व नाविन्यता जोपासली पाहिजे. शिक्षक पुस्तकी ज्ञानाबरोबरच जीवन जगण्याचे धडे देतात. शिक्षकांनी आदर्शवत वर्तन व आचरण केले पाहिजे. शिक्षक विद्यार्थ्यांना आत्मविश्वास वाढविण्याचे बळ देतात. व्यक्तिमत्त्व विकासात शिक्षकांचे योगदान महत्वपूर्ण आहे. समाजाला प्रेरक असे शिक्षक निर्माण झाले पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमासाठी उपस्थितांचे आभार पल्लवी भोसले यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिताली अबनावे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एम. एस. डिसले, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, पृथ्वी कुलाचे प्रशिक्षणार्थी, सर्व प्रशिक्षणार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

पुढारी

# तुमचे ध्येय तुम्हीच निश्चित करा : प्रा. पाटील

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांनी नैतिक, सामाजिक, शैक्षणिक, भावनिक व तात्विक या पाच भूमिका पार पाडाव्यात. विद्यार्थ्यांनी ज्ञानाचे विविध पैलू अनुभवले पाहिजेत. सामाजिक भान जपले पाहिजे. शिक्षणाचे विविध आयाम लक्षात घ्यावेत. म्हणूनच विद्यार्थ्यांनी स्वतःचे ध्येय स्वतः निश्चित केले पाहिजे, असे आवाहन प्रा. विजयश्री पाटील यांनी केले.

ते 'माझे महाविद्यालय, माझी जबाबदारी' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानात बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे होते. राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील भूमिका सविस्तर विशद केली. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील समृद्ध भौतिक व मानवी उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा. भविष्यातील यशस्वी भूमिका पार पाडण्यासाठी विद्यार्थ्यांनी विशेष गुण विकसित केले पाहिजेत. सामाजिक दृष्टिकोन व्यापक केला पाहिजे. योग्य नियोजन व अथक परिश्रमातून फलश्रुती होते, यावर भर दिला पाहिजे. महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण विकासात विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. प्रा. एस.एस. सुरवसे यांनी प्रास्ताविक केले. पल्लवी भोसले व शुभांगी हिरेमठ यांनी परिचय करून दिला. आभार प्रा. सविता दुधभाते, सूत्रसंचालन डॉ. एल.आय. राठोड यांनी केले.

My Solapur Edition
Sep 13, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'वसुंधरा बचाव' कार्यक्रम

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'माझी वसुंधरा अभियान' अंतर्गत वसुंधरा बचाव ई-मित्र शपथ ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे जिल्हा समन्वयक प्रा.डॉ. वीरभद्र दंडे हे होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते.

प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांच्यासह सर्व विभागातील विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक यांनी आझादी का अमृत महोत्सव - अंतर्गत मॉर्निंग वॉक - रनिंग उपक्रमात सहभाग नोंदवला. प्रा.डॉ. वीरभद्र दंडे म्हणाले, 'माझी' या शब्दात आपुलकी आहे. वृक्षारोपण, सौरऊर्जेचा वापर, जलसंधारण, जैव विविधता, स्वच्छता, प्रदूषण नियंत्रण आदी घटकांचा माझी वसुंधरा अभियानात समावेश करण्यात आला आहे. प्रास्ताविक व वसुंधरा बचाव ई-मित्र शपथचे ऑनलाईन वाचन कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एस. डिसले यांनी केले. आभार सोमनाथ लोंढे यांनी, तर सूत्रसंचालन योगिता गवळी यांनी केले.

My Solapur Edition
Sep 13, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा वृक्ष लागवड कार्यक्रम

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात वृक्ष लागवड कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी विविध प्रकारच्या रोपांची लागवड महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आली.

वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धन कार्यक्रमासाठी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रकाश पाटील, विश्वस्त तथा माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे, प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे, विविध विभागाचे विभागप्रमुख, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एम.एस. डिसले, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक यांची विशेष उपस्थिती होती.

प्रकाश पाटील म्हणाले, वृक्ष लागवडीबरोबरच वृक्षांचे जतन व संवर्धन आवश्यक आहे. झाडे वाचवण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. पर्यावरण समतोल राखण्यासाठी वृक्षलागवड हा महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे. वृक्षलागवड हा चिरंतन प्रकल्प आहे. यात सातत्य राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे यांनी उपक्रमाचे कौतुक केले. पर्यावरण जागृतीसाठी सर्वांनी प्रयत्न हावे, असे आवाहन केले. डॉ. एम.एस. डिसले यांनी वृक्षलागवड ही लोकचळवळ करण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले. डॉ. एस.डी. भिलेगावकर यांनी प्रास्ताविक केले तसेच आभारही व्यक्त केले.

My Solapur Edition
Sep 24, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education, Dist. Solapur, Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' -- संपादक :- शाहू संभाजी भारती ( वर्ष तिसरे - अंक ००९ ) मंगळवार दि.२८/०९/२०२१ पान ०८

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात महिला सक्षमीकरण कार्यशाळा संपन्न

सोलापूर: दि.२७(रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे आय. क्यू. ए. सी., अंतर्गत तक्रार निवारण समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २० ते २६ सप्टेंबर २०२१ या कालावधीत सात दिवसीय ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा. प्रकाश पाटील हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते. यावेळी संस्थेचे विश्वस्त माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे उपस्थित होते.

या ऑनलाईन कार्यशाळेत माधुरी आवटे ( मानसिक आरोग्य व ताण तणाव व्यवस्थापन), ब्रह्मकुमारी अमितादीदी करवा (सकारात्मक विचार), प्राचार्य डॉ. सुलभा देशमुख ( महिला सबलीकरण), विधी तज्ञ माधुरी क्षीरसागर ( कौटुंबिक हिंसाचार व उपाययोजना), प्रा.विजयश्री पाटील( ब्रेक अप की मेक अप ), कायदे तज्ञ सुचित्रा घोगरे( कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ, प्रतिबंध व मनाई), दस्तगीर पठाण ( जीवन जगताना) यांनी वैविध्यपूर्ण विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी संस्थेचे सचिव श्री. प्रकाश पाटील,





सह सचिव श्री. अरुण देबडवार, खजिनदार श्री.जयकुमार शितोळे,कार्यकारिणी सदस्य श्री.विष्णू पाटील, विश्वस्त प्राचार्य डॉ.चंद्रकांत मोरे, सामाजिक कार्यकर्त्या सौ. वैशालीताई शितोळे , माजी प्राचार्य डॉ. सौ. व्ही यू पवार यांनी ऑनलाईन उपस्थित राहून उपस्थितांना मार्गदर्शन केले. संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा. श्री. प्रकाश पाटील यांनी मार्गदर्शन केले. आजच्या आधुनिक युगात महिला सक्षमीकरण महत्वाचे आहे. एका स्त्रीला शिक्षित केल्याने संपूर्ण कुटुंब शिक्षित होते. स्त्री कुटुंबाचा केंद्रबिंदू आहे. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया कार्यरत आहेत. लैंगिक अत्याचाराच्या घटनात दिवसेंदिवस वाढ होत आहे. लैंगिक छळ आणि अत्याचाराचा प्रतिबंध करण्यासाठी सर्व समाज घटकांचे प्रयत्न आवश्यक आहेत असे त्यांनी आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत महिला सक्षमीकरण संदर्भात माहिती देण्यात आली. महिलांना समाजात भक्कम स्थान प्राप्त व्हावे , स्त्री शिक्षणाला गती मिळावी आणि महिलांना स्वातंत्र्य व सुरक्षिततेची हमी मिळावी यावर व्यापक स्तरावर प्रयत्न आवश्यक आहेत. स्त्री भ्रूण हत्या थांबल्या पाहिजेत. यासाठी समाजात तीव्रतेने जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. महिलांच्या सक्षमीकरण संदर्भात सर्वसमावेशक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे असे त्यांनी आवाहन केले. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, एनएसएस समन्वयक डॉ. एम. एस. डिसले, कार्यक्रम समन्वयक प्रा. एस. एस. सुरवसे, सह समन्वयक डॉ. एल. आय. राठोड यांनी प्रयत्न केले.

College of Education * Dist. Solapur * Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात बी.एड्., सीईटी ऑनलाईन कार्यशाळा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान बी.एड्., सीईटी २०२१ ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे होते.

बी.एड्. प्रवेशासाठी राज्य शासनातर्फे केंद्रीय प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. याचाच एक भाग म्हणून सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात येते. बी.एड्. २०२१ साठी ६ व ७ ऑक्टोबर रोजी सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन सीईटी सेलच्या वतीने करण्यात आले आहे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना बी.एड. सीईटी परीक्षेची तयारी व्हावी, तसेच संबंधित घटकांवर चर्चा व्हावी, या हेतूने महाविद्यालयात ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. बी. एड्. सीईटी ही शिक्षक अभिक्षमता, मानसिक क्षमता व सामान्य ज्ञान या घटकावर आधारित घेण्यात येते. या ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेत प्रा. डॉ. एस.डी. भिलेगावकर व डॉ. एम. एस. डिसले, प्रा.डॉ. व्ही.पी. शिखरे व डॉ. आर.ए. फुरडे, डॉ. एम.व्ही. मते व डॉ. पी.ए. पाटील यांनी सीईटी उपयुक्त अशा या विषयावर मार्गदर्शन केले.

प्रा. गोरे म्हणाले, या कार्यशाळेत बी.एड्. सीईटी संदर्भात माहिती देण्यात आली. बी.एड्. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना सीईटी परीक्षेची मानसिक तयारी व्हावी. कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ. गोरे, डॉ. व्ही.पी. शिखरे, डॉ. एम.व्ही. मते, एम.एस. डिसले यांनी प्रयत्न केले.

My Solapur Edition
Oct 5, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

# रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' -- संपादक :- शाहू संभाजी भारती ( वर्ष तिसरे - अंक ०२४ ) बुधवार दि.१३/१०/२०२१ पान ०३

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात रासेयो सप्ताह संपन्न

सोलापूर: दि.१२ (दैनिक कैवारी,ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे आयक्यूएसी आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत कार्य प्रसिद्धी सप्ताह कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे व कार्यक्रम समन्वयक डॉ. एम. एस. डिसले यांनी दिली.

२४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व व कार्यपद्धती या विषयावर डॉ. संजय करंडे यांनी माहिती दिली. २५ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना कार्याचा समाज माध्यमाद्वारे प्रचार व प्रसार करण्यात आला. २७ सप्टेंबर रोजी निवडणूक साक्षरता मंडळ व कार्यप्रणाली या विषयावर डॉ. एम व्ही मते यांनी व्याख्यान दिले. २८ सप्टेंबर रोजी मौजे जामगाव येथे १०० रोपांची लागवड करण्यात आली. २९ सप्टेंबर रोजी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. ३० सप्टेंबर रोजी संत गाडगेबाबा जीवन व कार्य या विषयावर डॉ.रविकांत शिंदे यांनी मार्गदर्शन केले. ०१ऑक्टोबर रोजी निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ०२ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधीजी व स्वच्छता अभियान या विषयावर प्रा.व्ही एम. कदम यांनी माहिती विशद केली. कार्यक्रम समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी रासेयो कार्य प्रसिद्धी संदर्भात विशेष मार्गदर्शन केले. ते म्हणाले, या सप्ताहातून रासेयो स्वयंसेवकाची भूमिका व कर्तव्ये विशद करण्यात आली. एक जबाबदार नागरिक म्हणून विद्यार्थ्यांची जडणघडण करण्याचा यशस्वी प्रयत्न याद्वारे झाला असे त्यांनी प्रतिपादन केले. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एम. एस. डिसले यांनी प्रयत्न केले.




College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' -- संपादक :- शाहू संभाजी भारती ( वर्ष तिसरे - अंक ०२७ ) शनिवार दि.१६/१०/२०२१ पान ०५

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

सोलापूर : दि.१५ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे शुक्रवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२१ रोजी वाचन प्रेरणा दिन आणि विजयादशमी उत्सव या कार्यक्रमाचे ऑनलाईन स्वरूपात आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस येथील प्राचार्य डॉ. देविदास गेजगे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते.

भारताचे माजी राष्ट्रपती तथा भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने हा दिन साजरा केला जातो. तसेच भारतीय संस्कृतीत विजया दशमी तथा दसरा हा सण विशेष महत्वाचा आहे. म्हणूनच या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. देविदास गेजगे यांनी दैनंदिन जीवनात वाचनाचे अनन्यसाधारण महत्व विशद केले. आकलनासह वाचन करणे आवश्यक आहे. सर्वंकष वाचन सवय जोपासणे गरजेचे आहे. आत्मविश्वास, विचार विकास आणि व्यक्तिमत्त्व विकास यासाठी वाचन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.




अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी विजयादशमी भारतीय संस्कृतीतील एक मोठा सण आहे. यादिवशी सर्वत्र आनंदाचे वातावरण पहावयास मिळते. तसेच दैनंदिन जीवनात विद्यार्थ्यांनी वाचनावर भर दिला पाहिजे.कथा, कादंबरी, चरित्रे आदींचे वाचन आवश्यक आहे. समृध्द व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचन महत्वाचे आहे असे त्यांनी आवाहन केले.

मयुरी पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. अशोक वाघमारे व निलिमा पाटील यांनी समयोचित मनोगते व्यक्त केली. प्रदीप सुतार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. धनश्री सोनके यांनी आभार व्यक्त केले. आश्रूबा वाघमारे यांनी तांत्रिक साहाय्य व नियोजन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, सांस्कृतिक प्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर, समन्वयक डॉ. एम. व्ही. मते, अग्नी कुलाचे सदस्य यांनी विशेष प्रयत्न केले. यावेळी डॉ. पी. ए. पाटील, प्रा. पंकज नरळे, डॉ. एस. एल. जाधव, रमेश पाचपुते हे उपस्थित होते.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

# रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' -- संपादक :- शाहू संभाजी भारती ( वर्ष तिसरे - अंक ०३३ ) शुक्रवार दि.२२/१०/२०२१ पान ०८

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात योग प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

सोलापूर : दि. २१ (रयतेचा कैवारी, ऑनलाइन वृत्तसेवा) श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि पालक - शिक्षक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ ऑक्टोबर ते २१ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत ऑनलाईन योग प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेसाठी साधन व्यक्ती म्हणून सुप्रसिद्ध योगाचार्य श्री अनिल वेदपाठक यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस एस गोरे हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात बोधात्मक व भावात्मक विकासाबरोबरच शारीरिक विकास अत्यंत महत्वाचा आहे. चांगले शरीर ही एक मानवाची संपत्ती आहे. म्हणूनच स्वतःच्या शरीराची काळजी घेणे महत्त्वाचे ठरते. यासाठी नियमित व्यायाम व योगासने उपयुक्त ठरतात. याबरोबरच समतोल आहार चांगले आरोग्य राखण्यासाठी उपयुक्त ठरतो. म्हणूनच महाविद्यालयाने ऑनलाइन योग प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले होते.

कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे यांनी योगासने विषयी सविस्तर माहिती विशद केली. योगासनांचे महत्त्व सांगितले. उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस एस गोरे यांनी योग प्रशिक्षण कार्यशाळेची दैनंदिन जीवनातील उपयुक्तता विशद केली व शुभेच्छा दिल्या.




College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी


# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात योग प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि पालक - शिक्षक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाईन योग प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात झाली. कार्यशाळेसाठी योगाचार्य अनिल वेदपाठक यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे होते.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात बोधात्मक व भावात्मक विकासाबरोबरच शारीरिक विकास अत्यंत महत्त्वाचा आहे. चांगले शरीर ही एक मानवाची संपत्ती आहे. म्हणूनच स्वतःच्या शरीराची काळजी घेणे महत्त्वाचे ठरते. यासाठी नियमित व्यायाम व योगासने उपयुक्त ठरतात. याबरोबरच समतोल आहार चांगले आरोग्य राखण्यासाठी उपयुक्त ठरतो. म्हणूनच महाविद्यालयाने ऑनलाइन योग प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले होते.

कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे यांनी योगासने विषयी माहिती दिली.यावेळी प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी योग प्रशिक्षण कार्यशाळेची दैनंदिन जीवनातील उपयुक्तता विशद केली व शुभेच्छा दिल्या. अनिल वेदपाठक यांनी योगासने संकल्पना व विविध प्रकारची योगासने याविषयी माहिती प्रात्यक्षिकासह सादर केली. दैनंदिन जीवनात सहज करता येणारी योगासने सादर केली. सूर्यनमस्कार, योगासने व प्राणायाम यांची



उपयुक्तता विशद केली. सध्याच्या धावपळीच्या व ताण-तणावाच्या युगात योगासने महत्त्वाची ठरतात. म्हणूनच त्यांनी प्रात्यक्षिकासह सखोल मार्गदर्शन केले. याचबरोबर योग मार्गदर्शक अक्षय वेदपाठक यांनी देखील विविध प्रकारची योगासने प्रात्यक्षिकासह सादर केली.

प्रत्येकाने नित्यनेमाने योगासने केली पाहिजेत. स्वतःच्या शरीरासाठी जरूर वेळ दिला पाहिजे. दैनंदिन जीवनातील इतर कामाबरोबरच योगासने महत्त्वाचे आहेत. यामुळे शरीर व मन संतुलित राखण्यास मदत होते. आत्मविश्वास वाढला जातो. मन आनंदी राहते. कोणत्याही प्रकारचा ताण तणाव जाणवत नाही. संकटांना सामोरे जाण्याची क्षमता निर्माण होते. म्हणूनच सर्वांनी दैनंदिन जीवनात योगासने व व्यायाम यांचा अवलंब केला पाहिजे असे आवाहन केले.

या कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे पालक-शिक्षक समितीचे समन्वयक डॉ. ए. जी. कांबळे, डॉ. एम. व्ही. मते, प्रा. पंकज नरळे यांनी प्रयत्न केले.

My Solapur Edition
Oct 22, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात संशोधन कार्यपद्धतीवर कार्यशाळा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे आयक्यूएसी आणि संशोधन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संशोधन कार्यपद्धतीवर ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात झाली. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे होते.

महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे मान्यताप्राप्त शिक्षणशास्त्र विषयाचे संशोधन केंद्र आहे, तसेच महाविद्यालयात शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम राबविले जातात. एम.एड्., एम.पी. एड्. व पीएच.डी. विद्यार्थ्यांना संशोधन कार्यपद्धतीसंदर्भात उद्‌बोधन व्हावे, या हेतूने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या ऑनलाईन कार्यशाळेत प्रा. डॉ. एस.डी. भिलेगावकर, डॉ. युवराज पवार, डॉ. सचिन सलगर, डॉ. महेश कळलावे, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. एम.एस. डिसले यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी प्रा. पंकज नरळे, डॉ. एम. व्ही. मते, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. पी. ए. पाटील, डॉ. एस. एल. जाधव व डॉ. एल. आय. राठोड यांनी सत्रसमन्वयक म्हणून काम पाहले. या कार्यशाळेत संशोधन कार्यपध्दतीसंदर्भात अधिकतम माहिती देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. सर्व संशोधकांनी या माहितीचा त्यांच्या संशोधनासाठी वापर करावा. संशोधन प्रक्रियेतील मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक असते. संशोधन ही व्यापक व निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. संशोधन साधने, माहिती संकलन व विश्लेषण या बाबी महत्त्वपूर्ण आहेत. संशोध अहवाल लेखन प्रभावी असणे गरजे असते. एकंदरीतच संशोधन प्रक्रिय राबवताना अनेक समस्या निर्मा होतात. संशोधन प्रक्रिया अधिव गतिमान व गुणवत्तापूर्ण व्हावी यासाठी संशोधन विद्यार्थी व संशोध मार्गदर्शक यांनी प्रयत्न करावेत, अस त्यांनी आवाहन केले. महाविद्यालया प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, डॉ. व्ही पी. शिखरे, समन्वयक डॉ. एल आर राठोड, सहसमन्वयक डॉ. एम.एस डिसले यांनी प्रयत्न केले.

My Solapur Edition
Oct 26, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s

# College of Education, Barshi

## Publicity 2021 - 2022

रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' -- संपादक :- शाहू संभाजी भारती ( वर्ष तिसरे - अंक ०३८ ) बुधवार दि.२७/१०/२०२१ पान ०२

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात लसीकरण मोहिमेचा प्रारंभ

सोलापूर : दि. २६ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने दिनांक २६ ऑक्टोबर रोजी लसीकरण मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. या मोहिमेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. पी. आर. थोरात उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या आदेशानुसार महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, नातेवाईक यांच्यासाठी पहिला तसेच दुसरा डोस घेण्यासाठी युवा स्वास्थ्य अभियान अंतर्गत कोविड-१९ लसीकरण मोहीम आयोजित करण्यात आली. यासाठी श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी येथे लसीकरणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली.

यावेळी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी उपस्थित सर्वांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी स्वतः लसीकरणाचा दुसरा डोस घेतला. युवा स्वास्थ्य अभियान अंतर्गत सर्वांनी सक्रिय सहभागी होऊन लसीकरण मोहीम पूर्ण करावी असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले. सर्व विद्यार्थ्यांना सदर लसीकरण मोहिमेत सहभागी होण्यास प्रेरित करावे असे आवाहन केले. युवा स्वास्थ्य मोहीम यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. एम. एस. डिसले, डॉ. एम. व्ही. मते, प्रा. पी. पी. नरळे, प्रा. बी. टी. गुंड, डॉ.एल. आय. राठोड हे प्रयत्न करीत आहेत.

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

Publicity 2021 - 2022

पुढारी

# महाविद्यालयात मतदार नोंदणी अभियानाचा प्रारंभ

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मतदार नोंदणी अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. या अभियानाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे यांच्या हस्ते झाले.

१ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत मतदार नोंदणीसंदर्भात व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात यावे, असे आदेश महाविद्यालयांना देण्यात आले आहेत. यानुसार महाविद्यालयात निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करण्यात आले आहे. यामध्ये एक नोडल अधिकारी व विद्यार्थी यांचा समावेश आहे. भारत निवडणूक आयोगाचा स्वीप हा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. स्वीप म्हणजे मतदारांचे पद्धतशीर शिक्षण व निवडणूक सहभाग होय. या प्रकल्पांतर्गत मतदार नोंदणी, मतदानाच्या टक्केवारीत वृद्धी आणि लोकशाही सक्षमीकरणासाठी सातत्यपूर्ण उपक्रम यावर भर दिला जातो. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही जागरूकता निर्माण करण्यासाठी निवडणूक साक्षरता मंडळ हे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. एम.एस. डिसले यांनी केले. मतदार नोंदणी अभियानाचे नोडल अधिकारी डॉ. एम.व्ही. मते यांनी मतदार नोंदणी अभियानाचा उद्देश सविस्तर विशद केला. प्राचार्य गोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. शरद सावळे यांनी केले. मतदार नोंदणी अभियान व युवा स्वास्थ्य मोहीम यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. एम. व्ही. मते आदी प्रयत्न करीत आहेत.

College of Education Dist. Solapur Barshi.

My Solapur Edition
Nov 3, 2021 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी

# संस्थेच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान : डॉ. यादव

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील माजी विद्यार्थी कल्याणकारी संस्थेच्या वतीने माजी विद्यार्थी स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्यात बी.पी.एड्. अभ्यासक्रमाचे सन १९९८-९९ चे प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव हे उपस्थित होते. संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



**बार्शी : माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याप्रसंगी उपस्थित मान्यवर.**

यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, बी.पी.एड्. विभागप्रमुख प्रा. डॉ. सुरेश लांडगे, माजी विद्यार्थी समन्वयक प्रा. डॉ. ए.जी. कांबळे, सिनेअभिनेत्री विद्या सावळे, प्रवीण गाढवे, प्रा. बी.टी. गुंड, वैभव पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी मनोगतातून महाविद्यालयाच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. महाविद्यालयात घेतलेले अनुभव दैनंदिन जीवनात किती उपयुक्त ठरतात, हे त्यांनी आवर्जून सांगितले. शिक्षकांनी अध्यापनाबरोबरच जीवन जगण्याचे शिक्षण दिले म्हणूनच आजदेखील आम्ही आत्मविश्वासाने आमच्या क्षेत्रात कार्य करत आहोत, असे सांगितले. संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांनी माजी विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी जोपासा, असे सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव यांनी याप्रसंगी मार्गदर्शन केले. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य महान आहे. संस्थेचा आदर्श नागरिक निर्माण करण्यावर भर राहिला आहे. मामांनी वसतिगृहाच्या माध्यमातून शैक्षणिक कार्याची सुरुवात केली. मामांचे आरोग्य क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, भविष्यातील आव्हाने ओळखून त्यावर मात करण्यासाठी महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील आहे. नॅक मूल्यांकन प्रक्रियेत माजी विद्यार्थ्यांचे योगदानदेखील महत्त्वपूर्ण आहे.

प्रास्ताविक समन्वयक प्रा. डॉ. ए.जी. कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन श्रावण कोकितकर यांनी केले. आभार वेदकुमार मुंढे यांनी मानले. मेळाव्यासाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, प्रा. डॉ. एस.एम. लांडगे, प्रा. बी.टी. गुंड, प्रा. डॉ. ए.जी. कांबळे, डॉ. एम.व्ही. मते, प्रा. पी.पी. नरळे, डॉ. एस. एस. मारकड तसेच बी.पी.एड्.च्या माजी विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

My Solapur Edition
Nov 10, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi


**Publicity 2021 - 2022**

रयतेचा कैवारी
शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक
डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' -- संपादक :- शाहू संभाजी भारती (वर्ष तिसरे - अंक ०४५) सोमवार दि.१५/११/२०२१ पान ०१

## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात टीईटी ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

सोलापूर: दि.१५(रयतेचा कैवारी, अ‌ॉनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या वतीने दिनांक ०८ ते १३ नोव्हेंबर २०२१ या कालावधीत बी. एड. महाटीईटी २०२१ संदर्भात ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते. कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी प्रा. डॉ. आयेशा रंगरेज या उपस्थित होत्या. बी.एड. विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने महा टीईटी तथा महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा राबविली जाते. दिनांक २१ नोव्हेंबर २०२१ रोजी ही परीक्षा घेण्यात येणार आहे. याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना बी. एड. महा टीईटी परीक्षेची तयारी व्हावी तसेच संबंधित घटकांवर चर्चा व्हावी या हेतूने महाविद्यालयात ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

बी. एड. महाटीईटी ही बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र, भाषा १ व २, गणित, विज्ञान, सामाजिकशास्त्र या घटकावर आधारित घेण्यात येते. या ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेत प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे (विज्ञान), डॉ. एम. एस. डिसले (मराठी भाषा),डॉ. आर. ए. फुरडे (बालमानसशास्त्र), डॉ. एम व्ही मते(इंग्रजी भाषा), डॉ. पी. ए. पाटील (सामाजिक शास्त्र) व डॉ. के. जे. शिंदे (गणित) यांनी टीईटी उपयुक्त अशा या विषयावर मार्गदर्शन केले.




अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी बी.एड. महाटीईटी संदर्भात विशेष मार्गदर्शन केले. ते म्हणाले, या कार्यशाळेत बी. एड. टीईटी संदर्भात माहिती देण्यात आली. महाटीईटी परीक्षार्थींना परीक्षेची मानसिक तयारी व्हावी, अधिकतम उदाहरणांचा सराव व्हावा, संबंधित घटकांवर चर्चा व विचारमंथन व्हावे तसेच आत्मविश्वासाने व उत्साहाने परीक्षेला सामोरे जावे, या हेतूने महाविद्यालयात ही ऑनलाईन कार्यशाळा आयोजित करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे, कार्यशाळा समन्वयक डॉ. एस. डी. भिलेगावकर, डॉ. एस. एल. जाधव यांनी प्रयत्न केले.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

# रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' -- संपादक :- शाहू संभाजी भारती ( वर्ष तिसरे - अंक ०४८ ) सोमवार दि.२२/११/२०२१ पान ०७

## बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

सोलापूर: दि. २१ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे संस्थापित श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे शनिवार दिनांक २७ नोव्हेंबर २०२१ रोजी एक दिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेचा मुख्य विषय "इमर्जिंग ट्रेंड्स ऑफ एज्युकेशन इन पोस्ट कोविड वर्ल्ड" हा आहे.

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत. शिक्षणाच्या सर्वच स्तरावर ऑनलाईन शिक्षण प्रणालीचा स्वीकार केला जात आहे. अध्ययन, अध्यापन, संशोधन, मूल्यमापन, प्रशिक्षण आदि क्षेत्रांची परिमाणे व्यापक होत आहेत. शिक्षक-शिक्षण अभ्यासक्रम राबविण्यात देखील ऑनलाईन प्रणालीचा प्रभावी वापर दिसून येत आहे. म्हणूनच महाविद्यालयाने एक दिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. कोविडोत्तर जगातील शिक्षणाचे उदयोन्मुख प्रवाह याविषयी माहिती घेणे गरजेचे असल्याचे लक्षात घेऊन ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषद आयोजित केली आहे.

या परिषदेचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु मा. डॉ. मृणालिनी फडणवीस या करणार आहेत. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष



म्हणून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष श्री. एन. एन. जगदाळे, जनरल सेक्रेटरी श्री. पी. टी. पाटील, सहसचिव श्री. ए. पी. देबडवार , खजिनदार श्री. जे. सी. शितोळे, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य, विश्वस्त व सदस्य हे देखील परिषदेसाठी ऑनलाईन सहभागी होणार आहेत. परिषदेसाठी मुख्य साधन व्यक्ती तथा मार्गदर्शक म्हणून सौदी अरेबिया येथील प्रोफेसर डॉ. कौकब अझीम हे मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेत कोविडोत्तर जगातील ई-लर्निंग अध्यापनशास्त्र आणि ब्लेंडेड शिक्षण प्रणाली, बहुविद्याशाखीय आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास संशोधने, महामारी आणि मानवी जीवनशैली, कोविडोत्तर जगातील शारीरिक फिटनेस आणि निरोगीपणा या उपविषयावर संशोधन पेपर सादरीकरण केले जाणार आहे. प्रत्येक उपविषयावर आधारित एक उत्कृष्ठ संशोधन पेपर अवॉर्ड दिला जाणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यातील आणि परदेशातील शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आदी सहभागी होणार आहेत. परिषदेतील संशोधन पेपरचे नामांकित संशोधन मासिकात प्रकाशन करण्यात येणार आहे. या आंतरराष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन परिषदेमध्ये जास्तीत जास्त इच्छुकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे (९८५०३६८३८५), आयक्युएसी समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे (९५२७१७०४६१), परिषदेचे समन्वयक प्रा. पी. पी. नरळे (८६००१९७२७८ ) व सहसमन्वयक डॉ.एम. व्ही. मते (९८८१३७६७००) व आयोजन समिती यांनी केले आहे.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात २७ नोव्हेंबर रोजी एक दिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्राचार्य सुग्रीव गोरे यांनी दिली. या आंतरराष्ट्रीय परिषदेचा मुख्य विषय 'इमर्जिंग ट्रेंड्स ऑफ एज्युकेशन इन पोस्ट कोव्हिड वर्ल्ड' हा आहे.

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत. शिक्षणाच्या सर्वच स्तरावर ऑनलाईन शिक्षण प्रणालीचा स्वीकार केला जात आहे. अध्ययन, अध्यापन, संशोधन, मूल्यमापन, प्रशिक्षण आदी क्षेत्रांची परिमाणे व्यापक होत आहेत. शिक्षक-शिक्षण अभ्यासक्रम राबविण्यात देखील ऑनलाईन प्रणालीचा प्रभावी वापर दिसून येत आहे. म्हणूनच महाविद्यालयाने एक दिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. कोव्हिडोत्तर जगातील शिक्षणाचे उदयोन्मुख प्रवाह याविषयी माहिती घेणे गरजेचे असल्याचे लक्षात घेऊन ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषद आयोजित केली आहे.

परिषदेचे उद्घाटन सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस या करणार आहेत. अध्यक्षस्थानी डॉ. बी. वाय. यादव हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, पी. टी. पाटील, ए. पी. देबडवार, जे. सी. शितोळे हे देखील परिषदेसाठी ऑनलाईन सहभागी होणार आहेत.

परिषदेसाठी मुख्य साधन व्यक्ती तथा मार्गदर्शक म्हणून सौदी अरेबिया येथील प्रोफेसर डॉ. कौकब अझीम हे मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेत कोव्हिडोत्तर जगातील ई-लर्निंग अध्यापनशास्त्र आणि ब्लेंडेड शिक्षण प्रणाली, बहुविद्याशाखीय आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास संशोधने, महामारी आणि मानवी जीवनशैली, कोव्हिडोत्तर जगातील शारीरिक फिटनेस आणि निरोगीपणा या उपविषयावर संशोधन पेपर सादरीकरण केले जाणार आहे. प्रत्येक उपविषयावर आधारित एक उत्कृष्ट संशोधन पेपर ॲवॉर्ड दिला जाणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यातील आणि परदेशातील शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आदी सहभागी होणार आहेत. परिषदेतील संशोधन पेपरचे नामांकित संशोधन मासिकात प्रकाशन करण्यात येणार आहे. या आंतरराष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन परिषदेमध्ये जास्तीत जास्त इच्छुकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी केले आहे.

My Solapur Edition
Nov 22, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2021 - 2022


रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' -- संपादक :- शाहू संभाजी भारती ( वर्ष तिसरे - अंक ०५५ ) सोमवार दि.२९/११/२०२१ पान ०८


## नाविन्यपूर्ण कौशल्यांचे उच्चतम विकसन गरजेचे -कुलगुरू डॉ.मृणालिनी फडणवीस

सोलापूर: दि २८ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक २७ नोव्हेंबर २०२१ रोजी एक दिवसीय ऑनलाइन आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या ऑनलाइन आंतरराष्ट्रीय परिषदेचा मुख्य विषय " इमर्जिंग ट्रेंड्स ऑफ एज्युकेशन इन पोस्ट कोविड वर्ल्ड " असा होता. कोविडोत्तर जगातील शिक्षणाचे उदयोन्मुख प्रवाह याविषयी माहिती घेणे गरजेचे असल्याचे लक्षात घेऊन ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषद आयोजित करण्यात आली होती.

परिषदेचा उदघाटन कार्यक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू मा. डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या उपस्थितीत झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे खजिनदार मा. श्री. जयकुमार शितोळे हे उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे व प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे आदि मान्यवर उपस्थित होते. कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी कोविडोत्तर जगातील शिक्षणाचे उदयोन्मुख प्रवाह यावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी कोविडोत्तर जगातील प्रचंड बदलाची माहिती दिली. अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन क्षेत्रात गतिमानता आली आहे. भारत हा एक सामर्थ्यवान अर्थव्यवस्था असलेला देश आहे. नवीन शैक्षणिक धोरण राबविण्यास सज्ज आहे. सद्यस्थितीत कौशल्ये विकसन अभ्यासक्रमांची गरज आहे. नाविन्यपूर्ण कौशल्यांचे उच्चतम विकसन करण्यावर शिक्षणाचा भर असला पाहिजे. व्यवसायासंबंधित अधिकतम कौशल्यांचे ज्ञान असायला हवे.




Online International Conference 27th November, 2021

ऑनलाईन व डिजिटल गतिमानता स्वीकारणे गरजेचे आहे. कोविडमुळे कृषि क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. सामाजिक आणि भावनिक उपयुक्तता या दृष्टिकोनातून शिक्षणाचे महत्त्व आहे. कोविडोत्तर काळातील गरजा व समस्यांवर आधारित शिक्षणप्रणाली जोपासली पाहिजे असे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. जयकुमार शितोळे यांनी संस्थेच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. जगदाळे मामा हॉस्पिटलच्या ट्रामा सेंटरचे महत्व विशद केले. दुसऱ्या सत्रात साधन व्यक्ती म्हणून सौदी अरेबिया येतील प्रो.डॉ. कौकब अझीम यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी कोविड-१९ चा शिक्षणावरील प्रभाव या संदर्भात माहिती दिली. जागतिक दर्जाचे संशोधन महत्वाचे असल्याचे सांगितले. अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन यांची नवीन परिमाणे विशद केली. चांगले आरोग्य जपणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. बहु-विद्याशाखीय व आंतर विद्याशाखीय कौशल्य विकास, संशोधन आणि नाविन्यता यांवर भर दिला पाहिजे असे त्यांनी आवाहन केले.

परिषदेच्या समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. नंदन जगदाळे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा. श्री. पी. टी. पाटील हे उपस्थित होते. श्री. नंदन जगदाळे यांनी आपल्या भाषणातुन महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. एकूण ९८ संशोधन पेपर संकलन झाल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थी व शिक्षक यांनी ऑनलाईन व डिजिटल शिक्षक प्रणाली आत्मसात करावी असे आवाहन केले. शिक्षणातून सामाजिक समस्यांचे निराकरण झाले पाहिजे असे त्यांनी आवाहन केले. श्री. पी. टी. पाटील यांनी ऑनलाईन आणि व्हर्च्युअल शिक्षण प्रणालीची गरज विशद केली. शाळा आणि महाविद्यालये ही सामाजिक सेवा केंद्रे आहेत. एकमेकांतील आंतरक्रिया व संवाद यात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे असे त्यांनी सांगितले. सदर परिषदेत जगभरातून तसेच देशातील विविध विद्यापीठातील शिक्षणतज्ञ, प्राध्यापक, शिक्षक, संशोधन विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला. परिषदेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आयक्युएसी समन्वयक प्रोफेसर डॉ. व्ही. पी. शिखरे, समन्वयक प्रा. पी. पी. नरळे, सह समन्वयक डॉ. एम. व्ही. मते तसेच सर्व विभागाचे विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी

# नावीन्यपूर्ण कौशल्यांचे उच्चतम विकसन गरजेचे

## कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांचे प्रतिपादन

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

नावीन्यपूर्ण कौशल्यांचे उच्चतम विकसन करणे गरजेचे असल्याचे मत डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी व्यक्त केले.बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय 'इमर्जिंग ट्रेंड्स् ऑफ एज्युकेशन इन पोस्ट कोव्हिड वर्ल्ड' या विषयावर ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या.

कोव्हिडोत्तर जगातील शिक्षणाचे उदयोन्मुख प्रवाह याविषयी माहिती घेणे गरजेचे असल्याचे लक्षात घेऊन ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषद आयोजित करण्यात आली होती.



उद्घाटन कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या उपस्थितीत झाले. अध्यक्षस्थानी खजिनदार जयकुमार शितोळे होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे व प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. फडणवीस यांनी कोव्हिडोत्तर जगातील शिक्षणाचे उदयोन्मुख प्रवाह यावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी कोव्हिडोत्तर जगातील प्रचंड बदलाची माहिती दिली. अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन क्षेत्रात गतिमानता आली आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष जयकुमार शितोळे यांनी संस्थेच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. प्राचार्य डॉ एस. एस. गोरे यांनी ऑनलाईन परिषदेस उपस्थित असलेल्यांचे स्वागत करून महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण उपक्रमांची माहिती दिली.

परिषदेच्या दुसऱ्या सत्रात सधन व्यक्ती म्हणून सौदी अरेबिया येथील प्रोफेसर डॉ. कौकब अझीम यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी कोव्हिड १९ चा शिक्षणावरील प्रभाव यासंदर्भात माहिती दिली. परिषदेच्या तिसऱ्या सत्रात संशोधन पेपर सादरीकरण घेण्यात आले. एकूण १३ संशोधन पेपरचे सादरीकरण झाले. यावेळी एकूण ४ उत्कृष्ट संशोधन पेपर निवडण्यात आले. यासाठी तज्ज्ञ म्हणून अहमदाबाद येथील डॉ. जिग्नेश पटेल, चेन्नई येथील डॉ. पी. एन. लक्ष्मी शनमुगम, जयपूरचे डॉ. नवप्रभाकर गोस्वामी व सोलापूर येथील प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे यांनी संशोधन पेपरचे मूल्यांकन केले. परिषदेच्या समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील हे उपस्थित होते. परिषदेत तसेच देश-विदेशातील शिक्षण तज्ज्ञ, प्राध्यापक, शिक्षक, संशोधन विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला. परिषदेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस.एस. गोरे, व्ही. पी. शिखरे, पी. पी. नरळे, डॉ. एम. व्ही. मते तसेच सर्व विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

My Solapur Edition
Nov 30, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

## Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2021 - 2022


रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' -- संपादक :- शाहू संभाजी भारती ( वर्ष तिसरे - अंक ०६१ ) रविवार दि.०५/१२/२०२१ पान ०७


# भाषण प्रशिक्षण केंद्रास बी. एड. प्रशिक्षणार्थींची भेट

सोलापूर : दि. ४ (रयतेचा कैवारी,अॉनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथील बी. एड. प्रशिक्षणार्थींनी शुक्रवार दिनांक ०३ डिसेंबर २०२१ रोजी भाषण प्रशिक्षण केंद्रास अभ्यास भेट दिली. द आर्ट ऑफ पब्लिक स्पिकिंग या स्किल ओरिएंटेड कोर्सच्या प्रात्यक्षिक पूर्ततेसाठी स्मार्ट अकॅडमी भाषण प्रशिक्षण केंद्राला भेट व आवश्यक माहिती जाणून घेणे गरजेचे आहे. म्हणूनच या अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते.




यानिमित्ताने स्मार्ट ॲकॅडमीचे संस्थापक, पत्रकार व व्याख्याते सचिन वायकुळे यांनी बी. एड. प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. भाषण कौशल्य विकसित करण्यासाठी आवश्यक बाबींची माहिती दिली. भाषण कौशल्य विकसित करण्यासाठी प्रथमतः संभाषण उत्तम असावे.माहितीचे संकलन आणि प्रभावी सादरीकरण आवश्यक आहे. संभाषण हीच भाषणाची सुरुवात आहे. निरीक्षण, आत्मविश्वास, आशयाचे सखोल ज्ञान, श्रोते, भाषाशैली हे घटक उत्तम वक्ता होण्यासाठी उपयुक्त ठरतात. घरातूनच संवादाची सुरुवात करा. आई-वडिलांसोबत संवाद साधा. उत्तम वक्ता होण्यासाठी समृद्ध वाचन करावे असे त्यांनी आवाहन केले.

यावेळी प्रा. डॉ. एस. डी. भिलेगावकर, डॉ. आर. ए. फुरडे व डॉ. एम. व्ही. मते यांनी समयोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमरसिंह गोडगे यांनी केले. प्रदीप सुतार यांनी प्रमुख व्याख्याते यांचा परिचय करून दिला. आभार अमर क्षिरसागर यांनी तर सूत्रसंचलन पल्लवी भोसले यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, विभाग प्रमुख प्रा.डॉ. एस.डी भिलेगावकर, डॉ.आर.ए. फुरडे, डॉ. एम. व्ही. मते, तसेच बी. एड. प्रशिक्षणार्थी यांनी प्रयत्न केले.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2021 - 2022

पुढारी

संक्षिप्त

News by
गणेश गोडसे,बार्शी




बार्शी : शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील 'माझी वसुंधरा' अभियानाप्रसंगी उपस्थित मान्यवर.

### शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'माझी वसुंधरा' अभियान उत्साहात

**बार्शी** : शिक्षणशास्त्र महाविद्यालय व बार्शी नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने आयोजित 'माझी वसुंधरा' अभियान २.० अंतर्गत वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धनासंदर्भात प्रबोधनात्मक व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयातील विविध विभागांकडील प्रशिक्षणार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी प्रशिक्षणार्थी व एन.एस. एस. स्वयंसेवक यांना वसुंधरा शपथ देण्यात आली. सामाजिक वनीकरणचे निजाम मुलाणी यांनी वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन यावर प्रबोधनात्मक व्याख्यान दिले. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्राचार्य सुग्रीव गोरे यांनी 'माझी वसुंधरा' अभियान २.० राबविण्यात येत असल्याबद्दल अभिनंदन केले. वृक्ष लागवडीचे महत्त्व सांगत वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. आभार सूरज हजारे यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन योगिता गवळी, प्रास्ताविक वैभव घुगे यांनी केले.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

पुढारी

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अल्पसंख्याक हक्क दिन साजरा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ऑनलाईन 'अल्पसंख्याक हक्क दिन' कार्यक्रम झाला. प्रमुख व्याख्याते म्हणून कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय सोलापूर येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. दत्ता वाघमारे हे उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे होते. अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपराचे संवर्धन करता यावे तसेच याबाबतच्या वैशिष्ट्यांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी यादृष्टीने अल्पसंख्याक हक्क दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अल्पसंख्याक समाजाच्या परंपरा, संस्कृती, भाषा, धर्म हे जतन व संवर्धन करणे आवश्यक आहे असे सांगितले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी अल्पसंख्याक हक्क दिवसाचे औचित्य साधून अल्पसंख्याक संकल्पना व विशेष तरतुदी यावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक नीलिमा पाटील, आभार अशोक वाघमारे तर प्रदीप सुतार यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एस. डी. भिलेगावकर, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. एम. व्ही. मते, कुलप्रमुख अश्रुबा वाघमारे यांनी अभिनंदन केले.

Solapur Edition
Dec 20, 2021 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

# रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' -- संपादक :- शाहू संभाजी भारती ( वर्ष तिसरे - अंक ०८२) रविवार दि.२६/१२/२०२१ पान ०५

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सुशासन दिन साजरा

सोलापूर: दि २५(रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सांस्कृतिक विभाग, आर्ट ऑफ पब्लिक स्पिकिंग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी बाजपेयी यांचा जन्म दिवस "सुशासन दिन" म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून परांडा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री.अशोकराव खुळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे बी. एड. विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. डी. भिलेगावकर हे होते. यावेळी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, डॉ. सतिश शिंदे, प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. एम. व्ही. मते, कार्यक्रम समन्वयक डॉ. पी. ए. पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.

सुशासन दिनाच्या निमित्ताने सेवा प्रशासनास उपयुक्त अशा बाबीसंदर्भात माहितीचा अधिकार प्रशिक्षण,प्रशासनातील उत्कृष्ट संकल्पनांचे सादरीकरण, सेवा विषयक प्रशिक्षण, तणाव मुक्ती व्यवस्थापन, सेवा हमी कायद्याची अंमलबजावणी आदी उपक्रम राबविण्यात येतात.



यावेळी अशोकराव खुळे यांनी सुशासन दिनाचे औचित्य साधून मार्गदर्शन केले. त्यांनी अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्य कर्तृत्वचा सविस्तर आढावा घेतला. प्रशासनातील उत्कृष्ट तत्वांचे विवेचन केले. प्रशासनातील संधी व आव्हाने याविषयी चर्चा केली. प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्य करताना सर्वंकष विचार राबविणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी सुशासन दिन याविषयी माहिती दिली. कार्यक्षम व प्रभावी प्रशासनाची हमी देण्याच्या उद्देशाने सुशासन दिन साजरा केला जातो. प्रशासकांनी मनमानी कारभार न करता कायद्यातील तरतूदींप्रमाणे प्रशासन चालवावे. कोणत्याही प्रलोभनांना किंवा दडपणांना त्यांनी बळी पडू नये. कायद्यातील तरतुदींचे तंतोतंत पालन करावे. प्रशासनात आवश्यक तेथे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जावा. प्रशासनाचे अस्तित्व त्याच्या कामाच्या स्वरुपात सर्वांना सतत जाणवत राहीले पाहिजे. कामाचा वेग आणि दर्जा वाढला पाहिजे असे त्यांनी आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात डॉ.एस.डी. भिलेगावकर यांनी सुशासन दिनाचे महत्त्व विशद केले. सुशासन सर्वसमावेशक आणि न्यायी असायला हवे. प्रशासकाने कोणत्याही आधारावर भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान वागणुक देणे अपेक्षित आहे. प्रशासनाच्या योजना सर्वांना लाभदायी ठरतील अशाप्रकारच्या असाव्यात असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमासाठी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक अश्रुबा वाघमारे यांनी केले. प्रदिप सुतार यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. अशोक वाघमारे व अमर क्षीरसागर यांनी समयोचित मनोगते व्यक्त केली. उपस्थितांचे आभार अमरसिंह गोडगे यांनी मानले. प्राजक्ता चव्हाण यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, सांस्कृतिक प्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर, एनएनएस कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एस. डिसले, कार्यक्रम समन्वयक डॉ. पी. ए. पाटील ,आर्ट ऑफ पब्लिक स्पिकिंगचे सदस्य व एनएसएसचे स्वयंसेवक यांनी प्रयत्न केले.

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सुशासनदिन साजरा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्मदिवस 'सुशासनदिन' म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून परंडा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अशोकराव खुळे होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे बी. एड. विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. डी. भिलेगावकर होते. यावेळी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, डॉ. सतीश शिंदे, प्रा. डॉ. व्ही.पी. शिखरे, डॉ. एम.एस. डिसले, डॉ. आर.ए. फुरडे, डॉ. एम.व्ही. मते, कार्यक्रम समन्वयक डॉ. पी.ए. पाटील आदी उपस्थित होते.

सुशासन दिनाच्या निमित्ताने सेवा प्रशासनास उपयुक्त अशा बाबींसंदर्भात माहितीचा अधिकार प्रशिक्षण, प्रशासनातील उत्कृष्ट संकल्पनांचे सादरीकरण, सेवाविषयक प्रशिक्षण, तणावमुक्ती व्यवस्थापन, सेवा हमी कायद्याची अंमलबजावणी आदी उपक्रम राबविण्यात येतात.

यावेळी अशोकराव खुळे यांनी सुशासन दिनाचे औचित्य साधून मार्गदर्शन केले. त्यांनी अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकर्तृत्वाचा सविस्तर आढावा घेतला. प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्य करताना सर्वंकष विचार राबविणे गरजेचे असल्याचे, त्यांनी सांगितले. कार्यक्षम व प्रभावी प्रशासनाची हमी देण्याच्या उद्देशाने 'सुशासन दिन' साजरा केला जातो. डॉ. एस. डी. भिलेगावकर यांनी सुशासन दिनाचे महत्त्व विशद केले.

प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एस. डी. भिलेगावकर, डॉ. एम.एस. डिसले, डॉ. पी.ए. पाटील, एनएसएसचे स्वयंसेवक यांनी प्रयत्न केले. आभार अमरसिंह गोडगे तर प्राजक्ता चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

My Solapur Edition
Dec 28, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education, Dist. Solapur, Barshi.

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती कार्यक्रमाचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. सुहासिनी शिंदे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे उपस्थित होते. यावेळी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर, कार्यक्रम समन्वयक डॉ. एम.व्ही. मते, डॉ. पी.ए. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी काव्यवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महिलांच्या कार्यकर्तृत्वावर आधारित स्वरचित काव्यरचना व सादरीकरण या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण १२ बी.एड्. प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला. आश्रुबा वाघमारे, प्रीती गवळी व स्नेहल गुरव यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक संपादन केला. अल्पना पिंपळे व स्नेहल गायकवाड यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. यावेळी विजेत्या स्पर्धकांना पुस्तक व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे सुहासिनी शिंदे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा घेतला. प्रास्ताविक निलिमा पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय अशोक वाघमारे यांनी करून दिला. आभार आश्रुबा वाघमारे यांनी मानले.

Solapur Edition
Jan 5, 2022 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**


रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक


दैनिक 'रयतेचा कैवारी' @ संपर्क :- ९९७५७३८३२१ ( वर्ष तिसरे - अंक १०२ ) शनिवार दि.१५/०१/२०२२ पान ०९


## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमाचे उद्घाटन

सोलापूर: दि.१४(रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलितशिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी व भाषा संचालनालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक १४ जानेवारी २०२२ रोजी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमाचे उद्घाटन ऑनलाईन पद्धतीने मोठ्या उत्साहात करण्यात आले.

यानिमित्ताने "मी का लिहितो" या आभासी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा. प्रकाश पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाषा संचालनालय, मुंबई येथील भाषा संचालक मा. श्रीमती विजया डोनिकर या उपस्थित होत्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे तसेच निमंत्रित तज्ज्ञ उपस्थित होते.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात दिनांक १४ ते २८ जानेवारी २०२२ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा



कार्यक्रमाचे ऑनलाईन पध्दतीने आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मराठी भाषा गौरव गीत सर्वांनी श्रवण केले. संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा. प्रकाश पाटील यांनी मार्गदर्शन केले. यानिमित्ताने मराठी भाषेचे प्रश्न, मराठी भाषेची सौंदर्यता,मराठी भाषेचा प्रसार व प्रचार आदी विषयावर मनोगत व्यक्त केले. मराठी भाषा ही ज्ञान भाषा झाली पाहिजे असे त्यांनी सांगितले.

"मी का लिहितो" या आभासी परिसंवादात सुप्रसिद्ध कथाकार मा. प्रणव सखदेव, अनुवादक सोनाली नवांगुळ तसेच बाल साहित्यिक संजय वाघ यांनी सहभाग घेतला. सर्व तज्ञांनी मी का लिहितो याविषयी सविस्तर माहिती दिली. अस्वस्थता हीच लिहिण्याची प्रारंभिक पायरी आहे. सभोवतालच्या दैनंदिन जीवनातील घटना व प्रसंग लेखन करण्यास प्रेरित करत असतात. समृद्ध लेखनातून समृद्ध साहित्य निर्माण होते. मनाला भावलेले व लागलेलेच लेखनातून प्रतित होते, असा सूर या परिसंवादात पाहावयास मिळाला.

अध्यक्षीय समारोपात भाषा संचालक मा. श्रीमती विजया डोनिकर यांनी मार्गदर्शन केले.मराठी भाषिकांना वाचन ही अंत:प्रेरणा स्वस्थ बसू देत नाही. लेखन करताना लेखकाची भूमिका समजून घेणे गरजेचे असते. लेखकांचे अनुभव व्यक्त करण्याचे कुतूहल सर्वसामान्य वाचकांना असते. स्वतःच्या अनुभवातून व वेदनेतून लेखन केले जाते. कोणत्याही प्रकारचा न्यूनगंड न ठेवता स्वतःच्या अनुभवांचे लेखन केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नामदेव कोळी यांनी केले.डॉ. एस. डी. भिलेगावकर व डॉ. आर. ए. फुरडे यांनी प्रमुख मान्यवरांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पी. ए. पाटील यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. एम. एस. डिसले यांनी मानले.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी



बार्शी : कार्यक्रमाच्या उद्‌घाटनाप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे व प्राध्यापक.

## बार्शी महाविद्यालयात भूगोलदिन साजरा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात भूगोलदिन व मकर संक्रांतीचा कार्यक्रम ऑनलाईन पध्दतीने पार पडला. यावेळी पंढरपूरच्या उमा महाविद्यालयाचे प्रा. संभाजी शेळके हे पाहुणे होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे होते. छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्ताने अमरसिंह गोडगे व योगिता गवळी यांनी मकर संक्रांत व भूगोल दिनाविषयी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. संभाजी शेळके, प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांनी मार्गदर्शन केले. भौतिक सुख-सुविधांनी मानवी जीवन संपन्न झाले आहे. याचा परिणाम मानसिक ताणतणाव व अस्वस्थता यावर होत आहे. असे डॉ. गोरे यांनी सांगितले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती डॉ. एल.आय. राठोड यांनी दिली.

Solapur Edition
Jan 17, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

# रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक


दैनिक 'रयतेचा कैवारी' @ संपर्क :- ९९७५७३८३२१ ( वर्ष तिसरे - अंक १०२ ) शनिवार दि.१५/०१/२०२२ पान ०९


# बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमाचे उद्घाटन

सोलापूर: दि.१४(रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलितशिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी व भाषा संचालनालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक १४ जानेवारी २०२२ रोजी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमाचे उद्घाटन ऑनलाईन पद्धतीने मोठ्या उत्साहात करण्यात आले.

यानिमित्ताने "मी का लिहितो" या आभासी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा. प्रकाश पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाषा संचालनालय, मुंबई येथील भाषा संचालक मा. श्रीमती विजया डोनिकर या उपस्थित होत्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे तसेच निमंत्रित तज्ज्ञ उपस्थित होते.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात दिनांक १४ ते २८ जानेवारी २०२२ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा



कार्यक्रमाचे ऑनलाईन पध्दतीने आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मराठी भाषा गौरव गीत सर्वांनी श्रवण केले. संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा. प्रकाश पाटील यांनी मार्गदर्शन केले. यानिमित्ताने मराठी भाषेचे प्रश्न, मराठी भाषेची सौंदर्यता,मराठी भाषेचा प्रसार व प्रचार आदी विषयावर मनोगत व्यक्त केले. मराठी भाषा ही ज्ञान भाषा झाली पाहिजे असे त्यांनी सांगितले.

"मी का लिहितो" या आभासी परिसंवादात सुप्रसिद्ध कथाकार मा. प्रणव सखदेव, अनुवादक सोनाली नवांगुळ तसेच बाल साहित्यिक संजय वाघ यांनी सहभाग घेतला. सर्व तज्ञांनी मी का लिहितो याविषयी सविस्तर माहिती दिली. अस्वस्थता हीच लिहिण्याची प्रारंभिक पायरी आहे. सभोवतालच्या दैनंदिन जीवनातील घटना व प्रसंग लेखन करण्यास प्रेरित करत असतात.

समृद्ध लेखनातून समृद्ध साहित्य निर्माण होते. मनाला भावलेले व लागलेलेच लेखनातून प्रतित होते, असा सूर या परिसंवादात पाहावयास मिळाला.

अध्यक्षीय समारोपात भाषा संचालक मा. श्रीमती विजया डोनिकर यांनी मार्गदर्शन केले.मराठी भाषिकांना वाचन ही अंत:प्रेरणा स्वस्थ बसू देत नाही. लेखन करताना लेखकाची भूमिका समजून घेणे गरजेचे असते. लेखकांचे अनुभव व्यक्त करण्याचे कुतूहल सर्वसामान्य वाचकांना असते. स्वत:च्या अनुभवातून व वेदनेतून लेखन केले जाते. कोणत्याही प्रकारचा न्यूनगंड न ठेवता स्वत:च्या अनुभवांचे लेखन केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नामदेव कोळी यांनी केले.डॉ. एस. डी. भिलेगावकर व डॉ. आर. ए. फुरडे यांनी प्रमुख मान्यवरांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पी. ए. पाटील यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. एम. एस. डिसले यांनी मानले.

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**


# रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

दैनिक 'रयतेचा कैवारी' @संपर्क : ९९७५७३८३२१ (वर्ष तिसरे - अंक १०७) गुरुवार दि.२०/०१/२०२२ पान १०


## शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या शुभांगी हिरेमठ यांना सुवर्णपदक

सोलापूर : दि. १९ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथील बी. पी. एड. अभ्यासक्रमाची प्रशिक्षणार्थी शुभांगी गंगाधर हिरेमठ यांना सन २०२०-२१ या परीक्षेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. विद्यापीठात बी. पी. एड. अभ्यासक्रमात प्रथम येणाऱ्या प्रशिक्षणार्थीस श्री सुभाष चंद्राम चव्हाण यांच्या वतीने "दलित मित्र चंद्राम रामचंद्र चव्हाण सुवर्णपदक" देण्यात येते.

यावर्षी हे सुवर्णपदक बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शुभांगी हिरेमठ यांनी संपादन केले आहे. बी. पी. एड. अभ्यासक्रमात त्यांना एकूण ३२०० पैकी २५७१ (८०.३४ टक्के) इतके गुण मिळाले आहेत. महाविद्यालयात समृद्ध मानवी व भौतिक सुविधा आहेत. यात तज्ज्ञ क्रीडा मार्गदर्शक, प्रयोगशाळा, क्रीडांगणे, जलतरण तलाव, इनडोअर स्टेडियम, मुलींचे वसतिगृह आदी सुविधांचा समावेश आहे. महाविद्यालयात उज्ज्वल निकालाची परंपरा कायम



राखत शुभांगी हिरेमठ यांनी हे यश संपादन केले आहे. संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे खजिनदार श्री. जयकुमार शितोळे यांच्या शुभहस्ते शुभांगी हिरेमठ यांचा सत्कार करण्यात आला.

त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष श्री. एन. एन. जगदाळे, जनरल सेक्रेटरी श्री. पी. टी. पाटील, सहसचिव श्री. ए. पी. देबडवार, खजिनदार श्री. जे. सी. शितोळे, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आंतरविद्याशाखीय अभ्यासचे अधिष्ठाता डॉ. व्ही. पी. शिखरे, बी. पी. एड. विभाग प्रमुख डॉ. एस. एम. लांडगे, शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासमंडळाचे अध्यक्ष डॉ. ए. जी. कांबळे, प्रा. एस. एस. सुरवसे, प्रा. पी. पी. नरळे, प्रा. बी. टी. गुंड, पालक श्रीमती जयश्री हिरेमठ, सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व प्रशिक्षणार्थींनी अभिनंदन केले आहे.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2021 - 2022

रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

दैनिक 'रयतेचा कैवारी' @ संपर्क : ९९७५७३८३२१ ( वर्ष तिसरे - अंक ०८८ )   'प्रजासत्ताकदिन'   बुधवार दि.२६/०१/२०२२ पान ०३

## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन साजरा

सोलापूर: दि. २५(रयतेचा कैवारी, अ◌ॉनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, निवडणूक साक्षरता मंडळ, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, सांस्कृतिक विभाग, अग्नी कुल व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक २५ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता ऑनलाईन पद्धतीने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. यावेळी साधन व्यक्ती म्हणून महाविद्यालयातील निवडणूक साक्षरता मंडळाचे नोडल अधिकारी डॉ. एम व्ही मते उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस एस गोरे हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस एस गोरे यांनी उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थी व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह सामूहिक ऑनलाईन पद्धतीने राष्ट्रीय मतदार दिनाची प्रतिज्ञा तथा शपथ घेतली.

कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयात विविध स्पर्धांचे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेत एकूण १३ प्रशिक्षणार्थीनी सहभाग घेतला. यात स्नेहल गुरव, अल्पना पिंपळे व तब्बसुम पटेल यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला.



चित्रकला स्पर्धेत एकूण ०४ प्रशिक्षणार्थीनी सहभाग घेतला. यात प्रदिप सुतार, तब्बसुम पटेल व स्नेहल गुरव यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. घोषवाक्य स्पर्धेत एकुण ०६ प्रशिक्षणार्थीनी सहभाग घेतला.

यात ओमप्रिया गवळी, स्नेहल गुरव व तब्बसुम पटेल यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक संपादन केला. सवाल शेख व मयुरी पाटील यांनी समयोचित मनोगते व्यक्त केली.

यावेळी नोडल अधिकारी डॉ. एम. व्ही. मते यांनी राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून मार्गदर्शन केले. यात त्यांनी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याचा उद्देश विशद केला. नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदण्यासाठी प्रोत्साहन देणे, सुलभ मतदार नोंदणी करणे, मतदारांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढवावा, मतदार जाणीव जागृती उपक्रम याविषयी माहिती दिली.

डॉ एल आय राठोड यांनी मतदार जाणीव जागृती संदर्भात उपक्रम सांगितले.बी एड विभाग प्रमुख डॉ. एस डी भिलेगावकर यांनी मतदाराची भूमिका व कर्तव्ये विशद केली. निवडणूक प्रक्रियेत सर्वांनी सहभागी व्हावे असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ एस एस गोरे यांनी मतदाराचे महत्त्व सांगितले. लोकशाही निवडणूक प्रक्रियेतील मतदारांचा सहभाग विशद केला. कोणत्याही अमिषाला किंवा प्रलोभनाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करावे.सक्षम लोकशाहीसाठी मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे असे त्यांनी आवाहन केले.

निलिमा पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. पल्लवी भोसले यांनी साधन व्यक्ती यांचा परिचय करून दिला. प्रदिप सुतार यांनी आभार मानले.हरि मुकटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रम समन्वयक प्रा. एस एस सुरवसे, अग्नि कुलाचे कुलप्रमुख प्रशिक्षणार्थी अश्रुबा वाघमारे व सदस्य यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. एकूण ६० सहभागी ऑनलाईन उपस्थित होते.

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2021 - 2022


रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

दैनिक 'रयतेचा कैवारी' @ संपर्क :- ९९७५७३८३२१ ( वर्ष तिसरे - अंक ११६ ) एकूण अंक ७६७ शनिवार दि.२९/०१/२०२२ पान ०१


# बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा संपन्न

सोलापूर : दि.२८ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी , अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सांस्कृतिक विभाग व भाषा संचालनालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२२ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमाचे ऑनलाईन पद्धतीने मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे खजिनदार मा. श्री. जयकुमार शितोळे हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . एस. एस. गोरे हे होते.

मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा व मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार यावर या कार्यक्रमाचा मुख्य भर राहिला आहे. यानिमित्ताने महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. "मी का लिहितो" या आभासी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद् घाटन संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा. प्रकाश पाटील यांनी केले. भाषा संचालनालय, मुंबई येथील भाषा संचालक मा. श्रीमती विजया डोनिकर यांनी ऑनलाईन उपस्थित राहून मार्गदर्शन केले. भूगोल दिन व मकर संक्रांत, निबंध लेखन, पुस्तक समीक्षण व परीक्षण, कविता संकल्पना, काव्य लेखन व प्रकार, स्व रचित काव्य वाचन, ग्रंथ आढाव्यासाठी व वाचनासाठी वेबसाईट व ई पुस्तके,ग्रंथ प्रदर्शन, कवी कालिदास मंडळ कार्य, कवी संमेलन, साहित्यिकाची मुलाखत,भूमिका पालन व हावभाव, भाषेचा प्रचार व प्रसार, महत्त्व व उपयोगिता, समाज माध्यमातून मराठी भाषेचा प्रसार व प्रचार, मतदार जाणीव जागृती,ओव्या व गझल, व्यावसायिक लेखन कसे करावे, पत्रकारिता व मराठी स्तंभ लेखन आदी नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. एल. आय. राठोड यांनी विविध उपक्रमातील सहभागी प्रशिक्षणार्थीचा निकाल जाहीर केला. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमात सहभागी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रमुख पाहुणे तथा संस्थेचे खजिनदार मा. जयकुमार शितोळे यांनी मराठी भाषा संवर्धन याविषयी माहिती दिली. संस्कृती जोपासना व संवर्धन यात मराठी भाषेचे योगदान महत्वपूर्ण आहे. मराठी भाषेच्या नवविचारातून नवनिर्मिती करता येते.व्यक्तीच्या सर्वांगीण प्रगतीचे प्रेरक म्हणून मराठी भाषेचे योगदान वैभवशाली आहे असे त्यांनी सांगितले. मराठी भाषेचा व साहित्याचा अभिमान सर्वांनी जोपासला पाहिजे असे त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी मराठी भाषा संवर्धन याविषयी मार्गदर्शन केले. शिक्षणाच्या विविध स्तरावर मराठी भाषेचे महत्त्व आहे. मातृभाषा हे शिक्षणाचे सर्वोत्कृष्ट माध्यम आहे. मराठी भाषा ही संस्कृतीचा परिचय करून देणारी भाषा आहे. मराठी भाषा प्रसार व संवर्धन यात सर्व समाजघटकाचे योगदान महत्वपूर्ण आहे असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. डी. भिलेगावकर यांनी केले. अश्रुबा वाघमारे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.कार्यक्रम समन्वयक प्रा. सौ. एस एस सुरवसे यांनी आभार मानले. प्रीती गवळी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी भाषासंवर्धन पंधरवडा

**बार्शी :** शिक्षणशास्त्र महाविद्यालयात १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२२ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. समारोपाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.एस गोरे हे होते. शितोळे यांनी मराठी भाषा संवर्धन याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांनी मराठी भाषा संवर्धन याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस.डी. भिलेगावकर यांनी केले. अश्रुबा वाघमारे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रम समन्वयक प्रा. एस.एस. सुरवसे यांनी आभार मानले. प्रीती गवळी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

पुढारी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात कर्मवीर जयंती सप्ताह साजरा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ऑनलाईन पद्धतीने कर्मवीर जयंती सप्ताह साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते. गीतांजली क्षीरसागर, हरी मुकटे, नीलिमा पाटील, दत्तराज मोराळे, अमर क्षीरसागर, अश्रुबा वाघमारे, डॉ. एम.व्ही. मते यांनी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे सामाजिक कार्य यावर माहिती विशद केली. डॉ. आर.ए. फुरडे यांनी कर्मवीर मामासाहेबांच्या शैक्षणिक कार्याची माहिती दिली. ४ फेब्रुवारी हा दिवस समाजदिन म्हणून साजरा करण्यात आला. प्रा. पी.पी. नरळे, मधुकर डोईफोडे यांचे व्याख्यान झाले. प्रा. रोहित डिसले (शारीरिक शिक्षण), अश्रुबा वाघमारे (भौतिकशास्त्र), अशोक वाघमारे (इतिहास), कपिल भंडारी (शारीरिक शिक्षण), विठ्ठल निचळ व चंद्रकांत सकट (शिक्षणशास्त्र), स्वप्निल धेंडे (राज्यशास्त्र) यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी कर्मवीर डॉ. जगदाळे यांच्या कार्याचा आढावा घेतला. सामाजिक सुधारणांसाठी आवश्यक ती सर्व परिमाणे निर्माण करुन सच्चा समाजसुधारकाचे विराट कार्य मामासाहेबांनी केले. कर्मवीर जयंती सप्ताहाचे कार्यक्रम समन्वयक म्हणून डॉ. एस. डी. भिलेगावकर यांनी काम पाहिले.

Solapur Edition
Feb 22, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**


रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्धडिजिटल दैनिक

@ संपादक - शाहू संभाजी भारती (डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' - वर्ष तिसरे - अंक १३७ ) रविवार दि.२०/०२/२०२२पान ०१


## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी




सोलापूर दि. १९(रयतेचा कैवारी, अ◌ॉनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे शनिवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२२ रोजी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सांस्कृतिक विभाग, आकाश कुल व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने श्री. छत्रपती शिवाजी महाराज जयंती कार्यक्रमाचे आयोजन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य तथा इतिहास तज्ज्ञ डॉ. सोपान जावळे हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे औचित्य साधून अमरसिंह गोडगे यांनी चित्रमय शिवचरित्र सादरीकरण केले. गीतांजली क्षीरसागर व माधुरी जगताप यांनी अनुक्रमे श्री. छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्यावर मनोगते व्यक्त केली. प्रमुख व्याख्याते माजी प्राचार्य डॉ. सोपान जावळे यांनी शिवचरित्रावर अभ्यासपूर्ण माहिती विशद केली. शिवचरित्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली. शिवचरित्रावर जगभरातील लेखकांनी केलेल्या अभ्यासाचे ऐतिहासिक पुरावे कथन केले. श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दैदिप्यमान ऐतिहासिक कार्याची तपशीलवार माहिती दिली. शिवचरित्रातील रयतेचा राजा म्हणून केलेले कार्य विशद केले. अनेक प्रसंग, लढाया व राज्याभिषेक सोहळा यांचे वर्णन केले. राजनीती व रणनीती यामध्ये जो कौशल्य दाखवितो, तो राजा विजयी होतो. श्री.छत्रपती शिवाजी महाराज हे दूरदृष्टी व चारित्र्यसंपन्न राजे होते असे त्यांनी सांगितलेअध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला.श्री. छत्रपती शिवाजी महाराज हे एक उत्कृष्ट प्रशासक व मुत्सद्दी महाराजे होते. ते एक महान व पराक्रमी राजे होते. प्रचंड आत्मविश्वासाच्या जोरावर महाराजांनी अनेक संकटावर लिलया मात केली. कोणत्याही प्रसंगाला ते डगमगले नाहीत. त्यांनी जनकल्याणकारी योजना तयार करून रयतेला सुखी व समृद्ध केले महाराजांनी आपल्या कार्यातून रयतेला प्रेरणा दिली.श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार व कार्य प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात उपयोगात आणावे असे त्यांनी आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्नेहल गायकवाड यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय गणेश जाधवर यांनी केला. शुभम जाधवर यांनी आभार मानले. योगिता गवळी व स्नेहल गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी सांस्कृतिक प्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर व समन्वयक डॉ. आर. ए. फरडे यांनी प्रयत्न केले.

College of Education * Dist. Solapur * Barshi.

# Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2021 - 2022

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी



बार्शी : महिला दिनानिमित्त आयोजित महिला मेळाव्याप्रसंगी डॉ. बी. वाय. यादव, नंदन जगदाळे व महिलावर्ग.

### शिक्षणशास्त्र महाविद्यालयात महिला मेळावा

**बार्शी :** जिजाऊ सावित्री रमाई महिला बळ विकास समिती शिक्षणशास्त्र महाविद्यालय व शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त 'महिला मेळावा' घेण्यात आला. यावेळी डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, संस्थेचे सचिव पी.टी. पाटील, जयकुमार शितोळे आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे, प्राचार्य डॉ. दीपक गुंड उपस्थित होते. महापुरुषांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून अनिता करवा उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भारती रेवडकर होत्या. मेळाव्यातील सर्वांच्यामध्ये 'स्व'ची जागृती निर्माण करून स्वतःला स्वीकारा. योग्य ठिकाणी स्वतःमध्ये परिवर्तन करा. स्वतःमधील परिवर्तनासाठी काही वेळ ध्यानस्थ राहून एकाग्रता निर्माण केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ. भारती रेवडकर यांनी समाज सशक्तीकरणात स्त्रियांची भूमिका सशक्त असावी असे सांगून सकारात्मक दृष्टिकोन निर्माण केला. प्रास्ताविक महिला समितीच्या अध्यक्षा प्रा. माधुरी शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. विजया जगताप यांनी, तर आभार प्रा. डॉ. ज्योती माळी यांनी मानले.

Solapur Edition
Mar 16, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

**पुढारी**

News by
गणेश गोडसे,बार्शी




**बार्शी : शिक्षणशास्त्र महाविद्यालयात श्रमसंस्कार शिबिराप्रसंगी प्रशालेतील शिक्षक व मान्यवर.**

## उपळाईत श्रमसंस्कार शिबिरास प्रारंभ

**बार्शी :** बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर उपळाई (ठों) येथे सुरू झाले असून या शिबिरात १९ मार्चपर्यंत योग प्रशिक्षण, जलसाक्षरता व जल व्यवस्थापन, वृक्ष लागवड-संवर्धन, व्यसनमुक्ती, आरोग्य तपासणी शिबिर, रक्तदान, महिलांसाठी आरोग्यविषयक उद्‌बोधन, पर्यावरण व जलसुरक्षा व्यवस्थापन जनजागृती, मतदार जनजागृती, महिला बचत गटांना प्रबोधन, अर्थसाक्षरता उद्‌बोधन, स्पोकन इंग्लिश, संवाद कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास असे विविध उपक्रम राबविण्यात आले. यात प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, कार्यक्रम अधिकारी एम. एस. डिसले, सरपंच मधुकर वैद्य, उपसरपंच संदीप बोटे, तलाठी सुनील सुतार, सुंदरराव पाटील, उमेश नलवडे, बाबासाहेब तोरणे बी. एड. द्वितीय वर्षातील १२ मुले व १२ मुली सहभागी झाले आहेत. या शिबिरासाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एम. एस. डिसले परिश्रम घेत आहेत.

College of Education
Dist. Solapur
Barshi.

पुढारी

संक्षिप्त

News by
गणेश गोडसे,बार्शी



बार्शी : शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आयोजित श्रमसंस्कार शिबिराप्रसंगी मार्गदर्शन करताना मान्यवर.

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात विशेष श्रमसंस्कार शिबिर

**बार्शी :** शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन व विज्ञानामागील चमत्कार हे कार्यक्रम उत्साहात झाले. शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास या मुख्य संकल्पनेवर आधारित विशेष श्रमसंस्कार शिबिर उपळाई येथे सुरू आहे. वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन कार्यक्रमासाठी सामाजिक वनीकरण विभागाचे निजाम मुलाणी यांनी यावेळी वृक्षाचे असणारे महत्त्व व वृक्ष लागवड कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रा. हेमंत शिंदे व प्रा. सोमनाथ वेदपाठक हे उपस्थित होते. यानंतर सोमनाथ वेदपाठक यांनी विज्ञानाबद्दल विविध उदाहरणे देऊन विज्ञान व अंधश्रद्धा यातील फरक समजावून दिला. हेमंत शिंदे यांनी वेगवेगळे प्रयोग करून व त्यातून अंधश्रद्धा वगैरे काही नसते हे सगळे विज्ञान आहे, असा दावा करत विज्ञानच सर्वश्रेष्ठ आहे, असे सांगितले. एम.एस डिसले, प्राध्यापिका सुरवसे, सरपंच मधुकर वैद्य, उपसरपंच संदीप बोटे, सुनील सुतार, बाळासाहेब पाटील आदी उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनएसएस स्वयंसेवक व स्वयंसेविका गीतांजली क्षीरसागर व प्रीती गवळी, आभार प्रदर्शन शुभम जाधवर व स्नेहल गायकवाड, तर सूत्रसंचालन हरी मकटे यांनी केले.

Solapur Edition
Mar 19, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी

## संक्षिप्त



बार्शी : उपळाई येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपाप्रसंगी मान्यवर.

### शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

**बार्शी :** उपळाई येथे बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभाग शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास या संकल्पनेवर आधारित विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप १३ मार्च रोजी झाला. या शिबिरांतर्गत इंग्रजी संवाद कौशल्य विकसन कार्यशाळा, व्यसनमुक्ती जनजागृती, आरोग्य तपासणी शिबिर, महिलांसाठी आरोग्य विषयक उद्बोधन, रक्तदान शिबिर, महिला बचत गटांसाठी अर्थसाक्षरता, वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन, चमत्कारामागील विज्ञान व सांस्कृतिक कार्यक्रम हे सर्व उपक्रम राबविण्यात आले. नुकताच विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप समारंभ झाला. कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे व राजे शिवछत्रपती यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे उपस्थित होत, तर अध्यक्ष म्हणून बाळासाहेब पाटील उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ. एम.एस. डिसले यांनी प्रास्ताविक, योगिता गवळी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय, बी.पी.एड्. विभाग प्राध्यापिका एस.एस. सुरवसे यांनी आभार व सूरज हजारे व तबस्सुम पटेल यांनी सूत्रसंचालन केले.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

# रयतेचा कैवारी

संपादक - शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी'- वर्ष तिसरे - अंक १७४ ) सोमवार दि.२८/०३/२०२२ पान ०३

## श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात जलतरण स्पर्धेचे यशस्वी आयोजन

सोलापूर : दि. २७ ( रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी आणि रोटरी क्लब, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक २६ मार्च २०२२ रोजी जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी उद् घाटक म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. नंदनजी जगदाळे तर प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सहसचिव मा. श्री.अरुण देबडवार उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी व्यासपीठावर रोटरी क्लब बार्शीचे अध्यक्ष रो. विक्रम सावळे, रोटरी सचिव रो. कौशिक बंडेवार, प्रकल्पप्रमुख अतुल कल्याणी, बी. पी. एड. विभाग प्रमुख डॉ. एस. एम. लांडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर स्पर्धेत एकूण दहा महिला व ऐंशी पुरुष असे एकूण ९० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत १० ते १९ वयोगट आणि खुला गट यातील महिला व पुरुष यांचा सहभाग होता. या स्पर्धा ५० मीटर व १०० मीटर बॅकस्ट्रोक आणि फ्रीस्टाईल प्रकारात खेळल्या गेल्या.



उद्घाटन प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. नंदनजी जगदाळे यांनी सर्व स्पर्धकांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. जलतरण खेळाचे महत्व विशद केले. या प्रकारातून खेळाडूंमध्ये चपळाई, गतिमानता, तंदुरुस्ती, शारीरिक व मानसिक समतोल आदी गुणांचा विकास होतो. शालेय व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांनी जलतरण या प्रकाराचा सराव करून आपले शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य जोपासले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री. विक्रम सावळे यांनी रोटरी मार्फत केल्या जाणाऱ्या विविध कार्याचा आढावा घेतला.बार्शी शहर व परिसरातील विद्यार्थ्यांना पोहण्याचे कौशल्य प्राप्त व्हावे, अनेक गरजू विद्यार्थी आहेत यासाठी रोटरी क्लब व शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जलतरण स्पर्धेचे आयोजन केले आहे. सर्व विद्यार्थ्यांनी आपले लक्ष निश्चित करा व जीवनामध्ये यशस्वी व्हा असा सल्ला दिला सर्व स्पर्धकांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या कर्मवीर जलतरण तलावाचे महत्व विशद केले. या जलतरण तलावाच्या माध्यमातून अनेक खेळाडूंनी विविध स्तरावर चमकदार कामगिरी केली आहे. शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने खेळाडूंना हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. याचा ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना तसेच खेळाडूंना फायदा होत आहे. यामुळे कर्मवीर जलतरण तलावाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे असे त्यांनी याप्रसंगी सांगितले.

यशस्वी स्पर्धकांचा पारितोषिक वितरण कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एस. एस. सुरवसे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ए. जी. कांबळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. पी. पी. नरळे यांनी मानले. स्पर्धा यशस्वीतेसाठी व्यवस्थापक श्री. सुंदर लोमटे व सौरभ लोमटे यांनी परिश्रम घेतले. श्री. बाळराजे पिंगळे यांनी पंच म्हणून कार्य केले.

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

Publicity 2021 - 2022

डिजिटल शैक्षणिक दैनिक

रयतेचा कैवारी

संपादक - शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' - वर्ष तिसरे - अंक १४९ ) गुरुवार दि.०३/०३/२०२२ पान ०६

## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी भाषा व राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

सोलापूर: दि.२(रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे सोमवार दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ रोजी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सांस्कृतिक विभाग,अग्नि कुल व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन व राष्ट्रीय विज्ञान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक डॉ. रामेश्वर कोठावळे हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज,कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे, कुसुमाग्रज वि. वा. शिरवाडकर व सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे औचित्य साधून बी. एड. प्रशिक्षणार्थींनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे व "युवांकुर" काव्यसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. स्नेहल गुरव व प्रदीप सुतार यांनी अनुक्रमे मराठी भाषा व विज्ञान दिन याविषयी मनोगते व्यक्त केली.

प्रमुख व्याख्याते प्राध्यापक डॉ. रामेश्वर कोठावळे यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन व मराठी भाषा दिन याविषयी अभ्यासपूर्ण माहिती विशद केली. विज्ञान दिन आयोजनाची पार्श्वभूमी सांगितली. वैज्ञानिक दृष्टिकोन विकसन करण्याचे सांगितले. विवेकनिष्ठ दृष्टिकोन व तार्किक विचारसरणी आत्मसात करावी. शिक्षणातून सामाजिक उपयोगिता जोपासावी असे त्यांनी आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी मराठी भाषा व विज्ञान दिन याविषयी सविस्तर आढावा घेतला. मराठी साहित्य संपदा याविषयी जाणीवजागृती आवश्यक आहे. विज्ञानवादी दृष्टिकोन आवश्यक आहे. संशोधन वृत्ती विकसित करावी. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात विज्ञान उपयोगात आणावे असे त्यांनी आवाहन केले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलिमा पाटील केले.प्रमुख पाहुण्यांचा परिचय सवाल शेख यांनी केला. आश्रूबा वाघमारे यांनी आभार मानले. तब्बसुम पटेल व अल्पना पिंपळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी सांस्कृतिक प्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर व कार्यक्रम समन्वयक डॉ. एम. व्ही. मते यांनी प्रयत्न केले. यावेळी डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. पी. ए. पाटील, अग्नी कुलाचे सदस्य, प्रशिक्षणार्थी आदी उपस्थित होते.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी



**बार्शी : बार्शीतील सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलच्या भेटीप्रसंगी शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक.**

## विद्यार्थ्यांची सिल्व्हर ज्युबिली शाळेस भेट

**बार्शी :** शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी बी.एड. प्रथम वर्ष प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलला भेट दिली. मुख्याध्यापक कोल्हे, प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, उपमुख्याध्यापक चाटी, पर्यवेक्षक विश्वेकर, बिराजदार, प्रात्यक्षिक मार्गदर्शक डॉ. भिलेगावकर, डॉ.पाटील, डॉ. डिसले उपस्थित होते. प्रास्ताविक भिलेगावकर यांनी केले. मुख्याध्यापक कोल्हे यांनी शिक्षक म्हणून काम करताना पालक सहकार्य घेऊन शालेय विकास कसा करावा, हे स्पष्ट केले. शाळेमध्ये राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांबद्दल माहिती दिली व प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. ग्रंथपाल गुडे यांनी ग्रंथालय मार्गदर्शन केले. प्रयोगशाळा, कार्यालय, मैदान, वर्ग, स्टाफ रूम दाखवून शाळेतील सर्व कामकाजांबाबत माहिती दिली. प्रशिक्षणार्थी पाटील यांनी आभार व्यक्त केले.

College of Education Dist. Solapur Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

## बार्शीच्या जलतरण स्पर्धेत महिलांसह ९० जणांचा सहभाग

### शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या उपक्रमाचे कौतुक

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि रोटरी क्लबच्या जलतरण स्पर्धेत १० महिला, ८० पुरुष अशा एकूण ९० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत १० ते १९ वयोगट आणि खुला गट यातील महिला व पुरुषांचा सहभाग होता. या स्पर्धा ५० मीटर व १०० मीटर बॅकस्ट्रोक आणि फ्रीस्टाईल प्रकारात खेळल्या गेल्या.

स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे यांनी केले.



**बार्शी : जलतरण स्पर्धेच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मान्यवर. यावेळी उपस्थित प्रशिक्षक आणि संस्थेचे पदाधिकारी.**

यावेळी सहसचिव अरुण देवडवार, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, रोटरी क्लबचे अध्यक्ष विक्रम सावळे, कौशिक बंडेवार, अतुल कल्याणी, बी.पीएड. विभागप्रमुख डॉ. एस.एम. लांडगे उपस्थित होते.

विक्रम सावळे यांनी रोटरीमार्फत केल्या जाणाऱ्या विविध कार्याचा आढावा घेतला. बार्शी शहर व परिसरातील विद्यार्थ्यांना पोहोण्याचे कौशल्य प्राप्त व्हावे हा हेतू असल्याचे सांगितले. अनेक गरजू विद्यार्थी आहेत. प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांनी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या कर्मवीर जलतरण तलावाचे महत्त्व विशद केले. या जलतरण तलावाच्या माध्यमातून अनेक खेळाडूंनी विविध स्तरावर चमकदार कामगिरी केली. शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने खेळाडूंना हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. याचा ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना, खेळाडूंना फायदा होत आहे. यामुळे कर्मवीर जलतरण तलावाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक एस.एस. सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ए. जी. कांबळे यांनी केले. आभार प्रा. पी. पी. नरळे यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सुंदर लोमटे व सौरभ लोमटे यांनी परिश्रम घेतले. बाळराजे पिंगळे यांनी पंच म्हणून कार्य केले.

My Solapur Edition
Mar 29, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**


# रयतेचा कैवारी

डिजिटल शैक्षणिक दैनिक

संपादक - शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी'- वर्ष तिसरे - अंक १८८ ) सोमवार दि.११/०४/२०२२ पान ०७


## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्रशिक्षणार्थी स्वागत समारंभ

सोलापूर : दि. १० (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा ) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे शुक्रवार दिनांक ०८ एप्रिल २०२२ रोजी प्राचार्यांचे अभिभाषण व प्रशिक्षणार्थी स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे उपस्थित होते. महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ याकरीता बी. एड., बी. पी. एड., एम. एड. व एम. पी. एड. प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या निमित्ताने महाविद्यालयातील नव्याने प्रवेश झालेल्या प्रशिक्षणार्थींचे स्वागत व प्राचार्यांचे अभिभाषण केले जाते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताह निमित्ताने भारतीय संविधानातील प्रस्तावनेची ओळख या विषयावर अश्रुबा वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले. यानंतर संस्थेचा इतिहास डॉ. एम. व्ही. मते यांनी विशद केला.




महाविद्यालयातील भौतिक व मानवी सुविधांची माहिती प्रा. एस. एस. सुरवसे यांनी सांगितली. डॉ. एम. एस. डिसले, प्रा. पी. पी. नरळे, डॉ. एस. एस. मारकड यांनी अनुक्रमे महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा परिचय करून दिला. यानंतर सर्व विभागाच्या प्रशिक्षणार्थींनी स्वतःची ओळख करून दिली. नॅक आयक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी नॅक मूल्यांकनात प्रशिक्षणार्थींची भूमिका यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे, संस्था व महाविद्यालय यांच्या विषयीची माहिती सांगितली. महाविद्यालयातील भौतिक व मानवी सुविधांचा परिचय करून दिला. महाविद्यालयाची गुणवत्तेची यशस्वी परंपरा सांगितली. या महाविद्यालयातून सक्षम शिक्षक व उत्कृष्ट खेळाडू तयार केले जातात. महाविद्यालयात विद्यापीठाचे मान्यताप्राप्त संशोधन केंद्र आहे. तसेच अनेक प्राध्यापक शासनाच्या व विद्यापीठाच्या विविध समितीवर कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील भौतिक व मानवी सुविधाचा पुरेपूर फायदा घेऊन व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करावा असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.एस. डी. भिलेगावकर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. एस. ए. सावळे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पी. ए. पाटील यांनी केले.

College of Education, Dist. Solapur, Barshi.

# रयतेचा कैवारी

संपादक - शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी'- वर्ष तिसरे - अंक १९२ ) शुक्रवार दि.१५/०४/२०२२ पान १०

## श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सामाजिक समता सप्ताह साजरा

सोलापूर : दि.१४ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने ७ ते १४ एप्रिल २०२२ या कालावधीत समान संधी केंद्र पुरस्कृत सामाजिक समता सप्ताह कार्यक्रम घेण्यातआल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी सांगितले.

यानिमित्ताने ०७ एप्रिल रोजी महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. ०८ एप्रिल रोजी भारतीय संविधानातील प्रस्ताविकेची ओळख या विषयावर अश्रूबा वाघमारे यांनी माहिती सांगितली.०९ एप्रिल रोजी महाविद्यालयातील ग्रंथालयात सलग वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.१० एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य यावर आधारित प्रशिक्षणार्थींसाठी ऑनलाईन क्विझ देण्यात आली. ११ एप्रिल रोजी महात्मा फुले जयंती निमित्ताने कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय इंदापूर येथील मराठी विभागप्रमुख डॉ. राजाराम गावडे यांचे महात्मा फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य यावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले. १२ एप्रिल रोजी महाविद्यालयाततील ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले. १३ एप्रिल रोजी घोषवाक्य, रांगोळी व भितीपत्रक स्पर्धा घेण्यात आली. १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती विशद केली. या सर्व कार्यक्रमात प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. डॉ. एस. डी. भिलेगावकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.



College of Education
Dist. Solapur
Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

रयतेचा कैवारी

संपादक - शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' - वर्ष तिसरे - अंक २०६ ) शुक्रवार दि.२९/०४/२०२२ पान ०३

## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात योग प्रशिक्षण-कार्यशाळेचे आयोजन



सोलापूर: दि.२८ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या प्रपत्रानुसार दिनांक २५ एप्रिल ते २१ जून २०२२ या कालावधीत चार सत्रांमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन २०२२ या कार्यक्रमांतर्गत योग प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी सांगितली. या योग प्रशिक्षण कार्यशाळेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे योग प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. यातील पाहिले सत्र दिनांक २५ एप्रिल ते ३० एप्रिल २०२२ या कालावधीत घेतले जाणार आहे. या योग प्रशिक्षण कार्यशाळेचा उद्घाटन कार्यक्रम मंगळवार दिनांक २६ एप्रिल २०२२ रोजी श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार माननीय श्री जयकुमार शितोळे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे उपस्थित होते.

यावेळी उद्घाटक तथा संस्थेचे खजिनदार मा. जयकुमार शितोळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. योग प्रशिक्षण कार्यशाळेच्या आयोजनाचे कौतुक केले. आजच्या गतिमान युगात योग प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. योग आणि प्राणायामांच्या मदतीने आपल्यातली सजगता वाढते. योग आणि ध्यान धारणेमुळे मन सतत आनंदी, प्रसन्न आणि शांत राहते. दैनंदिन कार्यक्रमात योगाचा समावेश केलात तर शरीर सशक्त, चपळ आणि लवचिक बनते. रोज न चुकता योगा केलात तर शरीराच्या स्नायूंना बळकटी येईल. दैनंदिन जीवनात प्रत्येकाने योग व व्यायाम यासाठी स्वतःचा वेळ राखीव ठेवला पाहिजे. महाविद्यालयात एप्रिल ते जून या तीन महिन्याच्या कालावधीत योगाची शास्त्रशुद्ध तात्विक व प्रात्यक्षिक माहिती विविध तज्ज्ञांच्या माध्यमातून दिली जाणार आहे. ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. असे प्रतिपादन त्यांनी केले. आपण सर्वांनी योगाचे प्रशिक्षण घेऊन एक उत्तम योग शिक्षक व्हावे असे आवाहन त्यांनी केले. या प्रशिक्षण कार्यशाळेसाठी आवश्यक त्या भौतिक सुविधा व मानवी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील असे त्यांनी आश्वासन दिले.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी महाविद्यालयातील विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचा आढावा घेतला. महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापक व क्रीडा मार्गदर्शक यांच्याद्वारे योगाचे निरंतर प्रशिक्षण देण्याची सुविधा महाविद्यालयात असल्याचे त्यांनी सांगितले. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी व खेळाडूंनी विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर योग स्पर्धेत सहभाग घेऊन उल्लेखनीय कामगिरी केल्याचे त्यांनी सांगितले. योग प्रशिक्षण कार्यशाळेतून सर्वांनी योगाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन दैनंदिन जीवनात त्याचा अवलंब करावा असे त्यांनी आवाहन केले.

या प्रशिक्षण कार्यशाळेत डॉ. एस. एम. लांडगे यांनी योगासने प्रात्यक्षिके करून घेतली. या कार्यशाळेत योग प्रशिक्षण व ऑनलाईन व्याख्यान यांचे नियोजन करण्यात आले आहे. डॉ. आर. आर. वामन व प्रा. संतोष देशमुख यांनी ऑनलाईन व्याख्यानातून योगाची शास्त्रशुद्ध माहिती दिली. या कार्यक्रमाचे नियोजन बी. पी. एड. विभाग प्रमुख डॉ. एस. एम. लांडगे, समन्वयक डॉ.ए. जी. कांबळे, प्रा. एस. एस. सुरवसे, प्रा. पी. पी. नरळे, प्रा. बी. टी. गुंड, डॉ. एस. एस. मारकड,प्रा. रोहित डिसले,डॉ. एच. के. बारसकर , प्रा. एस. ए. सावळे यांनी केले. या प्रशिक्षण कार्यशाळेत बी. एड. , बी. पी. एड., एम. एड. व एम. पी. एड. विभागाच्या एकूण १२० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ.ए. जी. कांबळे यांनी केले. डॉ.एस. एम. लांडगे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यकमाचे सत्रसंचालन प्रा.पी. पी. नरळे यांनी केले.

College of Education Dist. Solapur Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**

## रासेयो समन्वयकपदी डॉ. डिसले

**बार्शी :** शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथील सहयोगी



प्राध्यापक डॉ. एम. एस. डिसले यांची पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विभागीय समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली. डॉ. एम. एस. डिसले हे महाविद्यालयात रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने त्यांना विभागीय समन्वयक नियुक्तीचे पत्र नुकतेच देण्यात आले आहे.

Solapur Edition
Apr 11, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

College of Education, Dist. Solapur, Barshi.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**



बार्शी : आंतरस्कूल स्पर्धेच्या प्रारंभाप्रसंगी पी.टी. पाटील, डॉ. एस.एम. लांडगे, डॉ. ए.जी. कांबळे व मान्यवर.

## नियमित व्यायाम गरजेचा : पी.टी. पाटील

**बार्शी :** बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शारीरिक शिक्षणशास्त्र विभागाच्या वतीने आंतरस्कूल क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. यात आंतरस्कूल कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या. याचा प्रारंभ संस्था सचिव पी. टी. पाटील यांनी केला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे होते. यावेळी डॉ. एस.एम. लांडगे, डॉ. ए.जी. कांबळे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे यांनी क्रीडा स्पर्धा उपक्रमाचे कौतुक केले. खेळांमुळेच आपली उत्साही वृत्ती टिकून राहते. अभ्यासाइतकेच जीवनात व्यायाम व खेळ यांनाही महत्त्व आहे. महाविद्यालयात उपलब्ध क्रीडा साहित्य व क्रीडा संकुलाचा सदुपयोग करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. गणेश वंदना, छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा, शिव गीते, लावणी नृत्य, कोकणी नृत्य, चित्रपट गीते आदींवर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. प्रा. एस.एस. सुरवसे यांनी समन्वयक म्हणून कार्य केले.

My Solapur Edition
Apr 12, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

College of Education
Dist. Solapur
Barshi.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2021 - 2022**



बार्शी : बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आयोजित स्पर्धा परीक्षाविषयी व्याख्यानात बोलताना चंद्रकांत पवार.

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात स्पर्धा परीक्षाविषयक व्याख्यान

**बार्शी :** येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाच्या वतीने शिक्षक स्पर्धा परीक्षा या विषयावर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा पुणे येथील केंद्रीय विद्यालयाचे चंद्रकांत पवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे होते. यावेळी व्यासपीठावर एस. एम. लांडगे, व्ही. पी. शिखरे, ए. जी. कांबळे आदी उपस्थित होते. केंद्र शासनाच्या या स्वायत्त संस्थेत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक पदाची मोठी संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. एस एस गोरे यांनी महाविद्यालयातील समृद्ध भौतिक व मानवी घटकांचा सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले. निरंतर वाचन करणे गरजेचे आहे. नवीन ज्ञान घेण्याची लालसा जागृत ठेवणे आवश्यक आहे. प्रास्ताविक समन्वयक ए जी कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन पी. पी. नरळे यांनी तर आभार पी. ए. पाटील यांनी मानले.

College of Education, Dist. Solapur, Barshi.